
म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय : नाटक
दा. क्र. : २०७९६

IRBK-0120716
IRBK-0120716

वाचनालय
नाटक
२०७१६
१५/१/८५

# झोपा आता गुपचुप



# झोपा आता गुपचुप

अशोक पाटोळे

IRBK-0120716

IRBK-0120716

पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

झोपा आता गुपचुप

पॉप्युलर प्रकाशन

म–३७७

© सौ. सुलभा पाटोळे

पहिली आवृत्ती १९८४/१९०५

मुद्रक :
सौ. कमल रामचंद्र वळसारी
संजीव मुद्रणालय, पंताचा गोट
४६९ टिळक रोड, पुणे ४११ ०३०

Zopa Ata Gupchup
( Marathi Play )
Ashok Patole

प्रकाशक :
रामदास भटकळ
पॉप्युलर प्रकाशन प्रा. लि.
ताडदेव मुंबई ४०० ०३४

ह्या नाटकाच्या प्रयोगाचे, भाषांतराचे इत्यादी सर्व हक्क सौ. सुलभा पाटोळे यांच्या स्वाधीन आहेत. प्रयोगापूर्वी त्यांची रीतसर परवानगी घेणे आवश्यक आहे.

पत्रव्यवहाराचा पत्ता :

सौ. सुलभा पाटोळे
द्वारा पॉप्युलर प्रकाशन
३५ सी, पं. मालवीय रोड, ताडदेव, मुंबई ४०० ०३४

ज्यांचा शिष्य म्हणवून घेण्याची
माझी पात्रता नाही त्या

आचार्य अत्रे
व
पु. ल. देशपांडे

यांना
अर्पण !

**मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.**

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे ादा वर्गणी भरावी लागेल.

| | |
|---|---|
| 1 MAR 1985 | - 9 MAR 1985 |
| 6 JUL 1985 | 15 SEP 1985 |
| 18 MAR 1998 | |
| 11 MAR 2001 | |
| 7 JUL 2001 | |

(क्रु. मा. पहा)
५०००-३-८४

## आभार.... धन्यवाद इत्यादी

माझं व्यावसायिक रंगभूमीवर आलेलं हे पहिलंच नाटक. हे नाटक लिहायला घेतल्या क्षणापासून ते व्यावसायिक रंगभूमीवर येईपर्यंत ज्या ज्या लोकांचं मला सहकार्य लाभलं त्या सगळयांची नावं देणं स्थलाभावी अशक्य असलं तरी काही महत्त्वाच्या लोकांचा उल्लेख टाळता येणं मला अशक्य आहे. श्री. भास्कर पंडित, श्री. माधव वाटवे, श्री. रमाकांत देशपांडे, श्री. दिलीप कोल्हटकर, श्री. सुरेश खरे ह्या सगळयांचा मी अत्यंत ऋणी आहे.

ज्यांनी माझ्या नाटकाला व्यावसायिक रंगमंचावर आणण्याचं धाडस दाखवलं त्या श्री. राजाराम शिंदे ह्यांचा व एका नवीन नाटककाराचं नाटक बसवायचं कबूल करून स्वतःची प्रतिष्ठा धोक्यात घालणाऱ्या श्री. आत्माराम भेंडे ह्या बुजुर्ग दिग्दर्शकाचाही मी अत्यंत आभारी आहे.

हे नाटक पुस्तकरूपानं प्रकाशित व्हावं म्हणून 'पॉप्युलर'च्या श्री. रामदास भटकळांकडे शब्द टाकणाऱ्या सौ. प्रभा जोशी ह्यांना व प्रकाशनाच्या कामी श्री. भटकळांना मनापासून मदत करणाऱ्या सौ. अंजली कीर्तने ह्यांनाही मनःपूर्वक धन्यवाद !

माझ्या पहिल्याच पुस्तकाला 'पॉप्युलर प्रकाशन'सारखी संस्था मिळाली हे मी माझं भाग्य समजतो. आपल्या नाटकाचं पुस्तक बघण्याचं माझं फार वर्षांचं स्वप्न श्री. रामदास भटकळ यांनी साकार केलेलं आहे.

अशोक पाटोळे

# झोपा आता गुपचुप

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. २०७१६ नों. दि ...........
वि. ....नाटक.. क्र. १५७१८५.........

# अंक १ ला

[ स्थळ : मन्याच्या दिवाणखान्यातील दृश्य
प्रतिमा रागारागाने सुटकेस भरते आहे. मन्या तिला काही सांगायचा प्रयत्न करतो आहे. ]

मन्या : प्रतिमा, प्रतिमा, प्लीज ऐकून घे माझं !

प्रतिमा : एक शब्द बोलू नका.

मन्या : पण माझं ऐकून तर घे.

प्रतिमा : काही ऐकायचं नाही मला. बाजूला व्हा ! ( कपाटातून कपडे काढून सुटकेसमध्ये भरते. )

मन्या : ( तिच्या पाठीपाठी ) प्रीती, प्रीती माझं ऐक. तुझा गैरसमज होतो आहे !

प्रतिमा : ( क्षणभर त्याच्याकडे बघून ) गैरसमज अं ?

मन्या : हो अगदी शुद्ध गैरसमज.

प्रतिमा : गैरसमज होता. तो काल रात्री दूर झाला. दूर व्हा. ( कपाटातून कपडे काढून बॅगमध्ये भरते. )

मन्या : तू माझं म्हणणं तरी ऐकून घेशील की नाही ? पटलं तर बघ. तो

माझा शर्ट आहे. नाही पटलं तर जा माहेरी.

**प्रतिमा** : घ्या. तुमचं तोंडसुद्धा ह्यापुढे बघायचं नाही मला. (त्याचा शर्ट त्याच्या तोंडावर फेकते.)

**मन्या** : माझं तोंड बघण्यासारखं नाहीच आहे ग. तुला दाखवण्यासारखी माझ्याजवळ एकच गोष्ट आहे. माझं हृदय.

**प्रतिमा** : हं! ते दाखवा तुमची जी कुणी आहे तिला.

**मन्या** : हाच हाच तो गैरसमज. अगं माझी 'ती' कुणी असती तर आज मी तुला माहेरी जाताना अडवलं असतं का? सकाळच्याच गाडीनं नसतं का पाठवलं! म्हणजे मीही मोकळा झालो असतो आणि तुझ्या आईलासुद्धा जरा बरं वाटलं असतं!

**प्रतिमा** : माझी आई काढायचं तुम्हाला कारण नाही. तिनं परवानगी दिली म्हणून तुमच्याशी माझं लग्न झालं! एरवी तुमच्यासारख्या दगाबाज माणसाला कुणी दिली असती मुलगी?

**मन्या** : मी दगाबाज?

**प्रतिमा** : हो दगाबाज!

**मन्या** : मी दगाबाज?

**प्रतिमा** : हो हो दगाबाज! दगाबाज! दगाबाज!

**मन्या** : आता मात्र मी पण सुटकेस भरणार! तुला तेवढं माहेर आहे आणि मला नाही वाटतं! काढ तुझे कपडे– (त्याच्याकडे पाहाते) सुटकेसमधले. सुटकेस माझी आहे. मला लग्नात प्रेझेंट मिळाली आहे ती. तू दुसरी सुटकेस घे.

**प्रतिमा** : दुसरी सुटकेस आहे का घरात?

**मन्या** : काय? घरात दुसरी सुटकेस नाही? मग मी आता माहेरी जाणार कसा? (त्याच्याकडे पाहाते) आपण असं करू या! तू तुझे निम्मे कपडे भर मी माझे निम्मे कपडे भरतो. पंधरा दिवस तुझ्या माहेरी जाऊ– पंधरा दिवस माझ्या माहेरी जाऊ.

**प्रतिमा** : फालतू जोक मारू नका. मी हसणार नाही.

**मन्या** : का हसणार नाहीस? दुसऱ्याच्या विनोदाला न हसायला तू काय विनोदी लेखक आहेस?

प्रतिमा : हे बघा, मी तुम्हाला सिरिअसली सांगते आहे मी माहेरी जाते आहे !
मन्या : आणि मीही तुला गंभीरपणे सांगतो आहे– मी सुद्धा माहेरीच जातो आहे !
प्रतिमा : पण सुटकेस एकच आहे.
मन्या : मग आपण असं करूया– दोघं तुझ्याच माहेरी जाऊ या– कशी आहे आयडिया ? ( ती मख्ख चेहऱ्याने त्याच्याकडे बघत राहते. ) अगं हस ना जरा– तुमच्यात माहेरी जाताना हसत नाहीत ?
प्रतिमा : तुम्ही कितीही प्रयत्न केलात तरी काही उपयोग होणार नाही. तुमची चालूगिरी मला कळून चुकली आहे.
मन्या : कळून चुकली नसेल. चुकून कळली असेल. पण चालूगिरी म्हणजे नक्की काय कळलं ते तर कळू दे ! नीट स्पष्ट का बोलत नाहीस ?
प्रतिमा : स्पष्ट बोलायला मी काही तिच्याइतकी निर्लज्ज नाही.
मन्या : कुणाइतकी ?
प्रतिमा : रात्री तुम्ही जिच्याशी प्रेमाच्या गुलगुल गोष्टी करत होता तिच्या-इतकी.
मन्या : अग तो मी नव्हतो !
प्रतिमा : कशाला खोटं बोलता ? मी जागीच होते त्यावेळी– तुमच्या बरळण्यातला शब्दन् शब्द ऐकला आहे मी !
मन्या : अग पण तो मी नव्हेच !
प्रतिमा : मग काल रात्री माझ्या शेजारी दुसरं कुणी होतं वाटतं !
मन्या : नीट आठवून बघ. नाही, म्हणजे मी काय काय बोलला ते नीट आठवून बघ, मग मी तुला सांगतो खरी भानगड काय आहे ते.
प्रतिमा : ती न सांगताच कळली आहे मला.
मन्या : तुला काही एक कळलेलं नाही. तू डोकं शांत ठेवून ऐक. मला तुझ्याशी एका अतिशय गंभीर विषयावर बोलायचं आहे !
प्रतिमा : घटस्फोटासंबंधी बोलायचं असेल.
मन्या : शीः शीः काहीतरीच काय !
प्रतिमा : मग दुसरी बायको करायची परवानगी मागणार असाल.

मन्या : काहीतरीच काय ? एक बायको परवडत नाही तिथे दुसरी काय करणार ? हे बघ, मला अलीकडे फार विचित्र अनुभव येतो आहे.. (प्रतिमा त्याच्याकडे दुर्लक्ष करून बॅग व्यवस्थित भरू लागते.) काय ग, ऐकतेयस ना ? मला अलीकडे विचित्र अनुभव येतो आहे. तू शांत चित्तानं ऐकून घेतलंस तर माहेरी जायचा बेत रद्द करशील.

प्रतिमा : ते आता शक्य नाही. (बॅग बंद करते.) मी निघाले.

मन्या : प्रीती—

प्रतिमा : बाय ! आता खुशाल घेऊन या तिला आणि भरपूर विचित्र अनुभव घ्या. मी निघाले.

मन्या : प्रतिमा शेवटची रिक्वेस्ट !

प्रतिमा : काय ?

मन्या : जाऊ नकोस, मला खूप भीती वाटते आहे, तू शेजारी नसशील तर मला झोप येणार नाही.

प्रतिमा : आणि तुम्ही शेजारी असाल तर मला झोप येणार नाही.

मन्या : मग तू जाणार आहेस ?

प्रतिमा : ऑफ्कोर्स !

मन्या : जाताना दरवाजा नीट लावून घे !

प्रतिमा : काय ?

मन्या : काही नाही. उद्या ऑफिसला जाणार आहेस ?

प्रतिमा : ते माझं मी बघून घेईन. जाते मी. (बाहेर जाते.)

मन्या : गेलीस उडत !

प्रतिमा : (आत डोकावून) उडत नाही. बसने जाणार आहे. (दारावरची बेल वाजते)

मन्या : आली वाटतं परत. पश्चात्ताप झालेला दिसतोय. (ओरडून) का ? आता का आलीस परत ? आधी माफी माग. मग उघडतो—

सतीश : (बाहेरून) ए उघड ना !

मन्या : पुरुषी आवाजात बोलू नकोस !

सतीश : साल्या, उघड ना दरवाजा.

मन्या : मला साल्या म्हणतेस ! थांब तुझं थोबाडच रंगवतो. (ह्या ठिकाणी

कानफटीत मारल्याचा आवाज ऑफ दी स्टेज काढून......सतीश 'अयाय ग' म्हणत प्रवेश करतो– मागोमाग मन्या प्रवेश करतो) सॉरी सॉरी! फार लागलं नाही ना? अरे मला वाटलं माझी बायकोच आली!

सतीश : बायकोचं रोज असं स्वागत करतोस?

मन्या : नाही- मी जरा रागात होतो.

सतीश : नशीब माझं!

मन्या : म्हणजे?

सतीश : नाही रागात होतास म्हणून कानफटीत मारलीस! प्रेमात असतास तर काय केलं असतंस?

मन्या : (हसत) बस बस. बरं झालं आलास!

सतीश : हो– राग शांत करायला जागा मिळाली. (गाल चोळतो.)

मन्या : सतीश, मी एका संकटात आहे.

सतीश : माफ कर. संकटसमयी 'कामास' येणारा मी मित्र नाही (भुई-सपाट ह्या अर्थी हात हलवीत) मी पण सध्या कडकीत आहे.

मन्या : मी आर्थिक संकटात नाही आहे रे! मला हल्ली विचित्र स्वप्नं पडतात!

सतीश : मला सुद्धा पडायची, लग्नानंतर बंद झाली.

मन्या : सतीश, मला पडतात ती स्वप्नं तुला पडत होती तसली नाहीत!

सतीश : नाही ना? मग हरकत नाही. बोल पुढे.

मन्या : माझ्या स्वप्नातल्या वस्तू प्रत्यक्ष प्रगट होतात.

सतीश : म्हणजे कशा?

मन्या : समजा मी एखादं चित्र पाहिलं तर त्या चित्रातली वस्तू माझ्या स्वप्नात येते आणि त्याच वेळी प्रकट होते.

सतीश : मिस्टर, सकाळपासून कोणी भेटलं नाही वाटतं फिरकी घ्यायला?

मन्या : फिरकी नाही रे, मी खरं तेच सांगतो आहे!

सतीश : काय खरं तेच सांगतो? पाहिलेलं चित्र स्वप्नात येतं इथवर ठीक आहे. पण चित्रातल्या वस्तू सत्यात उतरतात ही थाप वहिनीला मारलीस तरी पचायची नाही.

मन्या : म्हणूनच तुला सांगतो! तिनं तर काही ऐकूनच घेतलं नाही. तरातरा बॅग भरली आणि गेली माहेरी!

सतीश : वहिनी माहेरी गेली? आयला! तुझी मजा आहे. माझी बायको गेल्या पाच वर्षांत एकदाही माहेरी गेली नाही. पाच वर्षांत तीनदा बाळंतपणं झाली. सगळी घरच्या घरीच. तुम्ही साले कुठून नशीब घेऊन येता कोण जाणे. बायको चक्क माहेरी जाते काही कारण नसताना.

मन्या : सतीश, ती भांडून गेली आहे.

सतीश : पण गेली ना– ते महत्त्वाचं! आता तू असं कर. बायको घरी नाही आणि तुझ्या स्वप्नातल्या गोष्टी खऱ्या होतात. मी सांगतो तुला– तू हेमामालिनीचं स्वप्न बघ. साला तू कधी जागाच होणार नाहीस!

मन्या : माझी थट्टा करू नकोस रे. मी कळवळून बोलतोय!

सतीश : (गाल चोळीत) मीही कळवळून बोलतोय! बोल तू. काय थापा मारायच्या असतील त्या घे मारून.

मन्या : थापा नाही– खरे प्रसंग सांगतो. अगदी ह्या घरात घडलेले. गेल्या आठवड्यापासून हे चमत्कार सुरू झाले आहेत, मी ज्या वस्तूंचं चित्र बघतो ती वस्तू आधी माझ्या स्वप्नात येते आणि मग प्रत्यक्षात प्रकट होते.

सतीश : काय काय प्रगट झालं दाखव पाहू!

मन्या : ते दाखवता नाही येणार. मला जाग आली की प्रगट झालेल्या गोष्टी अदृश्य होतात.

सतीश : काय बाकी थापा मारतोस!

मन्या : ह्या थापा नाहीत, सतीश– तुझी शपथ!

सतीश : ए, माझी शपथ घेऊ नकोस, मी मेलोबिलो तर माझी बायको विधवा होईल. तिचा मी एकुलता एक नवरा आहे– टू दी बेस्ट ऑफ नॉलेज.

मन्या : सतीश, प्लीज, माझं ऐकून घे रे. नाहीतर मला रडू येईल.

सतीश : ऐकतो. पण रडू नकोस. आमच्या घरी तेच चाललेलं असतं आळी-

पाळीनं. हं सांग.

**मन्या** : गेल्या आठवड्यात– रविवार असेल बघ तो. कदाचित सोमवार असेल–– किंवा–

**सतीश** : बुधवार असेल...

**मन्या** : मला वाटतं गुरुवार होता– की शुक्रवार होता–

**सतीश** : कुणी सांगावं, शनिवारसुद्धा असेल.

**मन्या** : बरोबर आत्ता आठवलं– रविवारच होता. मी एक मासिक चाळत पडलो होतो. त्यातलं एका मांजराचं चित्र बघता बघता मला कधी झोप लागली कळलंच नाही.

**सतीश** : तसा तू झोपाळूच. म्हणूनच शाळेत नेहमी शेवटच्या बाकावर बसायचास.

**मन्या** : काही वेळानंतर माझ्या स्वप्नात ते मांजर आलं...त्या मासिकातलं. गुबगुबीत, पांढराशुभ्र देह, लुकलुकणारे डोळे, अगदी स्पष्टपणे दिसायला लागलं. मी त्याच्या अंगावरून हात फिरवला. त्याचा उबदार स्पर्श मला स्पष्ट जाणवला. मी हळूच डोळे किलकिले करून पाहिलं. तो काय आश्चर्य ते मांजर खरोखरच माझ्या कुशीत झोपलेलं होतं. मी अतिशय घाबरलो आणि दचकून जागा झालो. त्याबरोबर ते मांजर एकदम अदृश्य झालं.

**सतीश** : ( टाळ्या वाजवून ) वाहवा! काय बाकी आयडिया आहे! ए, तू ह्याच्यावर काहीतरी लिहून एखाद्या मासिकाकडे पाठव... नक्की परत येईल. साल्या, मित्र झालो म्हणून का त्याला काय एवढा छळायचा? चल, आपण दुसऱ्या विषयावर बोलू या!

**मन्या** : नाही. आपण ह्याच विषयावर बोलायचं. मला तुझी मदत हवी आहे.

**सतीश** : ए, आता पुरे हे. प्रत्येक गोष्टीला मर्यादा असते. थापा सहन करायलाही काही मर्यादा आहेत. अरे प्रमाणाबाहेर थापा मारल्या तर तबलासुद्धा उखडतो. मी तर माणूस आहे.

**मन्या** : तुझा विश्वास बसत नाही?

**सतीश** : कसा बसेल? अरे असं कधी घडतं तरी का?

**मन्या** : घडतं रे घडतं! अरे परवा इथं हत्ती प्रकट झाला होता कॅलेंडरवरचा!

**सतीश** : कुठं आहे ते कॅलेंडर?

**मन्या** : मी फेकून दिलं ते! रूममध्ये शक्यतो एकही चित्र ठेवायचं नाही असा निश्चय केला आहे मी.

**सतीश** : आतल्या रूममध्ये आहे का एखादं चित्र?

**मन्या** : म्हणजे?

**सतीश** : पाहिलेल्या चित्रातल्या गोष्टी स्वप्नात येतात आणि सत्यसृष्टीत उतरतात असं म्हणणं आहे ना तुझं?

**मन्या** : हो.

**सतीश** : ठीक आहे. मग ते सिद्ध करून दाखव. आत्ताच्या आत्ता.

**मन्या** : ( आढेवेढे घेत ) पण...

**सतीश** : आत्ता पण का? पणबीण काही नाही. सिद्ध करून दाखव नाहीतर थापा मारल्या हे कबूल कर. बाप दाखवतोस की श्राद्ध करतोस बोल?

**मन्या** : ठीक आहे. दाखवतो बाप. आण आतलं एखादं चित्र. पण लक्षात ठेव मला झोप लागेपर्यंत तुला धीर धरावा लागेल.

**सतीश** : ठीक आहे. आणि तूही लक्षात ठेव, थाप निघाली तर लाथ मारीन.

**मन्या** : कबूल. आण चित्र आण. दिसेल ते घेऊन ये.
( सतीश आत जाऊन एकदोन कॅलेंडर्स आणतो. )

**सतीश** : हे चालेल? मारुती? नको नको, मारुती प्रगट झाला तर आपल्यावर राम म्हणायची पाळी येईल. मग हे बघतोस?– छत्रपती शिवाजी महाराज–

**मन्या** : नको रे, बाबा. आबासाहेब प्रगट झाले तर?

**सतीश** : तर काय– लगेच 'जय महाराष्ट्र' म्हणून टाकू. आपल्याला शाबासकी देतील!

**मन्या** : आणि तलवारीनं बोटं छाटली तर? तर मग आली का पंचाईत? साला कुणाशी शेकहँडसुद्धा करता येणार नाही.

**सतीश** : यू आर उगाचच वेस्टिंग माय टाईम हां! लवकर काय ते सिद्ध

करून दाखव. नाहीतर हा वघ मी चाल्लो.

**मन्या** : बरं आण ते महाराजांचं चित्र. पण वघ हं महाराज प्रगट झाले तर...

**सतीश** : त्यांना मी समजावीन. तू काळजी करू नकोस. माझे एक पूर्वज त्यांच्या सैन्यात होते... घोड्यांना खरारा करायला.

**मन्या** : असं ?– मग मी झोपतो. तू तिथं उभा रहा. ( घाबरलेल्या स्वरात ) वाबरू नकोस हं ! ( पलंगावर जाऊन झोपतो ) हं आता ते चित्र मला दिसेल अशा बेतानं धर.

**सतीश** : तुला लवकर झोप येईल ना ! की अंगाई गीत म्हणू ?

**मन्या** : नको. तसलं काही करू नकोस, तू गाणं म्हणायला लागलास तर मला झोप येणार नाहीच पण शेजारीही जागे होतील.

**सतीश** : मग झोप लवकर. ( मन्या झोपतो. )
( शिवाजी महाराज प्रगट होतात. )

**शिवाजी** : मासाहेब, मासाहेब, आपली इच्छा हीच आपली आज्ञा आणि आपल्या आज्ञेचे पालन करणे हे तो आमचे कर्तव्य– गनिमांच्या ताब्यात असलेल्या त्या कोंडाण्यावर मराठ्यांचा ध्वज फडकावा हे आपले स्वप्न साकार केल्याशिवाय मासाहेब, ह्या शिवबाला आता झोप येणार नाही. ही रात्र सरायच्या आत कोंडाण्याची कवाडे आतल्या बाजूने उघडून दाखवू तरच भोसल्यांची अवलाद म्हणवून घेऊ ! तानाजी मालुसऱ्यासारखे मराठ्यांच्या मनस्वितेचे मानदंड, पराक्रमाच्या वेळी पंचप्राणांची परवा न करता पराक्रमाची पराकाष्ठा करणारे परमवीर जिवाचे जोडीदार असताना मासाहेब, कोंडाण्यावरच काय पण हिंदुस्थानातल्या यच्चयावत गडांवर मराठ्यांच्या विजयाची पताका फडकल्याशिवाय राहणार नाही. ( टाळी वाजवून ) कोण आहे रे तिकडे ?

**सतीश** : मी...मी सतीश...महाराज

**शिवाजी** : तावडतोब जा आणि तानाजी मालुसऱ्यांना आम्ही याद फर्मावल्याची वर्दी द्या. ( सतीश " जी महाराज " म्हणून वाकून मुजरा करतो आणि बाहेर धूम ठोकतो. ) उदयिक सुप्रभाती कोंडाण्याच्या

पायऱ्यांवर मराठ्यांच्या पावलांचे पडसाद उमटावेत– हे तो श्रींची इच्छा !

( बेल, मन्या उठतो. शिवाजी अदृश्य. मन्या दरवाजा उघडतो. सतीश त्याच्या पायावर लोटांगण घालतो. )

**मन्या** : ( मागे सरत ) अरे, अरे !

**सतीश** : क्षमा करा महाराज, क्षमा करा. मला तानाजीचा ॲड्रेस माहीत नाही म्हणून परत आलो. प्लीज, माझी बोटं छाटू नका.

**मन्या** : ( हसत ) काय रे सतीश ? अरे ऊठ. महाराज गेले कधीच !

**सतीश** : मन्या, मन्या मी जातो. तुझ्या घरात भुताटकी आहे.

**मन्या** : नाही रे, त्या थापा आहेत.

**सतीश** : नाही, नाही. आता मला खात्री पटली. मला क्षमा कर. मी चाललो.

**मन्या** : अरे, थांब. मला काही तरी मार्ग सुचव.

**सतीश** : मला आधी बाहेरचा मार्ग दाखव.

**मन्या** : वेड्यासारखं करू नकोस. मला तुझी मदत हवी आहे.

**सतीश** : ( घाईघाईने ) सॉरी ! मी निघतो.

**मन्या** : पाच मिनिटं, फक्त पाच मिनिटं– तुझ्यावर एक काम सोपवतो. तेवढं कर.

**सतीश** : कसलं काम ?

**मन्या** : तुझ्या वहिनीला हे सगळं सांग !

**सतीश** : मी ? का ? तू का नाही सांगत ?

**मन्या** : माझ्यावर विश्वास बसणार नाही तिचा ! कालच्या प्रकारामुळे वैतागली आहे ती माझ्यावर ! ( मन्या 'पोज' घेऊन मरून पडतो. प्रतिमा प्रवेश करते. )

**सतीश** : वहिनी तुम्ही आलात परत ? उशीर केलात वहिनी, खूप उशीर केलात.

**प्रतिमा** : ( बावरून ) का ? काय झालं ?

**सतीश** : मन्यानं आत्महत्या केली.

**प्रतिमा** : ( हातातली सुटकेस गळून पडते. ती सतीशच्या पायावर पडून तो

केकाटतो ) काय ! ! ! आत्महत्या केली ? मला न सांगता ?

**सतीश** : आता हे मला कशाला विचारता ? मी इथं आलो तेव्हा तो शेवटचे आचके देत होता. जाता जाता एवढंच म्हणाला माझ्या बायकोची नीट काळजी घे. आणि लगेच त्यानं डोळे फिरविले. ( मन्या डोळे फिरवतो ) झालं ना आता तुमचं समाधान ! काय मिळालं तुम्हाला त्याच्याशी भांडून ? स्वतःचं नुकसान करून घेतलंत... माझंही नुकसान करून ठेवलंत. आता मी अडी-अडचणीला कुणाकडे हात पसरू ? ( भरल्या गळ्याने ) मन्या ! मन्या, काय केलंस तू हे ? बायकोच्या जाचाला कंटाळून कुणी आत्महत्या का करतं ? अरे, मग मी तर केव्हाच करायला हवी होती ? दोस्ता, जायचंच होतं तर मला तरी सोबत न्यायचं होतंस. ऑफिसच्या कँटीनमध्ये चहाला घेऊन जायचास– आणि टिक ट्वेंटी ?

**प्रतिमा** : ( रडू आवरून ) टिक– ट्वेंटी ?

**सतीश** : हो वहिनी, बिचाऱ्याला झुरळाचं मरण मरावं लागलं ! तुम्ही माहेरी गेलात आणि इकडे त्याने टिक– ट्वेंटीची अख्खी बाटली घशात ओतून घेतली !

**प्रतिमा** : थँक गॉड ! मला वाटलं खिडकीतून उडी घेतली.

**सतीश** : मरताना तुमची सारखी आठवण काढत होता हो ! ( रडू लागतो. )

**प्रतिमा** : रडू नका हो !

**सतीश** : अहो, तुमचा सोन्यासारखा नवरा होता हो तो !

**प्रतिमा** : हो. पण तुम्ही का रडताय ? विधवा झाल्यासारखे ?

**सतीश** : तुम्हाला नाही रडू येत ?

**प्रतिमा** : पंचवीस हजाराचा विमा उतरला आहे त्यांनी !

**मन्या** : ( ताडकन् उठून ) म्हणजे मी मेलो तर चालेल तुला ?

**प्रतिमा** : म्हणजे तुम्ही अजून आहात ?

**मन्या** : मग तुला काय वाटलं मी खरंच मेलो ?

**प्रतिमा** : हुं ! टिक ट्वेंटी घेतल्याचं कळलं तेव्हाच मी ओळखलं की माझ्या नशिबी तो योग नाही. सतीश भाऊजी, टिक– ट्वेंटीनं साधी झुरळं

मरत नाहीत.

मन्या : पण समजा, मेलो असतो मी तर ? चाललं असतं तुला ?

प्रतिमा : चाललं असतं ! अर्ध्यामुर्ध्या सौभाग्यापेक्षा ढळढळीत वैधव्य बरं !

सतीश : वहिनी, काय बोलताय हे !

प्रतिमा : गडकऱ्यांच्या नाटकातलं वाक्य ! सतीश भाऊजी, अहो काय करायचंय असलं सौभाग्य ?

सतीश : म्हणजे ?

प्रतिमा : ह्या ह्या तुमच्या दोस्तानं माझ्या सौभाग्यात भागीदारीण आणली आहे.

सतीश : काय रे मन्या ? खरं का हे ?

मन्या : साफ खोटं आहे रे !

प्रतिमा : सतीशभाऊजी तुमचा कोणावर विश्वास आहे ? माझ्यावर की ह्यांच्यावर ?

सतीश : ह्यानं खरोखरच भानगड केली असेल तर माझा तुमच्यावर विश्वास आहे. ( ओरडून ) भानगड करतोस ? मला न सांगता ?

मन्या : अरे, भानगड वगैरे काही नाही ! हिचा आपला गैरसमज !

प्रतिमा : सतीशभाऊजी, मी माझ्या कानांनी ऐकलं. रात्री झोपेत बरळत होते.

सतीश : काय रे मन्या ? शरम नाही वाटत ? भानगडी करूनच्या करून वर झोपेत बरळतोस ! ह्यापुढे बरळू नकोस !

मन्या : अरे, तिला भास झाला...

प्रतिमा : भास, म्हणे भास ! तुमच्या बरळण्यातला शब्द न् शब्द मला आठवत आहे ! बरं काहो सतीशभाऊजी, झोपेत हे कुणा सुशिला नावाच्या म्हशीला म्हणत होते, तुझ्यात आणि माझ्या बायकोत तिळमात्रही साम्य नाही. तू वडा फास्ट आहेस– आणि माझी बायको बांद्रा लोकल आहे.

सतीश : आणि तू कोण ? मोटरमन ? की गार्ड ?

प्रतिमा : बाहेर मोटरमन आणि घरात गार्ड.

मन्या : अगं पण...

प्रतिमा : एक शब्द सुद्धा बोलू नका... ती मच्छरदाणी आणि मी डास काय ?
सतीश : होय रे ? डी. डी. टी. चा पंप कुठला ?
प्रतिमा : ती हँगिंग गार्डन आणि मी चौपाटी का ?
सतीश : चौपाटी ? वहिनींना तू चौपाटी म्हणालास ? मूर्खा, असं काही बोलू नकोस. भेळवाले गर्दी करतील वरात !
प्रतिमा : शेवटी हे त्या हडळीला म्हणतात कसे, 'तुझ्यात आणि माझ्या बायकोत जमीन अस्मानाचं अंतर आहे.'
सतीश : असं ? तुम्ही ताबडतोब ह्याला अस्मान का नाही दाखवलंत ?
मन्या : अस्मान नाही. पण जमीन मात्र दाखवली. केवढ्या जोराने ढकललंस मला. अजून कंबर दुखते आहे !
प्रतिमा : खोटारडे ! दगाबाज ! काय मिळालं तुम्हाला मला फसवून ? तुमच्यासाठी मी नोकरी करते.
मन्या : मला मान्य आहे.
प्रतिमा : तुमच्यासाठी मी ओव्हरटाईम करते !
सतीश : काय हे पतिप्रेम !
प्रतिमा : तुमच्यासाठी मी पावसाळ्यात दांडीसुद्धा मारते !
सतीश : ( तिच्याकडे डोळे विस्फारून बघत ) पावसाळ्यात दांडी ? काय ही कार्यतत्परता !
प्रतिमा : तुमच्यासाठी एवढं करून सुद्धा तुम्ही माझा असा गळा कापलात ?
सतीश : टेलर आहेस की कसाई ?
प्रतिमा : दुसरी कुणी असती तर एव्हाना पळून गेली असती.
सतीश : अरे मीच पळवून नेली असती ! तुझ्या जाचातून सोडवल्याचं पुण्य तरी लाभलं असतं !
मन्या : ए बाबा, तू कशाला आणखी आगीत तेल ओततोस ? वस्तुस्थिती काय आहे ते सांगून टाक ना तिला.
प्रतिमा : काय हो सतीशभाऊजी, काय आहे वस्तुस्थिती ?
सतीश : ते विचारा त्यालाच ! मी तिला काळी की गोरी हे सुद्धा पाहिलेलं नाही.
मन्या : अरे मघाशी काय घडलं ते सांग ना...

**प्रतिमा** : म्हणजे ? मन्याशी ती सटवी इथं येऊन गेली की काय ?

**सतीश** : सटवी नाही वहिनी– शिवाजी महाराज आले होते इथं–

**प्रतिमा** : शिवाजी महाराज ?

**सतीश** : हो. मन्याला हल्ली विचित्र स्वप्नं पडतात.

**प्रतिमा** : म्हणजे बायकांचीच ना.

**सतीश** : नाही. विचित्र म्हणजे – कंम्प्लीट विचित्र. ह्यानं जर झोपण्यापूर्वी एखादं चित्र पाहिलं तर त्या चित्रातली वस्तू ह्याच्या स्वप्नात येते आणि प्रत्यक्षातही प्रकट होते.

**प्रतिमा** : तुम्ही हे काय बोलताय...त्या बाईचा आणि ह्यांचा काय संबंध ?

**मन्या** : मी सांगतो. काल रात्री माझ्या स्वप्नात एक रेडिओ आला आणि तोच रेडिओ ह्या टेबलावर प्रगट झाला. त्या रेडिओतली श्रुतिका तू ऐकलीस. बांद्रा लोकल वगैरे त्या श्रुतिकेतलं !

**प्रतिमा** : उगाचच थापा मारू नका.

**सतीश** : नाही वहिनी, खरं असेल हो ते.

**प्रतिमा** : अहो काय खरं असेल ! तुम्ही पण ह्यांना सामील झालात वाटतं.

**सतीश** : नाही, तसं काही नाही. पण...

**प्रतिमा** : सतीशभाऊजी, तुम्ही, ह्यांच्या नादी लागू नका. नाहीतर तुम्हीही फुकट जाल. तुमचं बायकोवर प्रेम आहे ना ?

**सतीश** : आहे ना !

**प्रतिमा** : ते प्रेम टिकवायचं असेल तर ह्यांच्या नादी लागू नका. ह्यांचं आता संसारातलं लक्ष पार उडालं आहे ! हल्ली रात्री हे नीट वागत नाहीत !

**सतीश** : म्हणजे करतो तरी काय असं ?

**प्रतिमा** : काहीच करत नाही ! ( मन्याचा चेहरा केविलवाणा ) नुसते तळमळत असतात...कुणाच्या तरी आठवणीनं. मध्येच मांजर, मांजर करून किंचाळत उठतात. एकदा तर हत्ती हत्ती करीत ओरडत उठले.

**मन्या** : त्या तसल्या स्वप्नामुळे !

**प्रतिमा** : गप्प बसा ! केव्हाचं आपलं स्वप्न स्वप्न करतायत ! बरं का हो

सतीशभाऊजी, माझं एक फार मोठं स्वप्न होतं !

**सतीश** : म्हणजे तुम्हालाही स्वप्नं पडतात का ?

**प्रतिमा** : माझं सुखी संसाराचं एक स्वप्न होतं.

**सतीश** : म्हणजे कसं काय ?

**प्रतिमा** : हेच की– घर कसं भरलेलं असावं !

**मन्या** : भरेल, भरेल. मुलंबाळं झाली की...

**प्रतिमा** : ( वैतागून ) मुलांचं नाही म्हणत मी.

**मन्या** : मग ?

**प्रतिमा** : दोन वर्षं झाली आपल्या लग्नाला– घरात एकतरी नवीन वस्तू आली का ?

**मन्या** : कशी येणार ? तुझ्या बापानं हुंडा दिला का ?

**प्रतिमा** : पण नोकरी करणारी मुलगी तर दिली ना ! दोघांच्या पगारात काय शक्य नाही ? त्या शेजारच्या देशपांडेबाई बघा...

**मन्या** : ( लाजून ) त्यांच्याकडे मी कशाला बघू ?

**प्रतिमा** : त्या नोकरी करत नसतानासुद्धा त्यांचे मिस्टर त्यांना महिन्याला नवीन साडी आणतात !

**मन्या** : अगं, त्यांचं कपड्याचं दुकान आहे. न खपलेल्या साड्या देत देत असतील आणून बायकोला.

**प्रतिमा** : बरं त्यांचं एक राहू द्या. पण त्या खालच्या मजल्यावरच्या पाटलीण-काकूंच्या मिस्टरांचं तर कसलं दुकान नाही ? त्यांच्या घरात गेल्या आठवड्यात फ्रिज आला.

**मन्या** : अगं तिचा नवरा इन्कमटॅक्स ऑफिसर आहे. मी साधा कारकून आहे बँकेतला ! आमच्या खात्यावर क्रेडिटपेक्षा डेबिट एन्ट्रीच जास्त !

**प्रतिमा** : हो ! हो ! ! जगात जसे काही तुम्हीच कारकून आहात. सतीश-भाऊजी नाहीत ? काय हो, सतीशभाऊजी ?

**सतीश** : अं ? हो...हो, कारकूनच आहे पण अप्पर डिविजन.

**प्रतिमा** : अहो अप्पर काय आणि लोअर काय. कारकुंडा तो कारकुंडा ! पण तुमच्या घरी म्हणे टी. व्ही. आला आहे.

सतीश : हो. गेल्या आठवड्यात घेतला खरा- हप्त्यानं. आणल्यानंतर तिसऱ्याच दिवशी बिघडला.

प्रतिमा : बिघडलेला का असेना- पण घरात टी. व्ही. आहे. तुम्हाला ते परवडतं...आम्हाला साधा रेडिओ घेता आला नाही दोन वर्षात.

मन्या : ठीक आहे. पुढल्या पगाराला आपण रेडिओ आणू!

प्रतिमा : मला काही नको रेडिओ फिडिओ. लोक टी. व्ही. घेतात. फ्रिज घेतात. स्कूटर घेतात.

मन्या : (वैतागून) लोक जीवसुद्धा घेतात. मला हे सगळं परवडणार नाही!

सतीश : बरोबर आहे, वहिनी, मन्याचा पगार केवढासा!

प्रतिमा : काही कमी नाही पगार. तुमच्यापेक्षा शंभर रुपये जास्तच मिळतात त्यांना. शिवाय माझाही पगार आहेच.

मन्या : अगं पण जरा आपल्या खर्चाचा विचार कर! ब्लॉकसाठी लोन घेतलं...त्याचे हप्ते जातात महिन्याच्या महिन्याला. शिवाय पी. एफ. आहे. विमा आहे, झालंच तर दिवाळीफंडाचे हप्ते आहेत. हे सगळं वजा होऊन हातात पडणाऱ्या पगारातून गावी पैसे पाठवावे लागतात...उरला तुझा पगार. तो तुझ्या वेणी-फणीलाही पुरत नाही.

प्रतिमा : काढलीत माझी वेणीफणी! वाटलंच मला- मेलं कधी नव्हे ती थोडी फॅशन केली तर लगेच बोलून दाखवतात. तिला मात्र रोज वेणी न् गजरे घेऊन देत असाल. माझं मेलीचं नशीबच फुटकं! (मुसमुसू लागते.)

सतीश : हे बघ मन्या, ज्या अर्थी वहिनी पुन्हा पुन्हा तिच्याविषयी बोलतात त्या अर्थी तुझी नक्कीच कुणीतरी ती असली पाहिजे आणि असलीच तर ती कोण हे मला समजलंच पाहिजे.

मन्या : म्हणजे ? तुझासुद्धा माझ्यावर विश्वास नाही ? अरे माझी कुणीही 'ती' नाही. माझी फक्त 'ही' आहे.

प्रतिमा : मग सुशिला कोण ?

मन्या : अगं ती त्या रेडिओतली...स्वप्नातल्या रेडिओतली.

प्रतिमा : बंडल मारू नका, तुमची नजरच सांगते ! मला फसवायचंच होतं तर माझ्याशी लग्न तरी कशाला केलंत ? काय हो सतीशभाऊजी, बरोबर आहे की नाही ?

सतीश : हो. लग्न तरी कशाला केलंस ?

प्रतिमा : आणि लग्नच करायचं होतं- तर फसवलंत कशाला ? काय हो सतीशभाऊजी, बरोबर आहे की नाही ?

सतीश : अगदी बरोबर आहे.

प्रतिमा : केवढी मोठमोठी स्थळं मला सांगून आली होती. ती सगळी नाकारून मी तुम्हाला पत्करलं ! आणि तुम्ही मला हे दिवस दाखवलेत ! तुमच्या जागी दुसरा कुणी असता तर बायकोला घेऊन नाचला असता- काय हो सतीशभाऊजी, बरोबर आहे की नाही ?

सतीश : बरोबर आहे. पण माझी बायको माझ्यापेक्षा सुटली आहे ! नाहीतर मीही नाचलो असतो.

मन्या : काय रे ठोंब्या- तू मित्र कुणाचा ? माझा की तिचा ?

प्रतिमा : इथे मैत्रीचा काय संबंध ? वस्तुस्थिती ती वस्तुस्थिती ?

मन्या : बरं मग तुझं म्हणणं काय आहे ?

प्रतिमा : ती सुशिला का कोण आहे ती मला दाखवा.

मन्या : अगं, ती मुळी अस्तित्वात नाही. तो निव्वळ भास होता. मघाशी ह्या सतीशला सुद्धा इथे शिवाजी महाराज आल्याचा भास झाला. काय सतीशभाऊजी, बरोबर आहे की नाही ?

सतीश : ( गोंधळून ) बरोबर आहे, वहिनी – आपलं भाउजी.

प्रतिमा : सतीशभाऊजी, तुम्हीही यांना सामील झालात ना !

सतीश : नाही वहिनी, तसं काही नाही. प्रथम माझाही विश्वास बसला नाही. पण ह्याने खात्री पटवून दिली. काय ती दाढी- काय ते...

प्रतिमा : माझीही खात्री पटली आहे- तुम्ही दोघंही लुच्चे आहात.

मन्या : आता बोला सतीशभाऊजी. अहा रे सतीशभाऊजी !

सतीश : वहिनी, माझ्यावर विश्वास नाही का तुमचा ?

प्रतिमा : आतापर्यंत होता- आता नाही. तुम्ही सगळे पुरुष इथून तिथून

सारखेच गाजरपारखे!

**सतीश** : वहिनी. मी तुम्हाला खरं खरं तेच सांगतो– मन्या आजारी आहे. त्याला मदत करायला हवी. नाहीतर माझा हा मित्र कामातून जाईल हो– कामातून जाईल!

**प्रतिमा** : पुरे पुरे! दाखवलंत तेवढं मित्रप्रेम पुरे झालं. मला वाटलं होतं तुम्ही ह्यांना चार शब्द ऐकवाल. आपल्या कर्तव्याची जाणीव करून द्याल! पण तुम्ही तर त्यांना सामील होऊन प्रोत्साहन देताहात?

**सतीश** : नाही हो, तसं काही नाही.

**प्रतिमा** : ते तसंच आहे. त्या सुशीला प्रकरणात तुमचीही भागीदारी दिसते.

**सतीश** : तसं असतं तर किती बहार आली असती! पण नाही हो, वहिनी! तुम्ही उगाच संशय घेताय. तुम्ही त्याच्याशी भांडू नका!

**प्रतिमा** : अहो, भांडू काय नका. उभं आयुष्य काढायचंय मला त्यांच्याशी!

**सतीश** : पण अशाच भांडत राहिलात तर बिचाऱ्याचं उभं आयुष्य लवकरच आडवं होईल.

**प्रतिमा** : ते आमचं आम्ही बघून घेऊ. तुम्हाला त्यांच्या बाजूनं बोलायचं कारण नाही!

**सतीश** : भले शाबास! मघाशी तुमच्या बाजूनं बोलत होतो तेव्हा काही कारण होतं वाटतं!

**मन्या** : तुला तिच्या बाजूनं बोलायला सांगितलं होतं कुणी? तू बोलला नसतास तर आगीत तेल पडलं नसतं.

**प्रतिमा** : तुमच्यासारख्या आगलाव्या मित्रामुळेच घरं बरबाद होतात.

**सतीश** : अरे!!! पण मी तुम्हा दोघांच्या भल्यासाठीच...

**प्रतिमा** : त्यासाठी दोघांच्याही बाजूनं बोलायची काय गरज?

**सतीश** : अहो पण...

**प्रतिमा** : हा दुतोंडेपणा तुम्हाला शोभला नाही.

**मन्या** : आज केलास तो केलास– पुन्हा करू नकोस.

**सतीश** : पण मी तुम्हा दोघांचं समाधान करण्यासाठीच...

**प्रतिमा** : आमचं समाधान करणारे तुम्ही कोण? आम्ही एकमेकांचं समाधान करायला समर्थ आहोत.

सतीश : तुम्ही भांडत होता म्हणून...
प्रतिमा : आम्ही एकमेकांशी भांडू नाही तर तंडू...
मन्या : एकमेकांना मारू नाहीतर झोडू...
प्रतिमा : एकमेकांना धरू किंवा सोडू.
सतीश : चूप!!! तुम्हाला जे काय करायचं असेल ते एकमेकांना करा. मी चाल्लो.
प्रतिमा : खुशाल जा. दरवाजा उघडा आहे.
मन्या : खिडकीपण उघडी आहे.
सतीश : थँक्यू, मी लिफ्टने जाणार आहे.
प्रतिमा : लिफ्ट बिघडलेली आहे.
मन्या : आणि जिना मोडला आहे.
सतीश : अरे, काय लावलंय काय तुम्ही हे? माणसं आहात की कोण आहात? सालं, ज्याचं करायला जावं बरं...
प्रतिमा : बरं बरं, या आता.
सतीश : पुन्हा तोंड पाहणार नाही तुमचं!
मन्या : आणि तुझंही दाखवू नकोस (जातो. ओरडून) गेल्या महिन्यात घेतलेले पन्नास रुपये उद्याच्या उद्या परत कर.
प्रतिमा : (दारातूनच) बायकोला म्हणावं असले छपन्न टी. व्ही. बघितलेत ...ऐकलंत का?
मन्या : जाऊ दे. गेला तो. (परत येतात).
प्रतिमा : दुतोंड्या कुठचा.
मन्या : जाऊ दे, गेलेल्या माणसाबद्दल वाईट बोलू नये.
प्रतिमा : नाही, पण तुम्हीच सांगा, एकदा माझी बाजू घेतल्यावर तुमच्या बाजूने बोलायचं काही कारण होतं का?
मन्या : बरं बोलायचंच होतं माझ्या बाजूनं तर मग आधीपासूनच का नाही बोलला?
प्रतिमा : निदान नंतर तरी बोलायचं नव्हतं त्यानं तुमच्या बाजूनं! शेवट-पर्यंत खरं बोलायला काय झालं होतं!
मन्या : जाऊ दे. असते एखाद्याला सवय! तू शांत हो! भांडून भांडून

थकली असशील ! चल मी तुझ्या गळ्याला व्हिक्स लावतो.

**प्रतिमा** : असला कसला हा मित्र. म्हणे सुशिला बिशीला कुणीही नाहीच अस्तित्वात.

**मन्या** : हे...हे मी म्हणालो अं ! इफ आय मिस्टेक नॉट !

**प्रतिमा** : अहो, तो सुद्धा म्हणाला. तुम्ही खोटं बोललात तर ते मी समजू शकते. पण त्यानं कशाला खोटं बोलावं ?

**मन्या** : तो खोटं नाही ग बोलला...

**प्रतिमा** : अहो, रात्री मी माझ्या कानांनी ऐकलं तुम्ही काय बरळत होता ते...तो काय सांगतो. आपलं चांगलं चाललंय ते बघवत नाही त्याला.

**मन्या** : ( गोंधळून ) असेल. असेल !

**प्रतिमा** : मी म्हणते असेल तुमची कुणी सुशिला– असेल कशाला, आहेच ! ह्याला 'नाही' म्हणायचं काय कारण ? तिच्या झिंज्या उपटायला मी समर्थ आहे ना ?

**मन्या** : अगं, तू माझं ऐक. त्याचं बोलणं काय एवढं मनावर घेतेस.

**प्रतिमा** : पण चक्क खोटं बोलतो म्हणजे काय !

**मन्या** : हे बघ, आता आपण झोपू या ? आज रात्री मी कदाचित पुन्हा बरळेन. जर मी सुशिलाबद्दल काही बोललो तर मला ताबडतोब जागं कर, मग मीच उद्या जाऊन सांगतो त्याला, 'हो, आहे माझी एक सुशिला, तुला काय करायचंय ?' मग तर झालं ?

**प्रतिमा** : ठीक आहे. पण नक्की हं. मी जाते.

**मन्या** : जातेस ? कुठे ?

**प्रतिमा** : झोपायला.

**मन्या** : हो ! चला.

**प्रतिमा** : चला काय ? तुम्ही इथेच झोपा. ती सुशिला कोण ह्याची शहानिशा होईपर्यंत मी एकटी झोपणार !

**मन्या** : मग आलीस तरी कशाला परत ? एकटी झोपलीस काय आणि माहेरी गेलीस काय, मला सारखंच !

**प्रतिमा** : सारखंच कसं ? माहेरी गेले असते तर घर मोकळं मिळालं असतं

तुम्हाला. मग सगळ्या रंभा, मेनका घेऊन आला असता घरात. पण तुम्ही एक वस्ताद तर मी दोन वस्ताद. माहेरी जाण्यापेक्षा उद्या मी आईलाच बोलावून घेते इथे.

मन्या : आई ग !

प्रतिमा : तुमच्या सगळ्या भानगडींचा छडा लावल्याखेरीज मला स्वस्थ झोप येणार नाही. तुमच्या शेजारी तर नाहीच नाही. ( एक उशी आणि चादर घेऊन आत जाताना ) आणि तुम्हाला बजावून ठेवते... त्या खोलीत तुम्ही यायचं नाही. तसं कशाला मी आतून कडीच लावून घेते. म्हणजे झालं ( जाते आणि आतून कडी लावून घेते. )

मन्या : प्रतिमा ! प्रतिमा दार उघड ! मला एकट्याला भीती वाटतेय. प्रतिमा, प्रतिमा प्लीज– ( काहीच उत्तर नाही. पुन्हा ) प्रतिमा, तुला माझी शपथ आहे. दार उघड. नाहीतर मी सकाळी जिवंत आढळणार नाही तुला. प्रतिमा, दार उघड, नाही तर बघ, मी फार वाईट माणूस आहे. राग आला तर भिंतीवर डोकं आपटून घेईन. नाही तर खिडकीतून उडी घेईन. अगं ऐकतेयेस ना ? हा बघ मी खिडकीकडे चाललो. आता मी खिडकीपासून फक्त दोन पावलांवर आहे. हा बघ खिडकीवर चढलो. आता माझे दोन्ही पाय बाहेर आहेत. मी पाच म्हणायच्या आत दरवाजा उघड ( पलंगावर चढतो ) एक...दोन...तीन...चार चार...( ओरडून ) चार... चार प्रतिमा चार ( पुटपुटतो ). पाच वेळा चार म्हणलो तरी गधडी दार उघडत नाही. ( ओरडून ) पाच. ही बघ मी टाकली उडी ! ( आतून प्रतिमा ' टाका, टाका खुशाल टाका. ' तो उडी टाकतो आणि कळवळतो. ) आय ग ! मेलो मेलो. चवथ्या मजल्यावरून पडून मेलो. ( आतून प्रतिमा ' लागलं तर नाही ना ? ' तो गुडघे चोळतो. ' गुडघ्याला लागलं वाटतं. कपाटात आयोडेक्स आहे ते घ्या आणि चोळा.') च्यायला, हिला कळलं कसं ? (' अहो मी दरवाज्याच्या फटीतून बघतेय तुमची खिडकी ! होः होः होः ' ) साली माझी तंगडी मोडली तरी फिदीफिदी हसते. जा गेलीस उडत. मी पण मस्का लावणार नाही ! ह्यापुढे बेडरूमचा दरवाजा तुला बाहेरून

बंद. (कडी घालतो) आता आयुष्यभर मी एकटा झोपणार. आता ब्रह्मचर्य हेच जीवन (झोपू लागतो. टेबलावर तिचा फोटो बघून) तुझा फोटोसुद्धा नकोय मला डोळ्यासमोर. (फोटोला उद्देशून) तेव्हा मारे लांबलचक वचनं दिलीस. वाट्टेल त्या परिस्थितीत साथ देईन म्हणून. ही तुझी साथ नाही का? जा कॉटखाली. (फोटो कॉटखाली टाकतो आणि तोंडावर पांघरूण घेऊन झोपतो.) गुड नाईट माय डिअर वाईफ, गुड नाईट फॉर एव्हर! (काही वेळाने धीरगंभीर पार्श्वसंगीत सुरू होते आणि प्रतिमा बेलबॉटम ड्रेस परिधान केलेली प्रगट होते आणि मन्याच्या केसातून बोटे फिरवायला लागते. मन्या हे सगळे स्वप्नात बघतो आहे.)

मन्या : आता का आलीस?

प्रतिमा : तुमच्याशिवाय राहवेल तर ना!

मन्या : मग माझ्याशी भांडतेस का?

प्रतिमा : तुमचं माझ्यावर प्रेम नाही म्हणून!

मन्या : गैरसमज आहे तुझा. माझं तुझ्यावर, फक्त तुझ्यावर प्रेम आहे. अगं, दुसरं कोण मला चान्स देणार? माझा पगार तो केवढासा!

प्रतिमा : माझा साधा वाढदिवस देखील लक्षात राहात नाही तुमच्या!

मन्या : बरं, ह्यापुढे न विसरता लक्षात ठेवीन!

प्रतिमा : ह्या खेपेला काय प्रेझेंट देणार मला वाढदिवसाला.

मन्या : काय हवंय बोल! मागशील ते देईन!

प्रतिमा : मला किनई मोटार हवीय छानपैकी!

मन्या : ठीक आहे. येत्या पगाराला घेऊन येतो. उद्याच वाण्याला सांगून ठेवतो.

प्रतिमा : ड्रायव्हिंग मीच करणार हं!

मन्या : ठीक आहे तू ड्रायव्हिंग कर– मी हॉर्न वाजवीन पण जरा हळू चालव हं गाडी.

प्रतिमा : इश्श! हळू चालवायला ती काय बैलगाडी आहे! मी खूप फास्ट चालवणार!

मन्या : (केविलवाणा) काय मज्जा येईल नाही? ए, पण समोर झाड

आलं तर गाडी साईडने घेशील ना ?

प्रतिमा : इश्श ! रस्त्यावर झाड असतं वाटतं.

मन्या : असं असं– म्हणजे तू रस्त्यावरूनच गाडी चालवणार आहेस तर.

प्रतिमा : आपण किनई खूप दूर दूर दूर जाऊ...इंग्लंड-अमेरिका !

मन्या : इंग्लंड-अमेरिकेला मोटारीने ?

प्रतिमा : विमानाने हो ! विमान किनई तुम्ही चालवायचं.

मन्या : काहीतरीच काय ! मला साधी सायकल चालवता येत नाही आणि तुम्ही म्हणे विमान चालवायचं !

प्रतिमा : मी शिकवीन तुम्हाला. तुमच्या शेजारीच बसेन मी. आपण खूप गंमत करू...खालून वर...वरुन खाली... मागे पुढे... पुढे मागे झूऽऽऽम आणि ढगावरून विमान जायला लागलं की मी तुम्हाला गुदगुल्या करीन, ( गुदगुल्या करू लागते. )

मन्या : अगं नको. थांब. माझा ताबा सुटेल ना विमानावरचा. ( दारावर धडका बसू लागतात ) अगं अगं, बघ बघ आता सुटणार... सुटलाच ताबा...कोसळलो...मेलो...पॅराशूट...विमान पडतंय... कुणीतरी झेला झेला. ( प्रतिमा निघून जाते. ) प्रतिमा, प्रतिमा तू कुठे आहेस ? (आतून 'दार उघडा दार उघडा लवकर' असा आवाज येतो.) प्रतिमा, अगं तू गुदगुल्या करायला नको होत्यास ग ! आता तू कुठे असतील. (रडतो) तुझं डोकं कुठे असेल ? ( रडतो) तुझे पाय कुठे असशील ? (रडतो) तरी मी म्हणत होतो तू गुदगुल्या करू नकोस. ( रडतो ) मला हसवू नकोस. ( रडतो ) पण तू ऐकलं नाहीस आणि आता मला एकटा सोडून तू चालती झालीस पलिकडच्या जगात ? प्रतिमा– ('अहो दार उघडा') अगं तू कुठून बोलते आहेस ? स्वर्गातून की नरकातून ? ( 'आधी दार उघडा मग सांगते मी कुठून बोलते ते !')अगं मलाही ने ग तुझ्यावरोबर ! ( 'दार उघडा मग बघते कोणाबरोबर जाता ते...' मन्या आता नीट जागा झाला आहे.) अरे ! मी खाली कसा ? प्रतिमा...अगं तू कुठायस ? ( दरवाज्याचा आवाज ऐकून धावत जाऊन दरवाजा उघडतो.)

प्रतिमा : कुठाय ती सटवी ?
मन्या : कोण ?
प्रतिमा : आता जी तुमच्याजवळ बसली होती ती ?
मन्या : अगं तूच तर बसली होतीस !
प्रतिमा : खोटं बोलू नका ! मी तर त्या खोलीत होते !
मन्या : मग मघाशी माझ्याशी बोलत होती ती कोण ?
प्रतिमा : तेच मी तुम्हाला विचारतेय ! कुठाय ती ? सटवीला इथेच कुठेतरी शिरताना पाहिली मी ! ( कॉटखाली वाकून बघते. ) इथे तर कुणीच नाही. खिडकीतून तर नाही पळाली ?
मन्या : कसं शक्य आहे आपण चवथ्या मजल्यावर राहतो.
प्रतिमा : अहो मग ती आली कुठून ( दरवाजाकडे जाते. ) दरवाजा तर बंद आहे. मग ती आली कुठून ?
मन्या : सांगू ? तुझा विश्वास बसणार नाही ?
प्रतिमा : विश्वास ठेवा बाजूला ! ती कुठून आली ते सांगा !
मन्या : ती आली नाही प्रगट झाली. माझ्या स्वप्नातून ! स्वप्नातल्या त्या रेडिओसारखी– कॅलेंडरमधल्या शिवाजीसारखी.
प्रतिमा : व्हॉट नॉन्सेन्स ? कसं शक्य आहे ?
मन्या : सांगतो, सांगतो, ( कॉट खालून तिचा फोटो बाहेर काढीत ) हा फोटो बघ, झोपण्यापूर्वी हा फोटो बघितला होता मी !
प्रतिमा : अहो कसले फोटो-बिटो पाहताय. (फोटोकडे लक्ष जात) हीच ती सटवी !
मन्या : सटवी काय ! नीट बघ, तुझाच फोटो आहे तो– चार वर्षांपूर्वीचा.
प्रतिमा : अय्या खरंच की ! पण...पण...म्हणजे तुम्ही मघाशी स्वप्नाबद्दल सांगत होता ते...ते खरं होतं...?
मन्या : हो आणि ती सुशिला वगैरे सगळं खोटं होतं. माझ्या स्वप्नात रेडिओ आला. तो इथे प्रगट झाला आणि... ( प्रतिमा बेशुद्ध पडायच्या बेतात येते. ) प्रतिमा, काय झालं ग ? घेरी आली की काय ! ए, बेशुद्ध पडणार असशील तर एक गोष्ट सांगून ठेव !
प्रतिमा : ( मोठ्या कष्टाने ) काय ?

**मन्या** : कांदा कुठे ठेवला आहेस ?

(प्रतिमा बेशुद्ध पडताना हात किचनकडे करते आणि पडते. तो तिला सावरत असतानाच काळोख.)

पडदा पडतो.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. २०८७६ नों. दि ........
........ क्र. १८७१८ ........

# अंक २ रा

## प्रवेश १ ला

[ स्थळ : तेच
वेळ : संध्याकाळची.
प्रतिमा मासिक वाचत बसलेली आहे. दारावरची बेल वाजते. ]

**प्रतिमा** : दार उघडंच आहे.

**डॉक्टर** : एक्स्क्यूज मी, मिस्टर मनोहर लेले ?

**प्रतिमा** : इथेच राहतात. आपण कोण ?

**डॉक्टर** : मी आत्माराम भेंडे. तुमच्या मैत्रिणीने– मिसेस देसाईंनी मला तुमच्याकडे पाठवलं आहे. तुमच्या मिस्टरांना स्वप्न वगैरे...

**प्रतिमा** : हो, हो, या, आत या ना ! (तो आत आल्यावर) काय नाव म्हणालात आपलं.

**डॉक्टर** : आत्माराम भेंडे.

**प्रतिमा** : नाव कुठंतरी ऐकल्यासारखं वाटतंय ! पेपरमध्ये छापून येतं कधी कधी ?

**डॉक्टर** : तो...तो आत्माराम भेंडे वेगळा. तो ॲक्टर आहे, मी डॉक्टर आहे. तो कुठे मी कुठे ! तसं माझंही नाव माझ्या क्षेत्रात सुप्रसिद्ध

आहे. मानसशास्त्रात माझा हात धरणारा कुणी नाही– पाय धरणारे बरेच आहेत. तुमच्या मैत्रिणीला विचारा. तिचे मिस्टर वेड्यांच्या इस्पितळात जाण्यापूर्वी माझ्याकडेच यायचे !

प्रतिमा : ( केविलवाणा चेहरा करून ) असं ?

डॉक्टर : हो. ह्या क्षेत्रात मी इतका अनुभवी आहे की तुमच्या नवऱ्याकडे नुसतं पाहून मी सांगू शकेन– की तो तुमचा नवरा आहे.

प्रतिमा : ( पुटपुटत ) ते मीही सांगू शकेन !

डॉक्टर : कोणत्याही प्रकारचा मनोविकार मी चुटकीसरशी बरा करू शकतो. औषधोपचारापेक्षा माझा मानसोपचारावर जास्त विश्वास आहे.

प्रतिमा : बसा ना डॉक्टर ! ह्यांची त्या विचित्र स्वप्नापासून मुक्तता होईल असं वाटतं ना तुम्हाला ?

डॉक्टर : हे त्यांना तपासल्याशिवाय कसं सांगणार ? त्यांच्या स्वप्नातल्या वस्तू खरोखरच प्रगट होतात की नाही ते आधी बघितलं पाहिजे.

प्रतिमा : पण मी वर्णन करून सांगितलं तर !

डॉक्टर : तेवढ्यावर नाही भागायचं. वर्णनावरून बांधलेले अंदाज बहुधा चुकतात, असा माझा अनुभव आहे. अलिकडेच घडलेला प्रसंग सांगतो. एक गृहस्थ काही दिवसांपूर्वी माझ्याकडे आला. मला म्हणाला, ' डॉक्टरसाहेब, मला आमच्या गल्लीत वाघ दिसला. ' मी म्हटलं, ' अहो, मुंबईत कुठला आला वाघ ? ठीक आहे त्याचं वर्णन करून सांगा ! ' त्याने वर्णन केल्यावर मी ओळखलं. त्याला टायगरसायटीस झालेला आहे. मी त्याला एक इंजेक्शन देऊन घरी पाठवलं. दुसऱ्या दिवशी तो परत आला म्हणाला, ' डॉक्टर-साहेब, मला आमच्या घरात वाघ दिसला.' मी ठरवलं ह्याला टाय-गरसाइटीस– प्लस बायको-फ्रायटनेस झालेला आहे. मी त्याला काही झोपेच्या गोळ्या देऊन घरी पाठवलं !

प्रतिमा : मग ? झाला का बरा तो ?

डॉक्टर : नंतर तो आलाच नाही. एका आठवड्याने मी त्याच्या घरी गेलो, बिल वसूल करायचं होतं म्हणून. बघतो तर त्याच्या घराला टाळा. मी शेजारी चौकशी केली. शेजारी म्हणाला, ते गेले. त्यांना वाघानं

खाल्लं.' तेव्हापासून मी प्रत्यक्ष खात्री केल्याशिवाय उपचार करत नाही.

**प्रतिमा** : मग ते येईपर्यंत आपल्याला थांबावं लागेल.

**डॉक्टर** : मला घाई नाही. तोपर्यंत आपण इतर गोष्टी उरकून घेऊ! आता मला सांगा, तुमच्या मिस्टरांना ह्या स्वप्नांमुळे काही त्रास होतो का?

**प्रतिमा** : त्यांना नाही, पण मला होतो ना! अलिकडे त्यांच्या स्वप्नात बायका यायला लागल्या आहेत. कालच एक सटवी इथे प्रगट झाली होती. जर अदृश्य झाली नसती तर मी तिला चांगली लोळवली असती.

**डॉक्टर** : नट् नॅचरल! तुमच्या जागी मी असतो तर मीही लोळवली असती! पण काय हो–काल जी बाई प्रगट झाली होती–तिला तुम्ही पूर्वी कधी पाहिलं होतं?

**प्रतिमा** : हो.

**डॉक्टर** : कुठे?

**प्रतिमा** : फोटोत!

**डॉक्टर** : म्हणजे?

**प्रतिमा** : काल जी बाई इथे प्रगट झाली ती दुसरी तिसरी कुणी नसून मीच होते.

**डॉक्टर** : (गोंधळून) तुम्ही काय बोलता आहात हे...हे मला समजतंय ना? नाही म्हणजे तुमची बोलण्यात चूक होते आहे का माझी ऐकण्यात?

**प्रतिमा** : चूक वगैरे काही नाही. ह्यांनी झोपण्यापूर्वी माझा फोटो पाहिला आणि मी इथे प्रगट झाले.

**डॉक्टर** : हे तुम्हाला कसं कळलं?

**प्रतिमा** : मी दाराच्या फटीतून पाहिलं.

**डॉक्टर** : दाराच्या फटीतून म्हणजे?

**प्रतिमा** : मी बेडरूममध्ये झोपले होते! ते इथे झोपले होते.

**डॉक्टर** : असं असं! ऑं? नवरा इकडे आणि बायको तिकडे? फॅमिली प्लॅनिंग वाटतं!

**प्रतिमा** : नाही. जरा वाजलं होतं आमचं! म्हणून मी रागारागाने बेडरूम-मध्ये गेले आणि दरवाज्याला कडी लावून घेतली.

**डॉक्टर** : बरं मग ?

**प्रतिमा** : काही वेळाने मला ह्या खोलीत बाईचा आवाज ऐकू आला. मी दरवाज्याच्या फटीला डोळा लावला तर माझ्यासारखीच दिसणारी बाई ह्या पलंगावर बसून त्यांच्याशी लगट करताना दिसली.

**डॉक्टर** : बघा, नवऱ्याशी भांडण केलं की असं होतं!

**प्रतिमा** : डॉक्टरसाहेब, कसंही करून ह्यांना वाचवा. तुम्ही मागाल ती फी मी देईन.

**डॉक्टर** : मागेन ती फी द्याल ? ( अधाशी नजरेने बघतो. )

**प्रतिमा** : म्हणजे ?

**डॉक्टर** : म्हणजे तुम्ही फी द्याल हो– पण मी घेईन तेव्हा ना! तुमच्या-कडून पैशाची अपेक्षा काय करायची ? आयुष्यात इतकी चटकदार केस पहिल्यांदाच हातात येत आहे. इट् विल बी ए प्लेजर टू डू समथिंग फॉर यू! (तिच्या जवळ जात) हा जो मानसिक विकार आहे...

**प्रतिमा** : तो ह्यांना झाला आहे...

**डॉक्टर** : मी त्यांच्याबद्दलच बोलतोय. त्यांचा हा विकार बरा करून तुम्हाला सुखी करायचं हेच आता माझं ध्येय.

**प्रतिमा** : थँक्यू डॉक्टर.

**डॉक्टर** : आज मी त्यांना तपासतो आणि ताबडतोब मानसोपचारांना सुरुवात करतो. आता माझ्या काही प्रश्नांना नीट विचार करून उत्तरं द्या– प्रश्न पहिला– तुमचं तुमच्या नवऱ्यावर प्रेम आहे ?

**प्रतिमा** : आहे थोडंसं!

**डॉक्टर** : समजा, एखादा फार मोठा माणूस तुमच्या प्रेमात पडला. उदा-हरणार्थ माझ्यासारखा. तर तुम्ही तुमच्या नवऱ्याला सोडायला तयार व्हाल ?

**प्रतिमा** : भलतंच काय विचारता डॉक्टर!

**डॉक्टर** : रोग्याच्या मनाचा शोध घेण्यासाठी विचारतोय मी. कित्येक पुरुषांना

बायकोमुळे वाईट स्वप्नं पडतात. एकाला तर इतकी भयंकर स्वप्नं पडायची की त्याच्या स्वप्नात बायकोच यायची. विशेषतः तो दुसऱ्या बाईच्या घरी असताना ! तेव्हा—

**प्रतिमा** : ह्यांना सोडण्याची कल्पनाच मला सहन होत नाही. अहो, पुढल्या वाढदिवसाला हिऱ्यांचा नेकलेस देणार आहेत मला ते. तो नेकलेस पदरात पडेपर्यंत तरी मी त्यांना सोडणं शक्य नाही आणि तो नेकलेस घेणं ह्यांना ह्या जन्मी तरी शक्य नाही.

**डॉक्टर** : ( तिच्याकडे निरखून बघत ) आय सी ! ठीक आहे. आता रात्रीच्या प्रसंगाचं हुबेहूब वर्णन करू शकाल तुम्ही ?

**प्रतिमा** : हो. हे इथे असे झोपले होते. ( डॉक्टर कॉटवर झोपतो ) त्यांच्या हातात माझा फोटो होता !

**डॉक्टर** : कुठं आहे तो फोटो ?

**प्रतिमा** : तो मी कपाटात ठेवून दिला.

**डॉक्टर** : बरं, ठीक आहे. तर तो फोटो त्यांच्या हातात होता.

**प्रतिमा** : नंतर तो त्यांनी कॉटखाली टाकला ! काही वेळाने ती इथे प्रगट झाली आणि त्या तिथे बसली.

**डॉक्टर** : बसा. ( ती बसते. ) पुढे ?

**प्रतिमा** : त्यांनी तिचा डावा हात हातात घेतला.

**डॉक्टर** : घेतला. ( तिचा हात हातात घेतो. )

**प्रतिमा** : तो उजवा आहे.

**डॉक्टर** : ( तो तिचा डावा हात हातात घेतो. ) चालेल ! पुढे ?

**प्रतिमा** : पुढे...

( मन्या प्रवेश करतो. ते विलक्षण दृश्य पाहून भडकतो. )

**मन्या** : अरे काय चाललंय काय हे ?

( दोघेही गडबडतात...घाबरतात.) हरामखोर, बदमाश, बोल, कोण आहेस तू ?

**डॉक्टर** : मी...मी...

**प्रतिमा** : अहो, ते...

**मन्या** : माझ्या कॉटवर झोपून माझ्या बायकोच्या अंगाला हात लावतोस !

प्रतिमा : अहो, पण...

मन्या : चूप ! एक शब्द बोललीस तर थोबाड फोडीन !

डॉक्टर : अहो, अहो...

मन्या : हलकट, बदमाश, पाजी–! दिवसाढवळ्या घरात शिरून माझ्या बायकोवर हात टाकतोस ! तुझ्या बापाचा माल आहे ? ( त्याच्या रोखाने धावतो. )

प्रतिमा : अहो, ते तसे नाहीत...

मन्या : तू होतेस की नाही बाजूला ! ( ती टुणकन उडी मारून बाजूला होते ) माझ्या बायकोकडे वाकड्या नजरेने बघतोस ? बिल्डिंग-मधल्या इतर बायका काय काशीयात्रेला गेल्या ? लफंग्या, ही बायको मिळवताना मला काय काय सहन करावं लागलं माहीत आहे तुला ? अरे, हिच्या बापानं माझ्या साहेबाशी ओळख काढून माझी दोन इन्क्रीमेंटस् कॅन्सल करायला लावली होती. हिच्या भावानं खास वर्षभर व्यायाम करून मला जिन्याखाली आवळून धरलं होतं. त्यानं मारलेल्या ठोश्यामुळं दोन्ही अक्कलदाढा पडल्या आणि उरलेले दात अजून हलताहेत. माहीत आहे तुला ? एवढं दिव्य करून मी बायको मिळवली ती काय तुझ्यासाठी ?

डॉक्टर : अहो पण मी...मी...

मन्या : मी मी मी मी काय ? थांब, तुझ्यातला मीपणा मी एका क्षणात काढून टाकतो. चढ त्या खिडकीवर. चढ म्हणतो ना. ( डॉक्टर खिडकीवर चढतो. मन्या त्याला ढकलून देतो. डॉक्टरची जोरदार किंकाळी...नंतर प्रतिमेची. मन्या जोरजोरात हसतो. )

प्रतिमा : खुनी ! राक्षस ! तुम्ही त्याचा खून केलात ! काही कारण नसताना !

मन्या : कारण नसताना ? माझ्या गैरहजेरीत त्याची शय्यासोबत करताना...

प्रतिमा : लाज नाही वाटत असं बोलताना !

मन्या : तुला करताना लाज वाटली नाही. त्याची मला बोलताना वाटायला हवी अं ?

प्रतिमा : आता जास्त बोललात तर खिडकीतनं उडी घेऊन जीव देईन.

मन्या : का ? प्रियकराचा विरह असह्य झालाय ?
प्रतिमा : तो माझा प्रियकर होता हे कोणत्या मूर्खानं सांगितलं तुम्हाला ?
मन्या : तो तुझा प्रियकर नव्हता...तर काय माझा सबस्टिट्यूट होता ?
प्रतिमा : मूर्खासारखं बडबडू नका ! एका डॉक्टरचा तुम्ही निष्कारण खून केलात !
मन्या : डॉक्टर ! म्हणजे बकरा चांगला पकडला होतास !
प्रतिमा : शीः शीः ! तुमच्या जिभेला काही हाड आहे की नाही ? तुम्हाला तपासायला म्हणून माझ्या एका मैत्रिणीच्या ओळखीनं त्या डॉक्टरला बोलावून घेतलं होतं मी. त्याची तुम्ही अशी वाट लावलीत.
मन्या : क् क् काय म्हणतीस ? मला तपासायला ? उगाच आपल्या पापावर पांघरूण घालायचा प्रयत्न करू नकोस ! मला काय धाड झाली म्हणून...
प्रतिमा : अहो, तुमच्या त्या स्वप्नांवर उपचार करण्यासाठी बोलावलं होतं मी त्याला ! तो एक मानसशास्त्रज्ञ होता.
मन्या : मला तर तो शरीरशास्त्रज्ञ वाटला. आणि काय ग ! मला तपासायला आलेला हा डॉक्टर तुला का बरं तपासत होता ? ( खिडकीबाहेर डॉक्टरचे मुंडके दिसते– खिडकीचा काठ त्याने दोन्ही हातांनी घट्ट धरून ठेवलेला आहे. )
प्रतिमा : कालच्या प्रसंगाचं त्यांना प्रात्यक्षिकासह वर्णन करून सांगत होते मी.
मन्या : कोणत्या प्रसंगाचं ? हरामखोर, नालायक...
प्रतिमा : तुमच्या माझ्यात घडलेल्या...
मन्या : काय ? सांगताना लाज नाही वाटली ?
प्रतिमा : अहो, तुमच्या स्वप्नातल्या प्रसंगाचं. असं काय करता ?
मन्या : असं असं ! पण त्याची काय गरज होती ?
प्रतिमा : डॉक्टरांना बारीक सारीक माहिती हवी होती म्हणून...
मन्या : हे जे तू सांगतेस ते खरं आहे ना ?
प्रतिमा : हो. शब्दशः खरं आहे.
मन्या : मग तेव्हाच का नाही सांगितलंस ?
प्रतिमा : तुम्ही संधीच कुठे दिलीत सांगायची ? आल्याबरोबर झडप घालून

त्याला पकडलंत आणि मी ' थांबा थांबा ' म्हणेपर्यंत खिडकीतून खाली फेकून दिलंत !

**मन्या** : अरे अरे अरे ! चुकलंच माझं ! मेला असेल का ग तो ?
(डॉक्टरचे मुंडके पुन्हा दिसते)

**प्रतिमा** : चवथ्या मजल्यावरून खाली पडल्यावर मरणार नाही तर काय अजरामर होईल ?

**मन्या** : तरी जागा घेताना सांगत होतो. आपण तळमजल्यावरची जागा घेऊया, पण तू ऐकशील तर ना !

**प्रतिमा** : मूर्खासारखं बोलू नका. सिरिअसली विचार करा ! रस्त्यावर त्या डॉक्टरचं प्रेत आडवंतिडवं पडलं असेल. पोलीस पंचनामा करत असतील. एवढ्यात ते इथे येतील सुद्धा.
(डॉ. खिडकी वाजवून त्यांचं लक्ष वेधून घेण्याचा प्रयत्न करतो.)

**मन्या** : बापरे ! आले वाटतं पोलीस ?
अहो, मला वर घ्या, वर घ्या.

**मन्या** : हा... हा आवाज कुणाचा ग ? (चहूकडे पाहतो.)

**प्रतिमा** : त्या डॉक्टरच्या आवाजासारखाच वाटतो. त्याचं भूत ह्या खोलीत वावरत असणार !

**मन्या** : चूप ! त्याला मरून पाच मिनिटं झाली नाहीत तोच त्याचं भूत म्हणे वावरत असणार ! बायको आहेस की भूत ?

**डॉक्टर** : अहो. अहो. मला वर घ्या ! इकडे इकडे खिडकीत !
(दोघंही भीतभीत जवळ जातात.)

**मन्या** : तुम्ही अद्याप जिवंत आहात ?

**डॉक्टर** : आधी मला वर घ्या मग सांगतो.

**प्रतिमा** : पण चवथ्या मजल्यावरून खाली पडूनसुद्धा तुम्ही जिवंत कसे राहिलात ?

**मन्या** : आणि पुन्हा वर यायचंच होतं तर सरळ लिफ्टने नाही का यायचं ! उगाच जीव कशाला धोक्यात घालायचा ?

**डॉक्टर** : अहो, मला आधी वर घ्या ! खालच्या मजल्यावरच्या बाल्कनीतल्या

कपडे वाळत घालायच्या दोरीत पाय अडकला आहे माझा.
(मन्या आणि प्रतिमा डॉक्टरला वर खेचतात. डॉक्टर वर आल्यावर थेट पलंगावर जाऊन आडवा होतो.)

**मन्या** : हे काय!

**डॉक्टर** : मला थोडा वेळ पडू द्या (धापा टाकतो.)

**मन्या** : प्रतिमा, पाणी घेऊन ये बरं. (ती आत पळते) आय ॲम सॉरी डॉक्टर!

**डॉक्टर** : (उठून बसतो) तुम्ही कसले सॉरी, मीच सॉरी! कुठून दुर्बुद्धी सुचली आणि इथे आलो. आई ग! आज मरता मरता वाचलो!

**मन्या** : खरंच! तुमच्या आयुष्याची दोरी बळकट होती म्हणून वाचलात!

**डॉक्टर** : आयुष्याची नाही, खालची कपडे वाळत घालायची दोरी बळकट होती म्हणून वाचलो. (पायात अडकलेली दोरी दाखवतो. सोबत वाळत घातलेला एक ब्रेसियर)
[प्रतिमा पाणी घेऊन येते]

**मन्या** : आणलंस पाणी? दे इकडे. (तिच्या हातातून पेला घेऊन घटाघटा पाणी पिऊन टाकतो)

**प्रतिमा** : हे काय! अहो, मी डॉक्टरांसाठी आणलं होतं पाणी.

**डॉक्टर** : राहू द्या. मघाशी पाजलंत तेवढं पुरे झालं.

**मन्या** : तुम्ही मला तपासायला आला होता, हे तुम्ही खाली पडल्यानंतर कळलं मला. आपलं नाव, डॉक्टर?

**प्रतिमा** : त्यांचं नाव डॉ. आत्माराम भेंडे.

**मन्या** : आपल्याला भेटून खूप आनंद झाला.

**डॉक्टर** : फार उशीरा झाला! हरकत नाही! तुमच्या मिसेसनी तुमच्या आजाराबद्दल सगळं सांगितलंय मला. तुमची काही हरकत नसेल तर तुमची केस मी हातात घेतो.

**मन्या** : घ्या ना!

**डॉक्टर** : मग ट्रीटमेन्ट सुरू करण्यापूर्वी मला जरा खात्री करून घ्यायची आहे.

**मन्या** : त्यासाठी मला झोपावं लागेल.

डॉक्टर : तुम्हाला झोप येईपर्यंत थांबायची तयारी आहे माझी !

मन्या : पण माझी नाही ना ! माझ्या बेडरूममध्ये एक त्रयस्थ इसम मला झोप येण्याची वाट बघतोय...ही कल्पनाच झोप उडविणारी आहे. त्यातून मवाशी तुमचं प्रात्यक्षिक वगैरे बघितलं...

डॉक्टर : म्हणजे तुमचा माझ्यावर विश्वास नाही तर! ठीक आहे. मी जातो. तुम्हाला काय झालं आहे याची कल्पना नाही. अहो, तुम्हाला ड्रिमिगायटीस् नावाचा फार भयंकर रोग झालेला आहे– मेनेंजायटिसचा बाप आहे तो. त्याचं पर्यवसान फोटोफोबियामध्ये झालं की संपलं ! मग बसा स्वप्नात गुरफटून कायमचे– मी चालतो.

मन्या : बापरे !

प्रतिमा : अहो, असं काय करता ? तुम्हाला बरं व्हायचंय ना !

मन्या : हो, पण काही दगाफटका तर होणार नाही ना ?

प्रतिमा : म्हणजे तुमचा माझ्यावर विश्वास नाही ?

मन्या : माझा स्वतःवरच विश्वास नाही !

प्रतिमा : पोरकटपणा करू नका. डॉक्टर, तुम्ही करा हो सुरुवात !

डॉक्टर : हं मग आता एखादं चित्र बघा आणि झोपा पाहू चटकन्.

मन्या : अहो, पण मला झोप येणार कशी ? ही काय झोपायची वेळ आहे ?

डॉक्टर : तुमची तयारी असेल तर मी एका मिनिटाच्या आत झोपवतो. बसा त्या खुर्चीवर...बसा म्हणतो ना !

मन्या : नाही म्हणजे झोपायचंच असेल तर त्या पलंगावरच झोपतो.

डॉक्टर : ( दरडावून ) मी सांगतो तसं करा. बसा त्या खुर्चीवर ( तो बसतो. ) हं आता माझ्या डोळ्यात बघा.

मन्या : ( बघतो आणि हसू लागतो ) डॉक्टर, तुमचा एक डोळा चकणा आहे का हो ?

डॉक्टर : बोलू नका. डोळ्यात बघा.

मन्या : कोणत्या डोळ्यात बघू !

डॉक्टर : नजर स्थिर ठेवा !

मन्या : डॉक्टर एक विनंती आहे, मी तुम्हाला खिडकीतून ढकललेलं ते विसरायचं हं ! नाहीतर त्याचा सूड आता उगवाल ?

**डॉक्टर** : बोलू नका, नजर स्थिर ठेवा. ( हातांची विशिष्ट हालचाल करतो ) थोड्याच वेळात तुम्हाला झोप येईल... तुमच्या पापण्या जड होत चालल्या आहेत...मन स्वस्थ आहे. शरीर सुस्तावलेलं आहे... तुम्हाला खूप खूप थकवा आलाय. खूप थकवा आलाय...तुम्हाला झोपेची नितांत आवश्यकता आहे...तुमच्या पापण्या आता मिटायला लागल्या आहेत...तुम्हाला झोप आलीय...तुम्ही झोपला आहात...गाढ झोपला आहात...तरीही जागे आहात...माझ्यापुरते...ऐकू येतंय ना तुम्हाला... ( एक जड होकार ) मी सांगितल्याशिवाय उठायचं नाही. ( मन्याचा हात उचलून सोडून देतो. तो हात निर्जीवपणे खाली येतो. ) तुमच्या मिस्टरांना आता गाढ झोप लागलीय !

**प्रतिमा** : म्हणजे ! !

**डॉक्टर** : घाबरू नका ! त्यांच्यावर मी मोहिनीविद्येचा प्रयोग केला आहे. आता मी सांगेन तसं ते वागतील.

**प्रतिमा** : काहीतरीच काय ? ते जागेच असतील. झोपेचं सोंग घेतलं असेल त्यांनी !

**डॉक्टर** : पहायचंय तुम्हाला ? मिस्टर...काय ह्यांचं नाव ?

**प्रतिमा** : मनोहर...

**डॉक्टर** : मनोहर, कॅन यू हिअर ? ( तो होकारार्थी डोकं हलवतो ) तर मग आता डोळे मिटूनच सांगा पाहू, ही बोटं किती आहेत. ( तो सांगतो ) बरोबर. मिस्टर मनोहर खोलीत कसलं उकडतंय नाही ! ( तो हाशहुश करतो ) बापरे काय कडाक्याची थंडी पडली आहे ! ( मन्या कुडकुडायला लागतो ) मिस्टर मनोहर, तुम्हाला कशी थंडी जाणवणार तुम्ही तर आगगाडीत आहात. ( मन्या झुक झुक झुक करू लागतो ) मिस्टर मनोहर तुम्ही एक पाच वर्षांचं मूल आहात आणि तुमच्या हातात एक चेंडू आहे. ( तो पाच वर्षांच्या मुलासारखा चेंडू उडवून नाचू लागतो ) आता तुम्ही दीड वर्षांचे आहात ( तो दीड वर्षाच्या मुलासारखा चालू लागतो ) तुम्ही आता आठ महिन्याचे आहात. ( तो रांगू लागतो. )

प्रतिमा : पुरे डॉक्टर. त्यांना आणखी लहान करू नका.

डॉक्टर : मिस्टर मनोहर आता तुम्ही, तुम्हीच आहात...खुर्चीवर जाऊन बसा! पाहिलंत! आता तुमचे हे पूर्णपणे माझ्या ताब्यात आहेत. मी सांगितलं तर ते ह्या खिडकीतूनसुद्धा उडी घेतील.

प्रतिमा : आई ग!

डॉक्टर : घाबरण्याचं कारण नाही. ते फक्त झोपलेले आहेत. फरक एवढाच की ते झोपलेले असूनसुद्धा माझ्यापुरते जागे आहेत. मी सांगेन तसं ते आता वागतील.

प्रतिमा : पण हे सगळं कशासाठी?

डॉक्टर : खात्री पटवून घेण्यासाठी. एखादा फोटो किंवा चित्र आहे.

प्रतिमा : कशाला?

डॉक्टर : ह्यांच्या स्वप्नांतली वस्तू खरोखरच प्रगट होते की नाही हे पहायचं आहे मला. (टीपॉयवरील मासिकाकडे लक्ष जाते.) आपण हे मासिकच त्यांना दाखवू या! ह्यांच्या स्वप्नात हे मासिक यायला हवं आणि त्याचवेळी प्रगट व्हायला हवं!

मिस्टर मनोहर लेले, आता सावकाश डोळे उघडा. झोपमोड होता कामा नये. (तो सावकाश डोळे उघडतो) आता ते मासिक बघा. बघितलंत? आता डोळे मिटा. ह्या मासिकाचं आता तुम्हाला स्वप्न पडेल. ते स्वप्न मी सांगितल्याशिवाय भंगणार नाही. झोपा आणि स्वप्न बघा. ह्या मासिकाचं. (मन्या झोपतो. धीरगंभीर पार्श्वसंगीत आणि मग काही वेळाने एका कोपऱ्यात एक बॉक्सर प्रगट होतो आणि रिंगणात आल्यागत उड्या मारू लागतो. डॉक्टरच्या मागे लागतो. डॉक्टरची पळता पळता पुरेवाट होते. प्रतिमाही किंचाळते. खोलीतल्या सामानाची नासधूस होते. शेवटी डॉक्टर कसाबसा मन्याच्या कानाजवळ जाऊन ओरडतो) मिस्टर लेले स्वप्न बघायचं थांबवा. स्टॉप ड्रीमिंग, स्टॉप ड्रीमिंग (बॉक्सर नाखुषीने अदृश्य होतो, डॉक्टर व प्रतिमा धापा टाकत बसतात.) बापरे पुन्हा एकदा मरता मरता वाचलो. पण मला एक कळत नाही. आपण मिस्टर लेलेना मासिकाचं स्वप्न बघायला सांगितलं होतं! मग मासिक का

नाही प्रगट झालं ? हा बॉक्सर कुठून आला ? ( मासिक उचलून ) आय. सी. आता आलं लक्षात. ह्या मासिकातल्या स्पोर्टस कॉलम-मध्ये एका बॉक्सरचं चित्र आहे. ( विचार करून ) हं ! मी मासिक दाखवलं तेव्हा ह्यांनी हे चित्र पाहिलं. त्या चित्रातला बॉक्सर ह्यांच्या स्वप्नात आला आणि प्रगट झाला. ह्याचा अर्थ ह्यांच्या स्वप्नातल्या वस्तू प्रगट होण्यासाठी ह्यांना त्या वस्तूचं चित्र दाखवायला हवं ! प्रतिमा, आता मला कळलं. मि. लेलेना नक्की काय होतं आहे ते ! बैस त्या खुर्चीवर. बैस, मला तुझ्याशी थोडं बोलायचंय.

**प्रतिमा** : म्हणजे, आता माझ्यावर प्रयोग करायचा विचार आहे की काय तुमचा ?

**डॉक्टर** : नाही तुझ्यावर मोहिनी विद्येचा प्रयोग करून त्या शक्तीचा दुरुपयोग नाही करायचा मला.

**प्रतिमा** : मग तुमचा विचार तरी काय आहे ?

**डॉक्टर** : सांगतो. सगळं सांगतो. आधी मला हे सांग तू सुखी आहेस ?

**प्रतिमा** : मला अजूनही कळलं नाही तुम्ही काय बोलताय...

**डॉक्टर** : तुला असं कधीच वाटत नाही, आपल्याला नेसायला छानछान साड्या असाव्यात.

**प्रतिमा** : वाटतं तर ! ऑफिसातल्या इतर बायकांच्या भारीभारी साड्या बघून जीव जळतो माझा. ड्रेसवाल्याकडून भाड्याने आणतात की काय कोण जाणे !

**डॉक्टर** : छान छान साड्यावरोबर तुला चांगले दागिनेही आवडत असतील ?

**प्रतिमा** : आवडतात तर ! पण ह्यांना अजिबात आवडत नाहीत दागिने !

**डॉक्टर** : आवडत नाहीत की परवडत नाहीत ?

**प्रतिमा** : परवडत नाहीत म्हणून आवडत नाहीत ! त्यामुळे मला नवरा हाच खरा दागिना म्हणून, एवढ्या एकाच दागिन्यावर समाधान मानून घ्यावं लागतं !

**डॉक्टर** : व्हेरी गुड ! तुमच्या घरात फ्रीज आहे !

प्रतिमा : का ? पाणी हवंय का थंड ?
डॉक्टर : नाही. मी विचारतो त्या प्रश्नांची उत्तरं दे ! फ्रीज आहे ?
प्रतिमा : नाही. पण माठ आहे.
डॉक्टर : तो फोडून टाक. घरात टी. व्ही. आहे ?
प्रतिमा : नाही.
डॉक्टर : कार आहे ?
प्रतिमा : अहो, साधी सायकल नाही तर कार कुठून असणार ?
डॉक्टर : ह्या सगळया गोष्टी आपल्याकडे असाव्यात असं नाही वाटत तुला ?
प्रतिमा : नुसतं वाटून काय उपयोग हो ? दोघांच्या पगारात कसं परवडणार एवढं सगळं ? ब्लॉकसाठी आम्ही कर्ज काढलं त्याचे हप्ते जातात महिन्याच्या महिन्याला. शिवाय प्रॉव्हिडंट फंड आहे. विम्याचे हप्ते आहेत. झालंच तर दिवाळी फंडाचे हप्ते आहेत, एवढं सगळं कापून शिल्लक राहिलेल्या पगारातून डॉक्टरची बिलं द्यावी लागतात ती वेगळी ! हे सगळं मी एवढ्यासाठी सांगते आहे की तुम्ही जरा समजून बिल आकारा !
डॉक्टर : ( हसून ) डोन्ट वरी. मला पैसे नकोत. उलट मीच तुम्हाला पैसे देईन ?
प्रतिमा : म्हणजे ?
डॉक्टर : प्रतिमा तुझ्या सगळया मनोकामना मी पुऱ्या करीन ! तुला एखाद्या राणीसारखं राहता येईल इतकं ऐश्वर्य मी तुला प्राप्त करून देईन ! पण–पण एका अटीवर. तुझ्या सुखात तू मलाही सहभागी करून घ्यायला हवंस !
प्रतिमा : तुम्ही काय बोलताय– मला काही एक कळतं नाही !
डॉक्टर : अगं वेडे, ह्या तुझ्या नवऱ्याकडे बघ ! हा तुझा नवरा नाही अलिबाबाची गुहा आहे–गुहा. अगं, थोडसं डोकं लढवलंस तर जगातली सगळयात श्रीमंत बाई म्हणून तुला मिरविता येईल ! बाथरूममध्ये सोन्याच्या विटा बसवून घेता येतील– सोन्याच्या !
प्रतिमा : पण हे कसं शक्य आहे !
डॉक्टर : ते माझ्याकडे लागलं ! माझ्या ओळखीचा एक गवंडी आहे.

**प्रतिमा** : ते नाही, श्रीमंत होण्यासंबंधी म्हणते आहे मी! खरंच का ते शक्य आहे?

**डॉक्टर** : आता आपल्याला काहीच अशक्य नाही. माझ्या डोक्यात एक भन्नाट कल्पना आलीय! पण मला आधी तुझ्याकडून वचन हवंय! ह्यातलं एक अक्षरही कुणाला कळता कामा नये, तुझ्या नवऱ्याला सुद्धा. दे वचन मला, माझ्या नजरेला नजर भिडवून दे.

**प्रतिमा** : ( भीतभीत ) पण...

**डॉक्टर** : दे वचन.

**प्रतिमा** : दिलं

**डॉक्टर** : हे वचन मोडलंस तर याद राख. गाठ माझ्याशी आहे. प्रत्यक्ष देवसुद्धा तुझं आणि तुझ्या नवऱ्याचं रक्षण करू शकणार नाही. कळलं?

**प्रतिमा** : कळलं! आता तुमचा प्लॅन काय आहे ते कळू द्या!

**डॉक्टर** : आपल्या प्रात्यक्षिकांनी एक सिद्ध केलं की तुझ्या नवऱ्याच्या स्वप्नातली वस्तू प्रगट होण्यासाठी खरी वस्तु उपयोगाची नाही. तर त्या वस्तूचं चित्र आपण त्याला दाखवायला हवं!

**प्रतिमा** : बरं मग!

**डॉक्टर** : आपण त्याला–नोटांचे फोटो दाखवायचे ( तिच्या खांद्यावर हात ठेवून. )

( ती विचारात गढते )

प ड दा

[ दृश्य :– तेच
बऱ्याच नवीन वस्तू घरात आलेल्या आहेत. फर्निचरसुद्धा नवीन आहे. एकदोन जुन्या खुर्च्यांखेरीज बाकी जवळ जवळ सगळेच नवीन आहे. एका कोपऱ्यात टी. व्ही. सेटसुद्धा दिसतो आहे. दोन हाफचड्डीवाले प्रवेश करतात. मागोमाग मन्या ]

**मन्या** : अरे अरे अरे ! काय चालवलंय काय तुम्ही ! खुशाल माझ्या परवानगीशिवाय घरात घुसला आहात. चला निघा बाहेर !

**पहिला** : पण साहेब...

**मन्या** : साहेब गेला खड्यात ! आधी बाहेर हो !

**पहिला** : बाईसाहेबांनी सांगितलंय, तुमचं कायबी ऐकायचं नाही ! उचल रे ती खुर्ची ! ( दुसरा खुर्ची उचलून बाहेर नेऊ लागतो )

**मन्या** : अरे, अरे, ती खुर्ची कुठे नेतो आहेस ?

**दुसरा** : हातगाडीवर टाकायला ( बाहेर जातो. )

**मन्या** : हातगाडीवर ? अरे हा काय प्रकार आहे ?

**पहिला** : तुमचं समदं सामायन बाईसाहेबानी ईकाया काढलंय.

**मन्या** : अरे, पण का ?

**पहिला** : लई जुनं झालंय म्हणून ! ही चारदबी बदलाय सांगितलीय !

**मन्या** : हात लावू नकोस त्या चादरीला !

**पहिला** : का ? लई खराब केलीय व्हय ? आपुन बदलून टाकू ! ( चादर ओरबडून काढतो आणि खांद्यावरची नवीन चादर टाकू लागतो ) साहेब, जरा हात लावा !

**मन्या** : आधी बाहेर हो. ( पाठीत धपाटा लागतो. तो मटकन बसतो. ) हात लावा म्हणे. लाथ घालीन कमरेत. चल चालता हो इथून !

**पहिला** : साहेब, मी चादरीला हात लावाय सांगतला होता ! ( दुसरा प्रवेश करतो – त्याच्या हातात एक मोढा आहे )

दुसरा : दुसरी खुर्ची ?
पहिला : घेऊन जा !
मन्या : ( धावत जाऊन त्या खुर्चीवर बसतो ) लाथ मारीन त्या खुर्चीला हात लावलात तर ! मघापासून मी बघतोय ! घरातल्या एकेक वस्तू लांबवताहात ! आणि काही विचारलं की म्हणता...
पहिला : बाईसायबांनी सांगतलंय तुमचं कायबी ऐकायचं नाय !
मन्या : बाईसाहेब गेल्या खड्ड्यात !
पहिला : खड्ड्यात ! मघाशी वर आमच्या दुकानात होत्या !
मन्या : कसलं दुकान ?
पहिला : नवा जुना फर्निचरवाला ! ही चिठी बघा ! बाईसायबांनी आमच्या शेटला लिवलीय ! विंग्रजीत आहे ! वाचून दावू ?
मन्या : ( चिठ्ठी हिसकावून घेतो ) रुस्तुमजी पेस्तनजी मोडतोडवाला अवर फर्निचर–वेरी ओल्ड फर्निचर – वेरी ओल्ड फर्निचर– अवर–युवर, ओल्ड न्यू... ( पुढचं वाचता येणं कठीण आहे )
पहिला : ( त्याच्या हातातून चिठी काढून घेत ) आक्षर लागत नसंल तर आना मी दावतो वाचून ! रुस्तुमजी पेस्तुनजी मोडतोडवाला आमचा समदा फर्निचर बदलून नवा बसवा... बिल पाठवून द्या. ठेंक्यू... मी काय सांगतला विंग्रजीत लिवलंय म्हणून. ( दुसऱ्याला ) अरे, लेका तू काय त्वांड बगत हुवा राह्यलास. उचल ती खुर्ची आन जाऊ दे हातगाडीवर !
दुसरा : साहेब, खुर्ची द्या.
मन्या : चालते व्हा बाहेर. खुर्चीबिर्ची काही मिळणार नाही.
दुसरा : साहेब, खुर्ची सोडायला तयार नाही काय ?
पहिला : बाईसाह्यबांनी सांगतलं तर भल्याभल्यांना खुर्ची सोडावी लागती ! उठत नसतील तर उचल तेंच्या सकट – आन जाऊ दे हातगाडीवर. ( मन्या ताडकन उठतो. दुसरा इसम तावडतोब खुर्ची पळवतो )
पहिला : भडकू नगा साहेब, अहो, आमी नोकरमानसं शेटनं सांगितल्या-परमानं वागणार ! वरं पुन्हा तुमच्याच बाईसाहेबानी सांगतलंय

की तुमचं काय बी ऐकायचं नाय !

मन्या : ( मोढा उचलून ) आईसाहेबांच्या लेका, होतोस की नाही चालता ! ( पळापळ )

पहिला : ( धावता धावता ) पण साहेब, बक्षिसी ?

मन्या : ही घे बक्षिसी – ( मोढा घेऊन त्याच्यामागे धावतो ) ( तो बाहेर पळतो. मन्या त्याच्या रोखाने मोढा फेकून मारतो तो मोढा पोटावर धरून सतीश प्रवेश करतो )

सतीश : थँक्यू !

मन्या : ओह ! सतीश ! आय ॲम सॉरी !

सतीश : थोडा वेळ थांबला असतास तर मीच येऊन बसलो असतो त्यावर ! महमदाकडे पर्वत गेला असेल – पण मी पर्वताकडे जाणारा महमद आहे !

मन्या : अरे, कुठले कोण हाफचड्डीवाले खुशाल परवानगीशिवाय घरात घुसले !

सतीश : परवानगीशिवाय घरात घुसले ना – अरे, मग इन्कमटॅक्स इन्स्पेक्टर असतील ते.

मन्या : छे रे ! कुठल्याशा फर्निचरच्या दुकानातले लोक आहेत. मी नको नको म्हणत असताना घरातल्या वस्तू हातगाडीवर नेऊन टाकत होते.

सतीश : म्हणजे खाली रस्त्यावरच्या त्या हातगाडीवर तुझं सामान आहे ?

मन्या : हो. हिने म्हणे कुणा मोडतोडवाल्याला जुनं फर्निचर काढून नवीन बसवायला सांगितलंय !

सतीश : तुझ्या परवानगीशिवाय !

मन्या : अरे, माझ्या परवानगीला इथे कोण धूप घालतंय ! गेल्या पंधरा दिवसात घराचा नक्षाच बदलून गेलाय ! बघतोस ना, काय काय बदल झालाय तो !

सतीश : झालाय खरा ! हॉलमधला तो नवीन सोफा सेट, कार्पेट. नवीन कपाटं. नवीन फ्रीज, टी. व्ही. सेट– सगळं नवीन. तूच तेवढा जुना दिसतोस !

मन्या : अरे, मी वेळीच रोखलं नसतं तर त्या हाफचड्डीवाल्यानी मलाही नेऊन टाकलं असतं हातगाडीवर !

सतीश : ए, पण हे सगळं कसं काय जमलं तुला ?

मन्या : मी मोढा फेकून मारला.

सतीश : ते नाही रे म्हणत मी. ह्या सगळ्या वस्तू– फ्रीज, टी. व्ही. घेणं कसं काय जमलं तुला ? लॉटरी बिटरी ?

मन्या : लॉटरी ? लॉटरी नेहमी माझ्या मित्रांना लागते मला नाही. माझा रुपया दर खेपेला महाराष्ट्राच्या विकासासाठी खर्च होतो.

सतीश : मग प्रमोशन वगैरे तर...

मन्या : प्रमोशन ? प्रमोशन मिळायला आमच्या ऑफिसात दोन गोष्टी आवश्यक असतात.

सतीश : मेरीट आणि सिनीऑरीटी– बरोबर ?

मन्या : नाही. चमचेगिरी आणि सुंदर बायको. आणि माझ्याजवळ ह्यातलं एकही नाही.

सतीश : ए, खोटं बोलू नकोस. तुझी बायको सुंदर आहे !

मन्या : असं तुला वाटतं. मित्राची बायको नेहमी सुंदर दिसते.

सतीश : ह्या नियमाला माझ्या बायकोचा अपवाद आहे ! बरं, लॉटरी नाही, प्रमोशन नाही मग एवढ्या महागातल्या वस्तू तू घेतल्यास तरी कशा ?

मन्या : मी नाही घेतल्या !

सतीश : घेतल्या नाहीस ? मग प्रकट बिगट झाल्या की काय ?

मन्या : म्हणजे अजून तुला आठवण आहे त्या प्रसंगाची ?

सतीश : चांगलीच. त्यानंतर तुम्ही दोघांनी मला कुत्र्यासारखं हाकलून दिलं होतं त्याची आठवण आहे.

मन्या : सॉरी हं, सतीश– ते विसरून जा.

सतीश : ते मी कधीच विसरलो आहे. मित्राने केलेला अपमान आणि उसने दिलेले पैसे मी लक्षात ठेवून विसरत असतो. बरं महाराज प्रकट झाले त्यानंतर काही प्रकट झालं होतं का ?

मन्या : मला काहीच ठाऊक नाही.

सतीश : मग ह्या वस्तू ?

मन्या : त्या हिनं आणल्या...

सतीश : कुठून ?

मन्या : कुणास ठाऊक! कधी म्हणते अमकी वस्तू तमक्या मैत्रिणीनं ठेवायला दिली, तमकी वस्तू अमक्या मैत्रिणीनं भेट म्हणून दिली! पण मला खरं नाही वाटत!

सतीश : का ?

मन्या : अरे, टी.व्ही. का कुणी ठेवायला म्हणून देतं ? फ्रीज का कुणी प्रेझेंट म्हणून देतं ?

सतीश : त्यात काय आहे न द्यायला ? फ्रीज आणि टी. व्ही. काय घेऊन बसलास! आमच्या शेजाऱ्याने एकाला बायको दिली ठेवायला... घरकामासाठी. म्हातारी आहे बिचारी.

मन्या : मी म्हाताऱ्याविषयी नाही हिच्या मैत्रिणीविषयी बोलतोय!

सतीश : बोल बोल. इंटरेस्टिंग विषय आहे.

मन्या : अरे हिच्या मैत्रिणींना मी लग्नापूर्वीपासून ओळखतो. अरे एक नंबरच्या कंजूष!

सतीश : तुला रे काय माहीत ?

मन्या : कुणाजवळ बोलणार नसशील तर सांगतो. लग्नापूर्वी एकदा हिच्या मैत्रिणीला घेऊन मी सिनेमाला गेलो होतो.

सतीश : काय म्हणतोस!

मन्या : तिचे वडील होते बरोबर, हे मला थेटरवर गेल्यानंतर कळलं. सांगण्याचं तात्पर्य म्हणजे तिकाटांपासून इंटरव्हलमधल्या चहा वेफरापर्यंतचा सगळा खर्च मला करावा लागला! आणि हाती मात्र काहीचं लागलं नाही.

सतीश : अरेरे!

मन्या : अशा तर हिच्या मैत्रिणी! ह्या काय देणार कुणाला ? बरं समजा असलीच एखादी जिवाभावाची मैत्रीण तर भेट म्हणून जास्तीत काय देईल ? फारफार तर एखादा हातरूमाल दोन नाय दीड इंचाचा! अगदीच डोक्यावरून गेलं तर एखादं गंगावन...

मन्या : अरे, मी वेळीच रोखलं नसतं तर त्या हाफचड्डीवाल्यानी मलाही नेऊन टाकलं असतं हातगाडीवर !

सतीश : ए, पण हे सगळं कसं काय जमलं तुला ?

मन्या : मी मोढा फेकून मारला.

सतीश : ते नाही रे म्हणत मी. ह्या सगळ्या वस्तू– फ्रीज, टी. व्ही. वगैरे घेणं कसं काय जमलं तुला ? लॉटरी बिटरी ?

मन्या : लॉटरी ? लॉटरी नेहमी माझ्या मित्रांना लागते मला नाही. माझा रुपया दर खेपेला महाराष्ट्राच्या विकासासाठी खर्च होतो.

सतीश : मग प्रमोशन वगैरे तर...

मन्या : प्रमोशन ? प्रमोशन मिळायला आमच्या ऑफिसात दोन गोष्टी आवश्यक असतात.

सतीश : मेरीट आणि सिनीऑरीटी– बरोबर ?

मन्या : नाही. चमचेगिरी आणि सुंदर बायको. आणि माझ्याजवळ ह्यातलं एकही नाही.

सतीश : ए, खोटं बोलू नकोस. तुझी बायको सुंदर आहे !

मन्या : असं तुला वाटतं. मित्राची बायको नेहमी सुंदर दिसते.

सतीश : ह्या नियमाला माझ्या बायकोचा अपवाद आहे ! बरं, लॉटरी नाही, प्रमोशन नाही मग एवढ्या महागातल्या वस्तू तू घेतल्यास तरी कशा ?

मन्या : मी नाही घेतल्या !

सतीश : घेतल्या नाहीस ? मग प्रकट बिगट झाल्या की काय ?

मन्या : म्हणजे अजून तुला आठवण आहे त्या प्रसंगाची ?

सतीश : चांगलीच. त्यानंतर तुम्ही दोघांनी मला कुत्र्यासारखं हाकलून दिलं होतं त्याची आठवण आहे.

मन्या : सॉरी हं, सतीश– ते विसरून जा.

सतीश : ते मी कधीच विसरलो आहे. मित्राने केलेला अपमान आणि उसने दिलेले पैसे मी लक्षात ठेवून विसरत असतो. बरं महाराज प्रकट झाले त्यानंतर काही प्रकट झालं होतं का ?

मन्या : मला काहीच ठाऊक नाही.

सतीश : मग ह्या वस्तू ?

मन्या : त्या हिनं आणल्या...

सतीश : कुठून ?

मन्या : कुणास ठाऊक ! कधी म्हणते अमकी वस्तू तमक्या मैत्रिणीनं ठेवायला दिली, तमकी वस्तू अमक्या मैत्रिणीनं भेट म्हणून दिली ! पण मला खरं नाही वाटत !

सतीश : का ?

मन्या : अरे, टी.व्ही. का कुणी ठेवायला म्हणून देतं ? फ्रीज का कुणी प्रेझेंट म्हणून देतं ?

सतीश : त्यात काय आहे न द्यायला ? फ्रीज आणि टी. व्ही. काय घेऊन बसलास ! आमच्या शेजाऱ्याने एकाला बायको दिली ठेवायला... घरकामासाठी. म्हातारी आहे बिचारी.

मन्या : मी म्हाताऱ्याविषयी नाही हिच्या मैत्रिणीविषयी बोलतोय !

सतीश : बोल बोल. इंटरेस्टिंग विषय आहे.

मन्या : अरे हिच्या मैत्रिणींना मी लग्नापूर्वीपासून ओळखतो. अरे एक नंबरच्या कंजूष !

सतीश : तुला रे काय माहीत ?

मन्या : कुणाजवळ बोलणार नसशील तर सांगतो. लग्नापूर्वी एकदा हिच्या मैत्रिणीला घेऊन मी सिनेमाला गेलो होतो.

सतीश : काय म्हणतोस !

मन्या : तिचे वडील होते बरोबर, हे मला थेटरवर गेल्यानंतर कळलं. सांगण्याचं तात्पर्य म्हणजे तिकाटांपासून इंटरव्हलमधल्या चहा वेफरापर्यंतचा सगळा खर्च मला करावा लागला ! आणि हाती मात्र काहीचं लागलं नाही.

सतीश : अरेरे !

मन्या : अशा तर हिच्या मैत्रिणी ! ह्या काय देणार कुणाला ? बरं समजा असलीच एखादी जिवाभावाची मैत्रीण तर भेट म्हणून जास्तीत काय देईल ? फारफार तर एखादा हातरूमाल दोन बाय दीड इंचाचा ! अगदीच डोक्यावरून गेलं तर एखादं गंगावन...

नाहीतर वास उडालेली अत्तराची बाटली. हिच्या मैत्रिणींनी काय काय दिलं असेल सांग !

**सतीश** : काय काय दिलं ?

**मन्या** : सोन्याच्या बांगड्या, झुंबराएवढी कर्णफुलं, हिऱ्याच्या अंगठ्या, भारीभारी साड्या, काश्मिरी शालू. काही विचारू नकोस.

**सतीश** : बऱ्याच श्रीमंत दिसतायत वहिनीच्या मैत्रिणी. ओळख करून घेतली पाहिजे !

**मन्या** : अरे तुझ्या ह्या मैत्रिणी मला बघायच्या आहेत म्हटलं तर लगेच माझ्याकडे डोळे वटारून बघायला लागते आणि म्हणते, "तुम्ही झोपा गुपचुप ! डॉक्टरांनी तुम्हाला विश्रांती घ्यायला सांगितलंय ना ?" गेल्या पंधरा दिवस एखाद्या रोग्यासारखा बिछान्याला खिळून आहे मी.

**सतीश** : म्हणजे पंधरा दिवस तू घरीच आहेस ?

**मन्या** : हो.

**सतीश** : आणि वहिनी ?

**मन्या** : ती जाते ऑफिसला. संध्याकाळी ऑफिसातून येताना रोज एक नवीन वस्तू घेऊन येते. तिच्या पाठोपाठ डॉक्टर येतात !

**सतीश** : कोण डॉक्टर ?

**मन्या** : आहे एक मानसशास्त्रज्ञ ! तो इथे आल्यापासून मला स्वप्न पडेनाशी झाली.

**सतीश** : म्हणजे असं करतो तरी काय तो डॉक्टर ?

**मन्या** : ते मलाही माहीत नाही ! कारण तो डॉक्टर येतो तेव्हा एक तर मी झोपलेला तरी असतो किंवा तो आल्यावर थोड्याच वेळात मला झोप येते.

**सतीश** : मला वाटतं इथेच काहीतरी गोम असावी.

**मन्या** : ती कशी काय.

**सतीश** : तू झोपल्यानंतर इथं काय घडतं ते जर आपल्याला कळलं तर घरातल्या ह्या सुधारणांचा आपल्याला कदाचित उलगडा होईल ! ह्या सगळ्या वस्तू तुझ्या स्वप्नातल्याच नसतील कशावरून ?

मन्या : त्या स्वप्नातल्या असायला मी त्या वस्तूचं चित्र पहायला हवं ना आधी. आणि मी तर गेल्या पंधरा दिवसात एकही चित्र पाहिलेलं नाही. आणि समजा ह्या वस्तू स्वप्नातल्या असल्या तर मला जाग आल्यानंतर त्या अदृश्य का नाही झाल्या ?

सतीश : हं विचार करण्यासारखी गोष्ट आहे. पण मग ह्या वस्तू वहिनींने आणल्या कुठून ?

(दारावरची बेल वाजते)

मन्या : प्रतिमा आली वाटतं ! थांब मी पाहून येतो. (मन्या बाहेर जातो. सतीश सिगरेट पेटवतो. मन्या घाईघाईने परत येतो) सतीश, प्रतिमा आणि डॉक्टर दोघंही आले आहेत ! मी दाराच्या भोकातून पाहिलं. तू लप कुठेतरी ! मी झोपल्यावर डॉक्टर काय करतो हे बघण्याची नामी संधी आली आहे.

सतीश : (सिगरेट फेकून) कुठे लपू ? कपाटात लपू ?

मन्या : नको तू मावणार नाहीस त्यात (दारावरची बेल जोरात वाजते) आयडिया, तू ह्या मोळ्याच्या जागी बस. बस लवकर. (तो बसतो. मन्या त्याच्या अंगावर चादर टाकतो आणि दार उघडायला जातो. काही वेळाने आतून वाहवा ! वाहवा ! बहोत अच्छे ! असे उद्गार ऐकू येतात. आणि मग डॉक्टर, प्रतिमा आणि मन्या प्रवेश करतात. प्रतिमाने भरपूर दागिने आणि उंची कपडे घातलेले आहेत.)

डॉक्टर : वाः ! पंधरा दिवसात तुमच्या ब्लॉकमध्ये आणि तुमच्यात जमीन अस्मानाचा फरक झाला आहे !

मन्या : माझ्या ब्लॉकमध्ये झाला असेल, माझ्यात नाही. मी अद्याप जमिनीवरच आहे. आपल्या कृपेने !

प्रतिमा : फर्निचरवाल्याची माणसं आली होती ना इथे ?

मन्या : हो. मला सकाळी सांगितलं नाहीस त्याबद्दल काही.

प्रतिमा : अहो, आमचं अचानक ठरलं !

मन्या : आमचं म्हणजे ?

प्रतिमा : माझं आणि माझ्या मैत्रिणीचं ! आम्ही दुपारी ऑफिसात गप्पा

मारत असताना फर्निचरचा विषय निघाला. ती म्हणाली त्यांच्या ओळखीचा एक फर्निचर विक्रेता आहे.

**मन्या** : रुस्तमजी पेस्तनजी मोडतोडवाला...

**प्रतिमा** : तोच तो. माझ्या मनात चटकन विचार आला, घरातलं जुनं फर्निचर बदलून टाकावं...

**मन्या** : अगं पण पैसे...

**प्रतिमा** : पैशाची घाई नाही. कधीपण दिले तरी चालतील त्याना !

**मन्या** : भलताच वशिला दिसतोय तुझ्या मैत्रिणीचा.

**डॉक्टर** : तुमचा ब्लॉक आता एकदम मॉडर्न दिसायला लागला.

**प्रतिमा** : तरी अद्याप बरंच काही करायचं आहे. घरात एकसुद्धा जुनी वस्तु राहू द्यायची नाही मला.

**मन्या** : माझं काय? नाही म्हणजे मला राहू देणार आहेस ना ?

**प्रतिमा** : इश्श ! तुम्ही काय वस्तू आहात ?

**मन्या** : वस्तू नाही पण जुना आहे ना ?

**प्रतिमा** : (वरखाली निरखून पहात) नाही. इतके काही जुने नाहीत तुम्ही. एखादा पार्ट बदलून घेतला तर ठीक दिसाल ! काय डॉक्टर ? डॉक्टर जरा बसा हं. मी चहा घेऊन येते. आय ॲम कमिंग डार्लिंग !

**मन्या** : डार्लिंग ? मला तू डार्लिंग म्हणालीस ! घरातल्या फर्निचर बरोबर तुझी भाषाही बदलून घेतलीस की काय त्या रुस्तमजीकडनं.

**प्रतिमा** : ओह ! डोन्ट बी फनी, डार्लिंग !

**मन्या** : (उठतो) बसा, डॉक्टर. (डॉक्टर मोढ्यावर बसतो. सतीश केकाटतो.)

**डॉक्टर** : काय झालं हो.

**मन्या** : काही नाही मोढा नवीन आहे. जरा कुरकुरतोय !

**डॉक्टर** : (पुन्हा बसतो. सतीश केकाटतो) फार मोठ्याने कुरकुरतोय नाही !

**मन्या** : लेटेस्ट फॅशनचा आहे ना !

**डॉक्टर** : तसा आहे मात्र कंम्फर्टेबल. (चाचपून बघतो) आणि मजबूत-सुद्धा आहे. (सतीश अंग हलवतो. डॉक्टर कोलमडतो) हलतोय,

लेटेस्ट फॅशनचा आहे. नो डाऊट.

मन्या : ( अस्वस्थ ) डॉक्टर. तुम्ही आज लवकर आलात !

डॉक्टर : आणि लवकर जाणार आहे !

मन्या : थॅंक गॉड, नाही म्हणजे तुम्ही आलात म्हणून ' थॅंक गॉड.'

डॉक्टर : आता कशी आहे तुमची तब्येत ?

मन्या : बरी आहे. उद्यापासून ऑफिसला जाईन म्हणतो.

डॉक्टर : इतक्यात ऑफिसला जायची घाई करू नका.

मन्या : का ? अजून तुमचा कार्यभाग झाला नाही वाटतं. मला बरं करण्याचा ?

डॉक्टर : आणखी थोडे दिवस ट्रीटमेंट चालू राहिली तर रोग पुढेमागे उचल खाण्याची शक्यता नाही. ( डॉक्टर बोलत असताना मोढा हळूहळू चालायला लागतो. ) मोढा सरकतोय काहो ?

मन्या : नाही तुम्हाला भास होत असेल. ( डॉक्टराच्या नकळत सतीशला लाथ मारतो. )

डॉक्टर : तर आणखी काही दिवस नियमितपणे भरपूर विश्रांती आणि मानसोपचार आवश्यक आहेत. ( मोढा सरकतो ) मोढा नक्कीच लेटेस्ट फॅशनचा आहे. मी बोलायला लागलो की तो चालायला लागतो. ज्ञानेश्वरांनी भिंत चालवली होती ह्या गोष्टीवर माझा आज विश्वास बसला. मी जर मोढा चालवू शकतो तर त्यांना भिंत चालवणं काय कठीण होतं.

मन्या : तुम्हाला भास होतोय. मोढा तिथेच आहे.

डॉक्टर : (उठतो) असेल असेल. तर मी काय म्हणत होतो ?

मन्या : ( घाईघाईने ) आणखी थोडे दिवस ट्रीटमेंट चालू ठेवली पाहिजे.

डॉक्टर : येस आणि त्यासाठीच मी आज जरा लवकर आलोय. तुमची काही हरकत तर नाही ना !

मन्या : मुळीच नाही.

डॉक्टर : शाल वुई स्टार्ट ?

मन्या : यस सर.

डॉक्टर : बसा. माझ्या डोळ्यात बघा. रिलॅक्स. नो वरी नो टेन्शन ! यू आर

गोईंग टू स्लीप... (मन्या संमोहित होतो. डॉक्टर खिशातून नोटांचे फोटो काढतो. मोढ्याचे कव्हर वर करून सतीश बघतो.) हे फोटो बघा. शंभराच्या नोटांचे. ह्या फोटोतल्या नोटा आता तुमच्या स्वप्नात येतील. तुम्ही ते स्वप्न रात्रभर बघायचं आहे! कळलं? जाऊन झोपा आता. (मन्या पलंगावर जाऊन झोपतो. प्रतिमा प्रवेश करते. हातात चहाचा ट्रे.)

**प्रतिमा** : (हळू आवाजात) आज इतक्या लवकर?

**डॉक्टर** : त्यानेच घाई केली.

**प्रतिमा** : आज काय खरेदी करायची?

**डॉक्टर** : तू म्हणशील ते! आता तर हस पाहू. (चादरी खालून सतीश हसतो) वाः काय सुंदर हसतेस ग तू!

**प्रतिमा** : नाक्यावरचा तो हिरालाल मोतीलाल मारवाडी आहे ना! त्याच्याकडे हिऱ्यांचा एक सुंदर नेकलेस आहे. तो हवा आहे मला.

**डॉक्टर** : दिला. पण मोबदल्यात तू काय देणार आहेस मला!

**प्रतिमा** : चहा घ्या!

**डॉक्टर** : गेले दोन आठवडे तुझ्यासाठी मी जिवाचं रान करतोय...आणि तू माझ्यासाठी...

**प्रतिमा** : तुमच्यासाठी रजा नाही का घेतली मी पंधरा दिवसांची?

**डॉक्टर** : फायदा काय तुझ्या रजेचा? अंगाला हातसुद्धा लावू देत नाहीस?

**प्रतिमा** : आता बोलण्यात वेळ घालवू नका.

**डॉक्टर** : किती दिवस तू एकटी चैन करणार आहेस! आता जरा माझा विचार कर.

**प्रतिमा** : तुमचं नाव वेटिंग लिस्टवर ठेवलंय मी. व्हेकन्सी झाली की कळवीन. आता प्लीज. (ट्रे घेऊन आत जाते)

**डॉक्टर** : (काही बोलण्यासाठी तोंड उघडतो पण) ऑल राईट! (मन्याजवळ जातो. त्याच्या अंगावरचे पांघरूण दूर करतो. प्रगट झालेल्या नोटांची पुडकी उचलून बघतो. सतीश हळूच चादर वर करून ती पुडकी बघतो.) (आनंददायक म्युझिक)

अंक २ रा समाप्त

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. २०७९६ नों. दि. १५।१२।८५
वि. नाटक क्र. ........

# अंक ३ रा

[ दृश्य : तेच
वेळ : दुसऱ्या दिवशी सकाळी. प्रतिमा चहाचा ट्रे घेऊन प्रवेश करते ]

**प्रतिमा** : ( मन्याला हलवून जागा करीत ) अहो, उठा ना ! वाजले किती बघा !

**मन्या** : ( खडबडून जागा होतो ) भूऽऽत, भूऽऽत !

**प्रतिमा** : अहो, भूत भूत काय - मी तुमची बायको आहे.

**मन्या** : ओह ! मला वाटलं एखाद्या भुतानंच मला झपाटलं.

**प्रतिमा** : भुताची काय बिशाद आहे तुम्हाला झपाटायची ?

**मन्या** : ( अंग मोडीत ) तेही खरंच ! तू जवळ असताना भुताला सवड कशी मिळणार ?

**प्रतिमा** : काय म्हणालात ! मी भुतासारखी वाटते ?

**मन्या** : छे, छे ! मुळीच नाही. तुला भूत म्हणून मी बिचाऱ्या भुतांचा कशाला अपमान करू ?

**प्रतिमा** : काय !!!

मन्या : अगं, खरंच! माणसाला कधी भुताची उपमा देऊ नये! भुतं उलट्या पायाची असतात. माणसं उलट्या काळजाची असतात.

प्रतिमा : तुमची झोप अद्याप उडालेली दिसत नाही. काय हो, तुम्ही काय बोलता ते तुमचं तुम्हाला तरी कळतं का?

मन्या : लक्षपूर्वक ऐकलं तर कळतं कधी कधी!

प्रतिमा : बरं बरं, उठा आता. चूळ भरा! चहा थंड होतोय.

मन्या : माझ्यात आता उठायचं त्राण नाही. रात्रभर झोपल्यामुळे थकवा आलाय मला. थोडं पाणी दे, इथेच चूळ भरून टाकतो.

प्रतिमा : इथे? काय वेडबीड लागलंय की काय तुम्हाला?

मन्या : तेवढंच बाकी राह्यलं आहे! आण ते पाण्याचं भांडं की चहानंच चूळ भरू?

प्रतिमा : हं हे घ्या पाणी! चहानं चूळ भरताहेत! मग आंघोळ कशानं, दुधानं करणार वाटतं. (तो खिडकीतून चूळ टाकतो) अहो, हे काय करताय? कुणाच्या अंगावर पडेल ना पाणी?

मन्या : पडू दे! सूर्य बराच वर आलाय! अंगावर पडलेल्या पाण्याची वाफ होऊन जाईल. (चहा घेत) वाजले किती?

प्रतिमा : फार लवकर विचारलंत! नऊ वाजले नऊ.

मन्या : म्हणजे बारा वाजायला अजून वेळ आहे! आज ऑफिसला दांडी का?

प्रतिमा : हो, पण मी जरा बाहेर जाणार आहे. माझ्या एका मैत्रिणीचा साखरपुडा आहे. मला आग्रहानं बोलावलंय!

मन्या : असं? मग मी पण येतो तुझ्याबरोबर!

प्रतिमा : तुम्ही? नको, नको. अहो, आम्ही सगळ्या मुलीमुलीच जमणार आहोत.

मन्या : तुझ्या मैत्रिणीचा साखरपुडा मुलीशी आहे?

प्रतिमा : तसं नाही हो. पण आम्हा बायकांमध्ये तुम्हाला उगाच संकोचल्यासारखं होईल.

मन्या : मुळीच नाही. उलट मी पुरुषांमध्ये संकोचतो. बायकांत मी एकदम फ्री असतो.

प्रतिमा : तेच मला नकोय! शिवाय तुम्हाला विश्रांती घ्यायला सांगितली आहे ना! तुम्ही झोपून रहा दिवसभर.

मन्या : एकूण आजही तुझा सहवास मला लाभणार नाही तर!

प्रतिमा : आता तुम्ही म्हणत असाल तर नाही जात मी.

मन्या : जा, जा. माझ्यापेक्षा लोकांना तुझी गरज जास्त असेल. तरी मी मुळीच मोडता घालणार नाही. तुझ्या उपस्थितीत तुझ्या मैत्रीणीचा साखरपुडाच काय– तिचं लग्न होऊन तिला मुलंबाळं झाली तरी माझी काही हरकत नाही!

प्रतिमा : (उठत) तुमच्याशी वाद घालण्यात अर्थ नाही. मला उशीर होतोय. मी निघते.
(दारावरची बेल वाजते)

प्रतिमा : कोण आलंय कोण जाणे

मन्या : तो डॉक्टर असेल. तो व्हिलन ह्या घरात आल्यापासून माझ्या जिवाचा काही भरवसा राहिला नाही.

प्रतिमा : काही बोलू नका. डॉक्टरांमुळे तुमची त्या भयानक स्वप्नातून सुटका झाली.

मन्या : आता त्याच्या हातून सुटका झाली म्हणजे सुटलो!
(ती आत जाते. मन्या उठून दरवाजा उघडतो. सतीश येतो.)

सतीश : गुड मॉर्निंग!

मन्या : अरे तू होय. मला वाटलं डॉक्टरच आला.

सतीश : डॉक्टर एवढ्यात येणार नाही. तो थांबलाय एका बसस्टॉपवर वहिनींची वाट पहात.

मन्या : म्हणजे?

सतीश : अरे, काल रात्री...
(प्रतिमा येते. एकदम विषय बदलून) गंगेला जो महापूर आला–

प्रतिमा : काय, सतीश भाऊजी, आज एकदम सकाळी?

सतीश : आलो सहज, गेल्या महिन्यात घेतलेले पन्नास रुपये परत द्यायला आलो.

प्रतिमा : बोलणं खूप मनाला लावून घेतलेलं दिसतं आहे!

सतीश : छे: ! ते मी कधीच विसरलो !
प्रतिमा : घरी सगळं काही ठीक आहे ना ? ( घड्याळाकडे बघते. )
सतीश : हो, ठीक आहे. आता आठवा महिना चालू आहे. म्हणजे थोडा त्रास होणारच, नाही का ?
प्रतिमा : चहा वगैरे घेणार ?
सतीश : नको. थँक्स् !
मन्या : प्रतिमा, जा तू. उशीर होतोय ना तुला.
प्रतिमा : हो. ( घाईघाईने वळते. )
मन्या : आणि हे बघ... काही नाही जा. ( ती घाईघाईने जाते. ) हं बोल सतीश, काल रात्री तू काय पाहिलंस ?
सतीश : आपला तर्क बरोबर ठरला. अरे त्या डॉक्टरने तुझ्यावर हिप्नॉटिझमचा प्रयोग करून तुला स्वप्न बघायची सूचना दिली.
मन्या : कसलं स्वप्न ?
सतीश : नोटांचं !
मन्या : नोटांचं ?
सतीश : हो. त्यानं तुला शंभराच्या नोटांचे फोटो दाखवले आणि तू त्या नोटांचं स्वप्न बघितलंस.
मन्या : मग काय ! तुझ्या बिछान्याखाली शंभराच्या नोटांची ही एवढी पुडकी प्रगट झाली.
मन्या : काय म्हणतोस !
सतीश : अरे खरंच ! मी आयुष्यात कधी इतक्या नोटा पाहिल्या नव्हत्या ... आपल्या तर बुवा तोंडाला पाणी सुटलं.
मन्या : बरं पुढे काय झालं ?
सतीश : मी तोंड पुसलं !
मन्या : ते नाही रे म्हणत मी.
सतीश : हां पुढे त्या नोटा घेऊन तो डॉक्टर आणि प्रतिमा धावत धावत ह्या खोलीतून बाहेर गेले. मी होतोच त्यांच्या मागोमाग. नंतर त्या दोघांनी काय केलं ठाऊक आहे ?
मन्या : काय केलं ?

**सतीश** : बाहेर गेल्यावर त्यांनी एक टॅक्सी बोलावली. टॅक्सीवाल्यानं टॅक्सी थांबवली नाही. त्यांनी दुसरी टॅक्सी बोलावली. टॅक्सीवाल्यानं टॅक्सी थांबवली नाही. त्यांनी तिसरी टॅक्सी बोलावली...

**मन्या** : टॅक्सी गेली खड्ड्यात... पुढे बोल.

**सतीश** : त्याच टॅक्सीत वसून ते निघाले...

**मन्या** : तू त्यांचा पाठलाग नाही केलास ?

**सतीश** : केला ना. मी एक टॅक्सी बोलावली. टॅक्सीवाल्यानं टॅक्सी लगेच थांबवली. मी म्हटलं 'वो टॅक्सीका पीछा करो' आणि मी टॅक्सीत बसायच्या आतच त्यानं पीछा करायला सुरुवात केली. मी दुसरी टॅक्सी बोलावली.

**मन्या** : (वैतागून) ती तुझ्या अंगावरून गेली.

**सतीश** : नाही. त्याच टॅक्सीत बसून मी त्यांचा पाठलाग सुरू केला. मध्येच एक सिग्नल आला. त्या सिग्नलजवळ त्यांची टॅक्सी थांबली. बराच वेळ सिग्नल मिळेना पाच मिनिटं झाली. दहा मिनिटं झाली.

**मन्या** : आता किती वेळ सिग्नलजवळ थांबणार आहेस ?

**सतीश** : शेवटी, एकदाचा सिग्नल मिळाला. त्यांची टॅक्सी वळणं घेत घेत...

**मन्या** : (वैतागून) पण हे सांगताना तू कशाला वळणं घेतो आहेस ? मुद्याचं बोल ना !

**सतीश** : मुद्याचं म्हणजे ती टॅक्सी वळणं घेत घेत इथल्या नाक्यावरच्याच एका मारवाड्याच्या दुकानासमोर थांबली.

**मन्या** : नाक्यावरच्या ? त्या हिरालाल मोतीलाल मारवाड्याच्या ?

**सतीश** : हो. असलंच काहीतरी अगडम बगडम नाव आहे त्याचं ! दोघंही टॅक्सीतून उतरले आणि मग डॉक्टर त्या दुकानात शिरला.

**मन्या** : आणि ही ?

**सतीश** : ती बाहेरच उभी राहिली. त्या डॉक्टरने तुझ्या स्वप्नातले पैसे देऊन काही तरी खरेदी केलं !

**मन्या** : म्हणजे ! त्या दुकानदाराला ते पैसे खरे वाटले ?

**सतीश** : हो.

**मन्या** : त्या नोटा अदृश्य झाल्या नाहीत ?

**सतीश** : कशा होतील ? तू त्या नोटांचं स्वप्न बघत नव्हतास का ?

**मन्या** : म्हणजे... म्हणजे घरातल्या ह्या सगळया वस्तू प्रतिमानं माझ्या स्वप्नातल्या पैशातून आणल्या आहेत ?

**सतीश** : असं वाटतं बुवा !

**मन्या** : माय गॉड ! सतीश, अरे ही तर चोरी आहे ! पोलिसांना कळलं तर ?

**सतीश** : पोलिसांकडे गेल्या पंधरा दिवसांत शेकडो तक्रारी गेल्या आहेत ! गल्ल्यातल्या नोटा बघता बघता गायब होतात. म्हणून मुंबईतल्या सगळया व्यापाऱ्यांच्या पोटात गोळा आला आहे ! पंधरा दिवसांत जवळ जवळ सगळया बँकांनी चोरीच्या तक्रारी नोंदवल्या आहेत. काऊंटरवरची कॅश बघता अदृश्य होते. म्हणजे त्यातही ह्या दोघांचाच हात असणार.

**मन्या** : बापरे ! म्हणजे उद्या पोलिसांनी ह्यांना पकडलं तर माझाही गळा गुंतायचा !

**सतीश** : अगदी हाच विचार माझ्या मनात थैमान घालतो आहे ! मन्या, कसंही करून त्या डॉक्टरला आपण मुद्देमालासकट पोलिसांच्या ताब्यात दिलं पाहिजे.

**मन्या** : त्यालाच का ? हिलाही दिलं पाहिजे पोलिसांच्या ताब्यात. गेले पंधरा दिवस तिनं चक्क माझी फसवणूक चालवली आहे. तिचं आणि डॉक्टरचं नक्कीच लफडं असणार.

**सतीश** : मला नाही वाटत ! वहिनीनं त्या डॉक्टरला स्पर्शसुद्धा करू दिला नाही.

**मन्या** : कशावरून म्हणतोस ?

**सतीश** : त्यांच्या टॅक्सीचा ड्रायव्हर समोरच्या आरशातून बघत होता.

**मन्या** : तुला कसं कळलं ?

**सतीश** : त्यानंच सांगितलं. मी त्याला पाच रुपये दिल्यावर. म्हणजे मी तुला आता फक्त पंचेचाळीस रुपये द्यायचे !

**मन्या** : आणखी...आणखी काय सांगितलं त्या ड्रायव्हरने ?

सतीश : आज नऊ वाजता दोघं एका बसस्टॉपवर भेटणार आहेत!

मन्या : अच्छा म्हणजे हिच्या मैत्रिणीचा साखरपुडा बसस्टॉपवर होणार आहे तर! हरामखोर बदफैली! मी त्या दोघांचा जीव घेईन!

सतीश : बरं झालं सांगून टाकलंस! आता त्यांच्या जिवाला धोका नाही.

मन्या : तू आता बघच! तिनं माझा असा गळा कापला, मी तिचा तसा गळा कापणार!

सतीश : ए असलं काही बोलू नकोस! तुझ्या तोंडी असली भाषा शोभत नाही. म्हणे गळा कापणार! गळा कापणं म्हणजे तुला काय मुळा कापण्याइतकं सोपं वाटलं?

मन्या : माझा राग तुला माहीत नाही. मी तिचा सुरीनं खून केल्याशिवाय राहणार नाही!

सतीश : नको नको. तसं काही करू नकोस. हातबीत कापून घेशील.

मन्या : तू मला अद्याप पुरतं ओळखलं नाहीस!

सतीश : शाळेत असल्यापासून ओळखतो. रंगपेटीतला लाल रंग पाहून बेशुद्ध पडणारा तू! तू काय खून करणार!

मन्या : अरे मग मी करू तरी काय! तो डॉक्टर माझ्याकडून बिल वसूल करतो आहे. ते मी शांतपणे बघत बसू? त्या व्यभिचारी बायकोला...

सतीश : थांब मन्या, वहिनींवर एवढ्यात असले घाणेरडे आरोप करू नकोस. आपण आणखी खात्री करून घेऊ या!

मन्या : ती कशी?

सतीश : मला एक युक्ती सुचली आहे. ती सांगण्यासाठीच मी एवढ्या तातडीने आलो आहे बघ. मन्या, तुझ्याकडे वहिनींचा एखादा फोटो आहे?

मन्या : कशाला?

सतीश : त्या डॉक्टरशी तुझ्या बायकोचे संबंध कोणत्या स्वरूपाचे आहेत हे आपल्याला तुझी बायकोच सांगेल — फोटोमधली.

मन्या : कल्पना सुरेख आहे! पण फोटोतली प्रतिमा प्रगट होईल त्यावेळी तो डॉक्टर इथं असायला हवा ना!

सतीश : ती व्यवस्था मी केलेली आहे. कोणत्याही क्षणी तो डॉक्टर इथे येईल.

मन्या : पण तो तर बसस्टॉपवर... ?

सतीश : हे बघ, तू बोलण्यात वेळ घालवू नकोस ! ताबडतोब प्रतिमा वहिनींचा एखादा फोटो बघ.

मन्या : ( फोटो शोधू लागतो. एक फोटो निवडून ) हा चालेल ? लग्नापूर्वीचा आहे.

सतीश : प्रयत्न करून बघ ! तो डॉक्टर तुला हिप्नॉटाईझ करताना जे बडबडतो ते आठव ! चल मी तुला हिप्नॉटाईझ करतो. ( सतीश त्याच्या डोळ्यांसमोर हात धरून पुटपुटायला लागतो. मन्या हसतो, पण सतीश गंभीरपणे– 'तुम्हाला झोप येतेय' वगैरे पुटपुटतो. सुरवातीला अपयश– नंतर हळूहळू मन्याला झोप येते... तो झोपतो. सतीश चाट होतो. फोटोतली प्रतिमा प्रकट होते. स्लॅक्समधली. )

प्रतिमा : हाय डार्लिंग !

सतीश : ए मी नाही तुझा डार्लिंग ! दिसेल त्याला डार्लिंग म्हणतेस काय !

प्रतिमा : अय्यो ! मन्या...

सतीश : शू ! तो झोपलाय. त्याला उठवू नकोस !

प्रतिमा : तू कोण ?

सतीश : मी सतीश...त्याचा मित्र

प्रतिमा : हॅलो सतीश !

सतीश : नुसतं सतीश नाही. सतीशभाऊजी !

प्रतिमा : सतीशभाऊजी ?

सतीश : नवऱ्याच्या मित्राला भाऊजी म्हणायची पद्धत आहे. त्यामुळे नवऱ्याला संशय येत नाही.

प्रतिमा : नवरा ?

सतीश : मन्या तुझा नवरा नाही का ?

प्रतिमा : इश्श ! अजून आमचं लग्न कुठे झालंय ?

सतीश : म्हणजे ? तुला माहीत नाही ? अगं, तुझं लग्न झालेलं आहे

मन्याबरोबर.

**प्रतिमा** : खरंच ? माझं लग्न झालंय ? मन्याबरोबर ? अय्या मज्जा !

**सतीश** : ( वेडावून ) अय्या मज्जा ! मज्जाबिज्जा काही नाही. तुमचा हनिमून होऊन चार वर्षं झाली आहेत.

**प्रतिमा** : मग मला कसं कळलं नाही ?

**सतीश** : तू त्यावेळी लहान होतीस...पासपोर्ट साईज.

**प्रतिमा** : ( काही कळत नाही ) असं ! म्हणजे हनिमूनला पासपोर्ट साईज चालत नाही !

**सतीश** : नाही ! हनिमूनला पासपोर्टची गरज नसते. साधं घरगुती परमिट चालतं !

**प्रतिमा** : ए. पण खरंच आमचं लग्न झालंय म्हणतोस ?

**सतीश** : हो !

**प्रतिमा** : मग आमची मुलं कुठं आहेत ? शाळेत गेली ?

**सतीश** : नाही. कॉलेजात गेली ! अजून मुलांचा पत्ता नाही ! आणि म्हणे शाळेत गेली ! ती मुलं राहू देत बाजूला ? मन्याने, तुझ्यावर एक कामगिरी सोपविली आहे ?

**प्रतिमा** : कसली कामगिरी ?

**सतीश** : तुला थोडा वेळ मन्याच्या बायकोसारखं वागावं लागेल.

**प्रतिमा** : ( उड्या मारून ) अय्या, मज्जा !

**सतीश** : ( तिच्याकडे वैतागून बघत ) अय्या मज्जा ! मन्याची बायको अशी नाही वागत ! ती खूप कडक आहे !

**प्रतिमा** : मी कुठे नरम आहे ?

**सतीश** : ती अतिशय संशयी आणि जराशी भांडकुदळ आहे. ( प्रतिमा आधी संशयीपणाचं आणि नंतर भांडकुदळपणाचं माइमिंग करते.) फक्त मन्याच्या बाबतीत. ( ती दूर होते. ) आता तू एकच करायचं !

**प्रतिमा** : काय करायचं ?

**सतीश** : त्या कपाटातून एक साडी घे ! ( ती धावत जाऊन कपाट उघडते आणि एक साडी काढते. ) ती नेस. अगं, अगं, तो ड्रेस राहू दे अंगावर ! साडी नुसतीच गुंडाळून घे. ( अंगाभोवती साडी लपेटून

घेते. ) हं, आता बोल पाहू मन्याच्या बायकोसारखं! समज मी मन्या आहे.

**प्रतिमा** : अहो, ऐकलंत का! जरा नाक्यावर जाऊन भाजी घेऊन या! मेलं सकाळपासून बघतेय नुसतं लोळणं चालू आहे. भाजी आणायला जा. आणि लवकर परत या. रस्त्यात कुठे बाइबिई दिसली तर बघत उभे राहू नका! मेलं माझ्याबरोबर असले तरी बायकांकडे वळून वळून काय बघतात कोण जाणे? एक दिवस चांगला धडा शिकवणार आहे मी.

**सतीश** : हे काय?

**प्रतिमा** : हा भांडकुदळपणा! आणि जरा इकडे या हो. तुमच्या गालावर लाल डाग कसला आहे?

**सतीश** : तो...तो शाईचा असेल.

**प्रतिमा** : हल्ली तुमच्या ऑफिसातली स्टेनो ओटांना तांबडी शाई लावून येते वाटतं!

**सतीश** : हे काय?

**प्रतिमा** : हा संशयीपणा. अहो, आज किनई मी तुमच्यासाठी खीर केली आहे. तुम्हाला आवडते ना म्हणून. मला चाई प्युअरसिल्कची साडी खूप आवडते! डार्लिंग आज पगार झालाय ना तुमचा? (सतीशला) हा प्रेमळपणा!

**सतीश** : वाः वाः वा! काय बाकी ॲक्टिंग आहे (ती पदर सावरते.) हां! आता मी काय सांगतो ते नीट लक्ष देऊन ऐक. ती साडी राहू दे अंगावर.

**प्रतिमा** : हं बोल.

**सतीश** : एवढ्यात इथं एक डॉक्टर येईल.

**प्रतिमा** : अय्या डॉक्टर? मी माझी नाडी तपासून घेईन?

**सतीश** : तसला नाडीवाला डॉक्टर नाही तो. दाढीवाला डॉक्टर आहे. तो एक बदमाश आहे. मन्याच्या स्वप्नातल्या पैशावर चैन करतो आहे. तुझी महत्त्वाची कामगिरी म्हणजे गेल्या पंधरा दिवसांत त्या डॉक्टरने आणि तू आतापर्यंत काय काय भानगडी केल्या आहेत

हे त्याच्या तोंडून वदवून घेणं! कळलं!
(दारावरची बेल वाजते.) बघ आलाच वाटतं तो! जा. दरवाजा उघडून त्याला आत घे! मी ह्या कपाटात लपून बसतो. आणि हे बघ जरा जपून. त्याला संशय येता कामा नये! जा. आणि हे बघ तुला तो आज बसस्टॉपवर भेटणार होता. हे लक्षात ठेवून बोल. जा आणि हे बघ. तुझी स्लॅवस खालून दिसते आहे! (ती साडी व्यवस्थित करून दरवाजा उघडायला जाते. डॉक्टर प्रवेश करतो. सतीश कपाटात लपतो.)

डॉक्टर : (प्रवेशून) काय हे प्रतिमा, किती वेळ वाट बघायची तुझी बसस्टॉपवर? एक तर ऑफिसची वेळ असल्यामुळे तिथे ही गर्दी, लोकांनी मला दोनतीनदा बळेबळे बसमध्ये सुद्धा चढवलं होतं. तशात त्या बसस्टॉपवर भिकाऱ्यांचा सुळसुळाट. भिकाऱ्यांच्या त्या गर्दीत कुणीतरी माझ्याच हातावर दहा पैसे ठेवून गेलं. (ती हसते.) हसतेस काय! खोटं वाटत असेल तर हे बघ. खोटे आहेत! आणि काय ग, त्या माणसाला माझ्याकडे कशाला पाठवलं होतंस?

प्रतिमा : कोणत्या माणसाला?

डॉक्टर : एक जण बसस्टॉपवर आला आणि माझ्या कानात पुटपुटला 'प्रतिमाने तुम्हाला ताबडतोब घरी बोलावलं आहे.' आणि मी काही विचारायच्या आत तो बसमध्ये चढून निघूनसुद्धा गेला. त्याला मात्र कंडक्टरने बसमध्ये घेतलं! कोण होता ग तो?

प्रतिमा : मला माहीत नाही.

डॉक्टर : म्हणजे? त्याला तू पाठवलं नव्हतंस?

प्रतिमा : नाही. मला तरी आठवत नाही.

डॉक्टर : मग नक्कीच तो सी. आय्. डी. असणार.

प्रतिमा : कशावरून?

डॉक्टर : चांगला उंच आणि धिप्पाड होता. अशी माणसं एकतर पोलिसात तरी असतात नाही तर नाटक कंपनीत तरी.

प्रतिमा : मग तो नाटकवाला नव्हता कशावरून?

डॉक्टर : नाटकवाला असता तर तू मला बोलवलं आहेस असा निरोप घेऊन तो माझ्याकडे आला नसता. तो स्वतःच तुझ्याकडे आला असता– माझ्यासारखा मेकअप करून. प्रतिमा, आता आपल्याला घाई केलीच पाहिजे, पोलीस आपल्या मागावर आहेत.

प्रतिमा : म्हणजे ! आपण असं केलं तरी काय ?

डॉक्टर : जसं काही तुला ठाऊकच नाही.

प्रतिमा : खरंच ठाऊक नाही. मी अजून लहान आहे – पासपोर्ट साईज.

डॉक्टर : काय बडबडते आहेस ? अरे हो, बरी आठवण झाली, प्रतिमा आपण आता पासपोर्टची तयारी केली पाहिजे. मी पासपोर्ट साईजचा फोटोसुद्धा काढून घेतला आहे !

प्रतिमा : कशाला ?

डॉक्टर : अगं आपण दूर कुठे तरी जाणार आहोत ना !

प्रतिमा : कुठे ?

डॉक्टर : ते मी अद्याप ठरवलेलं नाही – पण मी बहुतेक तुला घेऊन आफ्रिकेत जाईन. तिथल्या निग्रो बायकात तू सुंदर दिसशील.

प्रतिमा : आणि तिथल्या पुरुषात तुम्हीही गोरे दिसाल.

डॉक्टर : म्हणजे तू माझ्याबरोबर यायला तयार आहेस तर !

प्रतिमा : म्हणजे ?

डॉक्टर : अगं कालपर्यंत तुझं नक्की नव्हतं !

प्रतिमा : पण मन्या परवानगी देईल का ?

डॉक्टर : हा मन्या कोण आला ?

प्रतिमा : माझा नवरा हो !

डॉक्टर : बापरे ! त्याला मी साफ विसरूनच गेलो होतो. कुठं आहे तो ?

प्रतिमा : तो काय झोपला आहे !

डॉक्टर : झोपू दे. झोपू दे. कारण तो उठला तर तिकडे तो मारवाडी झोपेल.

प्रतिमा : म्हणजे ?

डॉक्टर : अगं, रात्री आपण नेकलेस नाही का घेतला त्याच्याकडून ! ते पंचवीस हजार रुपये हा जागा झाल्याबरोबर नाहीसे होणार ! चल प्रतिमा, आता जरा माझ्याबरोबर चल.

**प्रतिमा** : कुठे ?

**डॉक्टर** : मी एका हॉटेलात खोली बुक केली आहे ! चल लवकर ( तिचा हात धरतो )

**प्रतिमा** : हात सोडा.

**डॉक्टर** : ( करड्या स्वरात ) नाही सोडणार ! गेले पंधरा दिवस अंगाला हात लावू दिला नाहीस मला. टॅक्सीतून जाताना सुद्धा दोघांच्यामध्ये तू पर्स ठेवतेस.

**प्रतिमा** : ( सुटायची धडपड करीत ) आई ग, अहो सोडा ना !

**डॉक्टर** : निमूटपणे चल – नाहीतर उचलून नेईन. मग बेहेत्तर आहे माझ्या पाठीचा कणा मोडला तरी. ( तिला फरफटत घेऊन जातो.) ( सतीश कपाटातनं बाहेर पडतो आणि कपाळावर हात मारतो. काही वेळ काय करावं तेच त्याला सुचत नाही. मग धावत जाऊन मन्याला उठवू लागतो. तो काही उठत नाही. )

**सतीश** : अरे, मन्या उठ. उठ. अरे तो डॉक्टर त्या पोरीला घेऊन गेला. हॉटेलात. लवकर उठ नाहीतर तिची वाट लावील तो. मन्या ए मन्या ( त्याला उठवून बसवतो. तो पुन्हा झोपतो ) अरे ! हा तर गाढ झोपला आहे ! मन्या, मन्या, (खिडकीशी जाऊन) मन्या, उठ तो बघ टॅक्सीत बसून गेला सुद्धा तिला घेऊन. अरे, ऊठ ( लाथ मारतो ) साला. थांब, तुझ्या तोंडावर पाणीच ओततो. ( आत जायला वळतो. हिरालाल मोतीलाल मारवाडी प्रवेश करतो. )

**मारवाडी** : अरे ते साला दाढीवाला आता इथे आला होता काय ? ते दाढीवाला कोट टाय पेरलेला. आता हे फ्लेटमधून एक बायला घेऊन लिफ्टमधून खालती गेला ते.

**सतीश** : आपण कोण ?

**मारवाडी** : हिरालाल मोतीलाल मारवाडी ( सतीश दचकतो. ) ते दाढीवाला इथेच राहते काय ?

**सतीश** : नाही. का ?

**मारवाडी** : खोटा बोलू नको भाय ! आमच्या जिंदगीचा सवाल हाय ! ते दाढीवालाने आमचा सत्यानाश केला.

**सतीश** : का ? काय झालं ?

**मारवाडी** : अरे, काल रातला ते आमचे दुकानातून पंचवीस हजाराचा नेकलस घेऊन गेला आन आज सकाळी आमी बरबाद झाला.

**सतीश** : बरबाद झाला ? का ? भवानीच्या वेळी तुमच्या दुकानाला आग लागला काय ?

**मारवाडी** : अरे, ते माणसाने दिलेला समदा रुपया गायब झाला. (रडू लागतो.)

**सतीश** : गल्ला मोजताना तुम्ही झोपला होता काय ?

**मारवाडी** : म्हनजी ?

**सतीश** : गल्ला मोजताना इकडे तुमचा डोळा लागला असेल– आणि तिकडे तुमच्या नोकरानं चान्स घेतला असेल !

**मारवाडी** : नाय रे नाय ! धंदा चांगला होते तवा मला झोप नाय येत.

**सतीश** : तरी पण तुम्हाला तुमचे नोकराचा डाऊट नाय येत ?

**मारवाडी** : अरे, आमचा नोकर कंदी बी चोरी नाय करेल. कसा करेल ? आमचा बापच आमचेकडे नोकरी करते. अने चोरी कसा असेल भाय, सकाळी मी सोता रुपया गिनत होता. साला बगता बगता समदा नोट गायब झाला. ते साला संतोषीमाता मंदी संतोषीमाता गायब होते ना ! अगदी ते परमाने ! मी तर साला डोक्यावर हात मारला. खुदकुशी करायच्या इचारात होता मी. एवढ्यामंदी ते दाढीवाला हे बिल्डिंगमंधी घुसलेला पायला. तवा मी त्याच्या पुळपुळ धावत इकडे आला. ते कुठे गहते बोल नी मला तेला इचारायचं हाय हा काय साला तू जादू केलाय.

**सतीश** : मला त्याचा पत्ता माहीत नाही. तुम्ही पोलिसात कम्प्लेंट द्या.

**मारवाडी** : अरे, साला ते पोलीस मलाच येड्यामंदी काढेल. माझ्यापाशी कायबी प्रुफ नाय ! आता मी माझ्या बायकोला काय मुह दाखवेल. सकाळपासून तिने घुंघट भी नाय वर केला. रुपिया मिळाला नाय तो साला आज रातला मला दुकानामधी झोपावा लागेल.

**सतीश** : असं ? मग मला तुमचा पत्ता सांगा– पत्ता सांगा.

**मारवाडी** : ( संशयाने ) कशाला ? माझा पत्ता कशाला पाहिजे तुला ?

**सतीश** : नाही, म्हणजे त्या दाढीवाल्याचा पत्ता लागला की मी तुम्हाला

पत्राने कळवितो.

**मारवाडी** : तोवर मी दुकानामंदी झोपेल काय ! ए, भाय, मजाक नको रे करू (पाया पडतो. सतीश मागे मागे जातो. मारवाडी रांगत रांगत त्याच्या रोखाने जातो) सांग ना रे तेचा पत्ता–

**प्रतिमा** : (प्रवेशून) सतीशभाऊजी, हा कोण ?

**मारवाडी** : ए बाय ते दाढीवाला कुठे गेला बोलनी.

**प्रतिमा** : कोण दाढीवाला ?

**मारवाडी** : ते आता तुला घेऊनशान लिफ्टमधून गेला ते.

**प्रतिमा** : मला घेऊन ?

**मारवाडी** : हां, तुला घेऊन. ते साला दाढीवाला जादूगार हाय ! काल रात्री तेने पच्चीस हज्जाराचा नेकलेस माझ्या दुकानातनं घेतला... आन ते समदा रुपिया सकाळी गायब झाला.

**प्रतिमा** : तो...तो इथे आला होता ?

**मारवाडी** : हां, ते तुला घेऊन नाय का गेला आता !

**प्रतिमा** : हा काय प्रकार आहे ?

**सतीश** : शेटजी, तुम्हाला सांगितलं ना आम्हाला त्याचा पत्ता माहीत नाही म्हणून !

**मारवाडी** : अरे असा नको करून. नाय तो साला, मी पोलीसला घेऊन येईल इथे !

**सतीश** : पोलीसला ? थांबा. तो दाढीवाला ना ! मी मी ओळखतो त्याला. आता पुन्हा तो इथे आला की मी त्याला तुमच्याकडे पाठवून देईन. तुम्ही लगेच त्याला पोलिसाच्या ताब्यात द्या.

**मारवाडी** : भाय मस्करी नाय ना करते तुमी ?

**सतीश** : नाही, नाही. मी खरंच त्याला तुमच्याकडे पाठवून देईन. तुम्ही सावध रहा.

**मारवाडी** : मस्करी नाय ना करते...माजा पच्चीस हज्जाराचा सवाल हाय. जाते मी. (जातो.)

**प्रतिमा** : तुम्ही अद्याप इथेच आहात ?

**सतीश** : तुझीच वाट बघत होतो.

**प्रतिमा** : ( दचकून त्याच्याकडे बघते ) म्हणजे ?

**सतीश** : मला वाटलं...तो डॉक्टर तुझी आता वाट लावणार !

**प्रतिमा** : काय बोलताय तुम्ही हे !

**सतीश** : त्यानं तुझा हात काय घट्ट धरला होता, नाही ?...
( तिचा हात धरून ) लागलं तर नाही ना !

**प्रतिमा** : ( भडकून )सतीशभाऊजी, लाज नाही वाटत माझा हात धरायला ?
( मन्याकडे जाऊ लागते ).

**सतीश** : तो झोपला आहे, त्याला उठवू नकोस. अजून आपला कार्यभाग झालेला नाही.

**प्रतिमा** : म्हणजे तुमचा विचार काय आहे ?

**सतीश** : तू आणि त्या डॉक्टरनं गेल्या दोन आठवड्यांत काय काय भानगडी केल्या आहेत ते जाणून घ्यायचंय आहे मला.

**प्रतिमा** : शरम नाही वाटत असं बोलायला ? ( हसतो. )
(मन्याला) अहो, उठा ना. ( नवऱ्याला हलवून जागं करीत )
अहो, उठा. जरा तुमच्या मित्राचा समाचार घ्या.

**सतीश** : अगं त्याला उठवू नको. माझं काम तसंच राहून जाईल अर्धवट
( मन्या जांभई देत उठतो ).

**प्रतिमा** : अहो, तुमचा हा मित्र माझी अब्रू घेतोय. आणि तुम्ही झोपा ायक काढता.

**मन्या** : ( झोपेच्या तंद्रीत ) अब्रू घेतो आहे ? कोण अब्रू घेतो आहे ?

**प्रतिमा** : हा तुमचा मित्र सतीश !

**मन्या** : अच्छा अच्छा घेऊ दे. उद्या परत आणून द्यायला सांग !
( पुन्हा तोंडावर पांघरूण घेऊन झोपतो.)

**सतीश** : अगं, त्याला जाग येण्यापूर्वी साडी सोड ! नाहीतर तुझ्याबरोबर साडीही जाईल !

**प्रतिमा** : ( मन्याच्या तोंडावरचं पांघरूण ओढून ) अहो उठा ना—

**मन्या** : ( जागा होतो ) काय झालं ?

**प्रतिमा** : ह्या मित्राने माझा आधी हात धरला आणि आता साडी काढायला

सांगतोय !

मन्या : सतीश तू...

सतीश : मन्या आपलं काय ठरलं होतं...अरे! तू जागा झालास? मग ही अजून कशी...अदृश्य झाली नाही?

मन्या : (त्याच्या तोंडावर हात ठेवून त्याला दूर नेत) हरामखोर, पाजी, बदमाश...(त्याच्या कानात पुटपुटतो) अरे, गाढवा, ही खरी प्रतिमा आहे. (प्रतिमाकडे बघून) तोंडाला दारूचा वास येतो आहे (सतीशच्या कानात) ॲक्टिंग कर. (प्रतिमाला) खूप प्यायलाय.

सतीश : वहिनी (नशेत असल्याचा अभिनय) मला माफ करा. मी थोडीशी घेतली आहे.

प्रतिमा : मला माहीत नव्हतं तुम्ही पिता हे.

सतीश : मला तरी कुठे तरी माहीत होतं. मन्या, तुझी बायको खूप चांगली आहे. मला अशी बायको असती तर माझा असा तळीराम झाला नसता. वहिनी, मी तुमचा हात धरला...ह्या हातानं धरला. धरा हा हात...आणि मारा माझ्या तोंडात (मन्या त्याचा हात धरून त्याच्याच तोंडात मारतो) ए, हळू मार.

प्रतिमा : ॲक्टिंग पुरे करा. आणि खरा प्रकार काय आहे ते सांगा! हा फोटो बाहेर कसा?

सतीश : मन्याला विचारा...

मन्या : विचारण्यापूर्वीच सांगतो, मघाशी डॉक्टर आला होता. त्याच्याबरोबर आम्ही फोटोतली प्रतिमा पाठवली?

प्रतिमा : काय! (मटकन खाली बसते.)

मन्या : होय! त्या डॉक्टरचं आणि तुझं काय लफडं आहे ते मला जाणून घ्यायचं होतं.

प्रतिमा : अहो. मग ते मला नाही का विचारायचं? मी सांगितलं असतं सविस्तर! हे उपद्व्याप करायला तुम्हाला सांगितलं कुणी?

मन्या : तुला हे धंदे करायला कुणी सांगितले ते सांग आधी.

प्रतिमा : कसले धंदे?

सतीश : तुझीच वाट बघत होतो.

प्रतिमा : ( दचकून त्याच्याकडे बघते ) म्हणजे ?

सतीश : मला वाटलं...तो डॉक्टर तुझी आता वाट लावणार !

प्रतिमा : काय बोलताय तुम्ही हे !

सतीश : त्यानं तुझा हात काय घट्ट धरला होता, नाही ?... ( तिचा हात धरून ) लागलं तर नाही ना !

प्रतिमा : ( भडकून ) सतीशभाऊजी, लाज नाही वाटत माझा हात धरायला ? ( मन्याकडे जाऊ लागते ).

सतीश : तो झोपला आहे, त्याला उठवू नकोस. अजून आपला कार्यभाग झालेला नाही.

प्रतिमा : म्हणजे तुमचा विचार काय आहे ?

सतीश : तू आणि त्या डॉक्टरनं गेल्या दोन आठवड्यांत काय काय भानगडी केल्या आहेत ते जाणून घ्यायचंय आहे मला.

प्रतिमा : शरम नाही वाटत असं बोलायला ? ( हसतो. ) (मन्याला) अहो, उठा ना. ( नवऱ्याला हलवून जागं करीत ) अहो, उठा. जरा तुमच्या मित्राचा समाचार घ्या.

सतीश : अगं त्याला उठवू नको. माझं काम तसंच राहून जाईल अर्धवट ( मन्या जांभई देत उठतो ).

प्रतिमा : अहो, तुमचा हा मित्र माझी अब्रू घेतोय. आणि तुम्ही झोपा यक काढता.

मन्या : ( झोपेच्या तंद्रीत ) अब्रू घेतो आहे ? कोण अब्रू घेतो आहे ?

प्रतिमा : हा तुमचा मित्र सतीश !

मन्या : अच्छा अच्छा घेऊ दे. उद्या परत आणून द्यायला सांग ! ( पुन्हा तोंडावर पांघरूण घेऊन झोपतो. )

सतीश : अगं, त्याला जाग येण्यापूर्वी साडी सोड ! नाहीतर तुझ्याबरोबर साडीही जाईल !

प्रतिमा : ( मन्याच्या तोंडावरचं पांघरूण ओढून ) अहो उठा ना—

मन्या : ( जागा होतो ) काय झालं ?

प्रतिमा : ह्या मित्राने माझा आधी हात धरला आणि आता साडी काढायला

सांगतोय !

मन्या : सतीश तू...

सतीश : मन्या आपलं काय ठरलं होतं...अरे! तू जागा झालास ? मग ही अजून कशी...अदृश्य झाली नाही ?

मन्या : ( त्याच्या तोंडावर हात ठेवून त्याला दूर नेत ) हरामखोर, पाजी, बदमाश...( त्याच्या कानात पुटपुटतो ) अरे, गाढवा, ही खरी प्रतिमा आहे. ( प्रतिमाकडे बघून ) तोंडाला दारूचा वास येतो आहे ( सतीशच्या कानात ) ॲक्टिंग कर. ( प्रतिमाला ) खूप प्यायलाय.

सतीश : वहिनी ( नशेत असल्याचा अभिनय ) मला माफ करा. मी थोडीशी घेतली आहे.

प्रतिमा : मला माहीत नव्हतं तुम्ही पिता हे.

सतीश : मला तरी कुठे तरी माहीत होतं. मन्या, तुझी बायको खूप चांगली आहे. मला अशी बायको असती तर माझा असा तळीराम झाला नसता. वहिनी, मी तुमचा हात धरला...ह्या हातानं धरला. धरा हा हात...आणि मारा माझ्या तोंडात (मन्या त्याचा हात धरून त्याच्याच तोंडात मारतो ) ए, हळू मार.

प्रतिमा : ॲक्टिंग पुरे करा. आणि खरा प्रकार काय आहे ते सांगा! हा फोटो बाहेर कसा ?

सतीश : मन्याला विचारा...

मन्या : विचारण्यापूर्वीच सांगतो, मघाशी डॉक्टर आला होता. त्याच्याबरोबर आम्ही फोटोतली प्रतिमा पाठवली !

प्रतिमा : काय ! ( मटकन खाली बसते. )

मन्या : होय ! त्या डॉक्टरचं आणि तुझं काय लफडं आहे ते मला जाणून घ्यायचं होतं.

प्रतिमा : अहो. मग ते मला नाही का विचारायचं ? मी सांगितलं असतं सविस्तर ! हे उपद्व्याप करायला तुम्हाला सांगितलं कुणी ?

मन्या : तुला हे धंदे करायला कुणी सांगितले ते सांग आधी.

प्रतिमा : कसले धंदे ?

मन्या : गेले दोन आठवडे त्या डॉक्टरबरोबर फिरत होतीस.

प्रतिमा : हो फिरत होते. पण तुमच्यासाठीच फिरत होते.

मन्या : का ? मला वेळ नव्हता ? आणि घरात ह्या चोरीच्या वस्तू आणून ठेवल्यास त्याही माझ्यासाठीच वाटतं ?

प्रतिमा : हो तुमच्यासाठीच ! आणि...आणि आपल्या संसारासाठी. माझं सुखी संसाराचं स्वप्न तुम्हाला कधीच साकार करता आलं नसतं.

मन्या : का नसतं आलं ? तुझं सुखी संसाराचं स्वप्न मी हप्त्याहप्त्यानं साकार केलं असतं !

प्रतिमा : तेच मला नको होतं ! हप्ते फेडण्यात तुमचं सगळं आयुष्य गेलं असतं ! फ्रिजचे हप्ते फेडताना तुमचं बँकबॅलन्स गोठत गेलं असतं ! टी. व्ही. चे हप्ते फेडत असताना डोक्यावरचे सगळे केस गळून गेले असते ! हप्ते फेडणं सोपं नसतं ! साधे दिवाळी फंडाचे हप्ते मी भरते तर कधी एकदाची दिवाळी येते असं होऊन जातं मला !

मन्या : अगं, पण म्हणून का चोरीच्या वस्तू घरात आणायच्या ?

प्रतिमा : कसली चोरी ? कुणी केली ?

मन्या : मग घरातल्या ह्या वस्तू ?

प्रतिमा : रोख पैसे देऊन विकत घेतल्या आहेत मी.

मन्या : पण ते पैसे अदृश्य होतात.

प्रतिमा : त्याच्याशी मला कर्तव्य नाही. माझ्याकडे सगळ्या वस्तूंची बिलं आहेत !

मन्या : पण ही लोकांची फसवणूक नाही का ?

प्रतिमा : असेल. पण ती मी केलेली नाही. त्या डॉक्टरनंच हा मार्ग शोधून काढला.

मन्या : पण तू का त्या मार्गानं गेलीस !

प्रतिमा : तुमच्यासाठी. तुम्ही ऑफिसातून दमून-भागून आल्यानंतर तुमचा जीव शांत करण्यासाठी मी फ्रीज आणला. कंटाळा आला तर तुमचं घटकाभर मनोरंजन व्हावं म्हणून मी टी. व्ही. आणला. आता टी. व्ही. नं तुमचं मनोरंजन केलं नाही तर तो माझा दोष नाही.

कपाटातले ते कपडे...

**मन्या** : त्या साड्यासुद्धा माझ्यासाठीच आणल्यास वाटतं.

**प्रतिमा** : कपाटात काय फक्त माझेच कपडे आहेत ?

**मन्या** : म्हणजे ?

**प्रतिमा** : तुम्हाला आता आयुष्यभर कपडे शिवायला नकोत अशी तजवीज केलीय मी. तसेच ते तिजोरीतले एक लाख रुपये...

**मन्या** :<br>**सतीश** : } एक लाख ?

**प्रतिमा** : जास्तच असतील ! ते काय माझ्यासाठी आहेत.

**मन्या** : कुठून आणलेस इतके पैसे ?

**प्रतिमा** : तुमच्या स्वप्नातल्या नोटांच्या बदल्यात डॉक्टर खऱ्या नोटा घेऊन यायचा. मी त्या आपल्या तिजोरीत लपवून ठेवल्या आहेत.

**मन्या** : त्याने परत मागितल्या तर ?

**प्रतिमा** : त्याला पैसे नकोच आहेत !

**मन्या** : मग ठीक आहे !

**प्रतिमा** : त्याला मी हवी आहे.

**मन्या** :<br>**सतीश** : } ऑं ?

**प्रतिमा** : हो. ह्या सगळ्या गोष्टींचा मोबदला म्हणून त्याला मी हवी आहे. गेल्या पंधरा दिवसांत त्यानं अनेक प्रयत्न केले मला वश करण्याचे. पण मी त्याला माझ्या नखाला स्पर्श करू दिला नाही !

**मन्या** : खरं सांगतेस ?

**प्रतिमा** : हो.

**मन्या** : बघू दे तुझी नखं !

**प्रतिमा** : तुमचा विश्वास नाही माझ्यावर ?

**मन्या** : नसेल तर काय करशील ?

**प्रतिमा** : तुम्ही सांगाल ते ! माझं पावित्र्य सिद्ध करण्यासाठी मी काय वाटेल ते दिव्य करायला तयार आहे. हे धरणी-माते, मी पवित्र असेन तर दुभंग हो आणि मला पोटात घे !

**सतीश** : थांबा, प्रतिमावहिनी जमीन खरोखरच दुभंगली तर तुम्ही खालच्या मजल्यावर पडाल. कुणाच्यातरी डोक्यावर.

**प्रतिमा** : तर मग मी खिडकीतूनच उडी घेते!

**मन्या** : नको, खालच्या मजल्यावरच्या बाल्कनीत कपडे वाळत घातले आहेत.

**प्रतिमा** : मग मी तुम्हाला कसं पटवून देऊ ?

**सतीश** : तुम्ही कशाला, मीच पटवून देतो त्याला. मन्या, वहिनी शुद्ध आहेत. अगदी नळाच्या पाण्याइतक्या शुद्ध आहेत. मघाशी फोटोतल्या प्रतिमेचं डॉक्टरशी झालेलं संभाषण मी ऐकलं. त्यावरून सांगतो.

**मन्या** : काय झालं संभाषण ?

**सतीश** : ते नंतर सांगीन. आधी त्या डॉक्टरचा काटा काढण्याचा काहीतरी मार्ग शोधायला हवा. ( मन्या प्रतिमाकडे बघतो )

**प्रतिमा** : ( कळवळून ) प्लीज ! त्याच्या तावडीतून सोडवा मला !

**मन्या** : का ग ? जा ना त्याच्याबरोबर पळून !

**प्रतिमा** : तुम्हाला आता तेच हवंय ! आता काय...मी गेले तरी माझा फोटो आहे ना सोबतीला. त्याच्याशिवाय नट्यांचे फोटो येतात छापून मासिक-पुस्तकात. रोज एक नटी स्वप्नात आली तरी आयुष्यभर बघायला नको. ठीक आहे. तुमची इच्छा असेल तर जाते मी. पण एकच सांगून ठेवते. ह्या घरातून माझं पाऊल बाहेर पडलं तर ते थेट स्वर्गाच्या दारात पडेल. सतीशभाऊजी येते मी.

**मन्या** : थांब थांब !

**प्रतिमा** : का ? आता का अडवता मला ?

**मन्या** : तुझं बोलणं नाटकी असलं तरी हृदयाला पीळ पाडणारं आहे. पुन्हा असं करणार नाहीस असं वचन देत असशील तर मी तुला माफ करायला तयार आहे. देतेस वचन ?

**प्रतिमा** : हे दिलं. पण कसंही करून त्या डॉक्टरच्या तावडीतून सोडवा मला. आधीच फोटोतल्या प्रतिमेमुळे तो तिकडे वैतागला असेल.

**सतीश** : मन्या, मला एक युक्ती सुचलीय ! त्या डॉक्टरचा कायमचा काटा काढायची युक्ती ! तू असं कर, तू भुताचं स्वप्न बघ ! म्हणजे इथे

एक भूत प्रकट होईल आणि त्या डॉक्टरच्या मानगुटीवर बसेल !

मन्या : आयडिया बरी आहे !

प्रतिमा : पण त्यासाठी भुताचा फोटो बघावा लागेल ना !

मन्या : हो आता भुताचा फोटो कुठून आणायचा ?

सतीश : हात्तिच्या एवढंच ना ! माझ्या सासूचा फोटो बघ. तिला बघितलं तर डॉक्टरचा ताबडतोब हार्टफेल होईल.

मन्या : नको. त्याला इतकं चांगलं मरण येता कामा नये. त्याचे हाल हाल करायचे आहेत मला.

सतीश : मग माझ्या बायकोचा फोटो बघ. पण नको, तिचा एकही फोटो माझ्याजवळ नाही. दुसरी काहीतरी आइडिया शोधली पाहिजे.

प्रतिमा : सापडली ! आयडिया सापडली !

मन्या : बोल, बोल, लवकर !

प्रतिमा : त्या डॉक्टरला मी तुमच्या स्वप्नातल्या नोटा घेऊन त्या मारवाड्याकडे पाठवते ! तो मारवाड्याच्या दुकानात पोहोचला की तुम्ही पोलिसांना फोन करायचा.

सतीश : बरं पुढे ?

प्रतिमा : पोलीस साहजिकच डॉक्टरला पकडून त्याची झडती घेतील ! त्याच सुमारास ह्यांनी जागं व्हायचं ! म्हणजे तिकडे पोलिसांच्या देखत नोटा अदृश्य होतील आणि डॉक्टर मुद्देमालासकट पकडला जाईल.

मन्या : कल्पना चांगली आहे. पण मला जागच आली नाही तर ?

प्रतिमा : ते माझ्याकडे लागलं ! तुम्हाला जागं कसं करायचं हे मी ठरवते ! कल्पना पसंत आहे ना !

मन्या : आहे !

प्रतिमा : मग सतीशभाऊजी, तुम्ही समोरच्या पब्लिक बूथजवळ जाऊन उभे रहा.

सतीश : आत्ताच ?

प्रतिमा : हो. आत्ताच. हॉटेलमध्ये फोटोतली ती प्रतिमा केव्हाच अदृश्य झाली असेल. तो डॉक्टर पिसाळलेल्या गेंड्यासारखा मुसंड्या मारत आत्ता इथं येईल. त्याला मी चुचकारून शांत करते ! आणि

मारवाड्याकडे पाठवते ! जा तुम्ही. ( बेल वाजते जोरात ).

सतीश : बापरे ! आला वाटतं !

प्रतिमा : थांबा आता थोडा वेळ ! सतीशभाऊजी मधाचं दारुड्याचं ॲक्टिंग सुरू करा.

मन्या : ते कशाला ?

प्रतिमा : ह्यांना टॅक्सीत बसवून घरी पाठवण्याच्या निमित्तानं तुम्ही बाहेर जा. आम्हाला एकान्त मिळू द्या ( मन्या : ऑ ? ) आणि लवकर परत या. सतीशभाऊजी, जरा हुशारीत ! डॉक्टर निसटता कामा नये ! ह्यांनी स्वप्न पहायला सुरुवात केली की मी तुम्हाला खूण करते खिडकीतून !

सतीश : ( नशेत असल्याचा अभिनय करीत ) यू डोन्ट वरी, ऑंटी ! ( दारावरची बेल जोरात वाजते )

मन्या : जा. दरवाजा उघड ! ( प्रतिमा जाते आणि दरवाजा उघडते. मन्याच्या खांद्यावर हात टाकून सतीश झिंगल्याचा बहाणा करू लागतो. डॉक्टर येतो. हातात एक पुडकं आहे. ते लपवण्याचा प्रयत्न करीत प्रवेश करतो. )

मन्या : हॅलो डॉक्टर !

सतीश : हॅलो, डॉक्टर !

मन्या : आज अगदी दिवसाढवळ्या ?

डॉक्टर : ( कृत्रिम हसत ) का ? मी नेहमी रात्रीच यावं अशी इच्छा आहे का तुमची ? हे कोण ?

मन्या : हा माझा मित्र, सतीश ! सतीश हे, डॉक्टर !

सतीश : डॉक्टर का ? ( हसतो )

मन्या : हो, हे आमचे फॅमिली डॉक्टर !

सतीश : डॉक्टर, तुम्ही एकदा आमच्या फॅमिलीला तपासा ना !

डॉक्टर : का काय होतंय ?

सतीश : माझ्या बायकोला विचित्र स्वप्न पडतात ! तिच्या स्वप्नात रोज रात्री गवत खाणारी बकरी येते !

डॉक्टर : मग एवढं घाबरण्याचं कारण नाही ! त्या स्वप्नांमुळं तुमचं काही

नुकसान तर होत नाही ना!

सतीश : नाही कसं? रोज सकाळी माझा लेंगा कुरतडलेला असतो ना! तुम्ही एकदा येऊन तपासून बघाना माझा लेंगा!

डॉक्टर : बरं येईन. येताना गवत घेऊन येईन. बकरी सापडली तर हाताशी गवत असलेलं बरं!

सतीश : डॉक्टर जनावरांना स्वप्नं पडतात का हो?

डॉक्टर : का? तुम्हाला पडतात?

सतीश : नाही! तुम्हाला पडतात? नाही? आश्चर्य आहे!

मन्या : डॉक्टर हा शुद्धीत नाही!

सतीश : हो. मी शुद्धीत नाही!

मन्या : मी ह्याला टॅक्सीत बसवून येतो. तुम्ही बसा तोपर्यंत!

डॉक्टर : ठीक आहे!

सतीश : अच्छा डॉक्टर! आमच्या बकरीचं तेवढं बघा हं!

डॉक्टर : (तो गेल्यावर स्वगत) चौकडच आहे लेकाचा!

प्रतिमा : डॉक्टर, आपण बसस्टॉपवर भेटायचं ठरवलं होतं!

डॉक्टर : बस बस पुरे कर! मला वाटलं नव्हतं तू इतकी ही असशील.

प्रतिमा : अहो, मी आले होते.

डॉक्टर : पण पळून यायचं कारण काय होतं?

प्रतिमा : मी किती वाट पाहिली तुमची.

डॉक्टर : एवढे नखरे करायचे होते तर आधीच का नाही सांगितलंस? का उगाच मला झुलवत ठेवलंस?

प्रतिमा : म्हणजे चोराच्या उलट्या बोंबा. मी इतका वेळ तुमची वाट पाहिली त्याचं काहीच नाही.

डॉक्टर : इतका वेळ म्हणे इतका वेळ. मी बाथरूममध्ये फक्त पाच मिनिटं होतो. बाहेर येऊन बघतो तर पलंगावर फक्त तुझी साडी... (हातातलं पुडकं तिच्या पुढ्यात टाकतो)

प्रतिमा : माझी साडी?

डॉक्टर : तुझी नाहीतर काय माझी?

प्रतिमा : (पुडकं उघडून) अय्या ही साडी?

**डॉक्टर** : सबंध हॉटेलभर वेड्यासारखा ही साडी घेऊन फिरत होतो. प्रत्येकाला विचारत होतो, ह्या साडीच्या आतली बाई कुठे दिसली का म्हणून! सगळे हसत होते मला. कॅबरे करणारी बाई फक्त तेवढी हसली नाही.

**प्रतिमा** : ही साडी नेसून आले होते ना मी? कोणत्या हॉटेलात गेलो होतो आपण?

**डॉक्टर** : वेड्याचं सोंग घेऊ नकोस. आजपासून तुझा-माझा संबंध तुटला.

**प्रतिमा** : डॉक्टर, आय ॲम सॉरी.

**डॉक्टर** : सॉरी म्हटलं की झालं, नाही का? आधीच त्या हॉटेलात मी दाढीवाला डॉक्टर म्हणून प्रसिद्ध होतो. आता साडीवाला डॉक्टर म्हणून प्रसिद्ध झालो.

**प्रतिमा** : सॉरी म्हटलं ना! बरं मी काय केलं म्हणजे तुमचा राग जाईल? सांगा ना, गडे!

**डॉक्टर** : (पाघळून) सांगू!

**प्रतिमा** : जरा लांबून सांगा! हे येतील एवढ्यात!

**डॉक्टर** : मी तुला फायनल विचारतो. हो की नाही ते सांग! माझ्याबरोबर येणार आहेस?

**प्रतिमा** : कुठे?

**डॉक्टर** : दूर कुठे तरी! जिथे तुझा नवरा नसेल, पोलीस नसतील तिथं! येशील?

**प्रतिमा** : पण...

**डॉक्टर** : हो की नाही?

**प्रतिमा** : हो, पण जायचं कुठे?

**डॉक्टर** : ते तू माझ्यावर सोपव. आपण दूर कुठल्यातरी देशात जाऊ! मी पासपोर्टची सुद्धा तयारी केली आहे. हा बघ, पासपोर्टसाईझचा फोटोसुद्धा काढून ठेवलाय मी परवा. एअर इंडियात माझा चांगला वशिला आहे.

**प्रतिमा** : विमानाने नको बाई. ते हायजॅक होतं. आपण मुंबईतून निघालो आणि प्लेन हायजॅक होऊन पुन्हा मुंबईतच आलं तर?

ग्रा. क्र... नों. दि ...............
वि. ....... क्र. ...................



डॉक्टर : घाबरू नकोस. ह्यावेळी मीच हायजॅक करणार आहे प्लेन.

प्रतिमा : यू आर व्हेरी ग्रेट हं! तुमच्या बुद्धिमत्तेवर मी खूष आहे!

डॉक्टर : नुसत्या बुद्धिमत्तेवर खूष होऊन काय उपयोग? गेल्या पंधरा दिवसात प्रेमानं कधी हातसुद्धा धरू दिला नाहीस.

प्रतिमा : इश्श! हातात काय आहे धरायला. तुमच्यासारखीच पाच बोटं आहेत मला.

डॉक्टर : ए, मघाशी इथून जाताना तू उगाच विरोध केलास!

प्रतिमा : बाईचं प्रेम हे विरोधातूनच व्यक्त होतं! तुमच्यावर माझं खूप खूप प्रेम आहे.

डॉक्टर : खरंच! दॅटस् ए बर्निंग पॉइंट इन् माय् लाईफ! प्रतिमा, तुझं हे बोलणं ऐकून मी आनंदानं गुदमरून गेलो आहे. आज तू मागशील ते मी तुला देईन.

प्रतिमा : खरंच!

डॉक्टर : येस्! वाटल्यास माझं काळीज कापून तुझ्यापुढे ठेवतो.

प्रतिमा : नको. मी शाकाहारी आहे. द्यायचंच असेल तर...

डॉक्टर : सांग, काय वाटेल ते सांग...

प्रतिमा : मघाशी त्या हिरालाल मारवाड्याच्या शोकेसमध्ये मला एक छानदार लफ्फा दिसला...तेवढाच मला आणून द्या.

डॉक्टर : नको. तेवढं मात्र सांगू नकोस. मी पुन्हा त्या मारवाड्याकडे जाण्यात धोका आहे. रात्री दिलेल्या नोटा अदृश्य झाल्या असतील तर तो मारवाडी मला लफ्फ्याऐवजी...अम्अम...लफ्फा देईल.

प्रतिमा : सरळ सरळ सांग ना तुमचं माझ्यावर प्रेमच नाही! (डोळ्याला पदर लावून) आणि मी उगाचच तुमच्यासाठी झुरत होते......

डॉक्टर : हे बघ, रडू नकोस. अगं माझ्याकडे मागून मागून शेवटी लफ्फाच मागितलास ना तू! गुलबकावलीचं फूल माग, मी आणून देतो. तू ताजमहाल माग मी बांधून देतो.

प्रतिमा : अहाहा! जसे काही शहाजहानच लागून गेलात.

डॉक्टर : नसेन मी शहाजहान पण मला तू मुमताज वाटतेस ना! हे बघ हा लफ्फ्याचा हट्ट सोड. वाटल्यास कोहीनूर हिरा माग. मी तो

इंग्लंडच्या राणीच्या मुगुटातनं काढून आणतो.

**प्रतिमा** : मला ह्यातलं काही नको. म्हणे राणीच्या मुगुटातनं कोहिनूर हिरा आणतो. राजा जाऊ देईल का तुम्हाला तिच्याजवळ ? ते काही नाही. मला तो लफ्फा हवाय आणि तोही आत्ताच. पंधरा मिनिटांच्या आत !

**डॉक्टर** : पंधरा मिनिटांच्या आत ? का ? नंतर तो काय नाहीसा होणार आहे.

**प्रतिमा** : मारवाडी म्हणाला त्याला बरीच गिऱ्हाईकं आहेत. लवकर घेऊन जा ! मी म्हटलं मी घरी जाऊन माझ्या नोकराला पाठवून देते. (प्रेमाने) मग जाणार ना तुम्ही ?

**डॉक्टर** : (नाखुषीने) जातोना. त्या मारवाड्याच्या नशिबी आज माझं गिऱ्हाईक दिसतंय !

**प्रतिमा** : तुम्ही कित्ती कित्ती चांगले आहात.

**डॉक्टर** : खरंच ? (जवळ जाऊ लागतो.)

**प्रतिमा** : हे आता येतील ! तुम्ही नेहमीप्रमाणे त्यांना नोटांचं स्वप्न बघायला सांगा. फक्त पंधरा मिनिटं !

**डॉक्टर** : फक्त पंधरा मिनिटंच का ?

**प्रतिमा** : ह्यांना संशय येऊ नये म्हणून. शिवाय त्यांचा तो मित्र हल्ली वरचेवर येत असतो. ह्यांना भेटायला. तो पुन्हा इथं आला तर पंचाईत होईल.

**डॉक्टर** : ठीक आहे. पंधरा मिनिटं तर पंधरा मिनिटं. पण त्या मारवाड्यानं मला पोलिसांच्या स्वाधीन केलं तर मला भेटायला येशील ना तुरुंगात.

**प्रतिमा** : (हसून) येईन ! आणि येताना तुम्ही भेट म्हणून दिलेले दागिने घालून येईन. अय्या हो. दागिन्यावरून आठवलं ! हा नेकलेस राहू द्या तुमच्या जवळ ! (पर्समधून नेकलेस काढून त्याला देते).

**डॉक्टर** : काल रात्री हाच नेकलेस घेतला ना आपण त्या मारवाड्याकडनं ? पण हा माझ्याकडे...

**प्रतिमा** : तात्पुरता राहू द्या. मी नंतर घेईन, मागून. हल्ली हे अधून मधून

माझी पर्स उघडून बघतात.

डॉक्टर : ( क्षणभर तो नेकलेस पाहून ) हा नेकलेस...तुझ्या गळ्यात किती शोभून दिसेल नाही ? तिच्या गळ्यात नेकलेस घालू लागतो. मन्या येतो आणि खोकतो. डॉक्टर चटकन् बाजूला होतो आणि नेकलेस कोटाच्या खिशात ठेवतो ).

मन्या : का ? फार लवकर आलो का ?

डॉक्टर : नाही अगदी वेळेवर आलात. डॉक्टरना तुमच्यावर मानसोपचार करायचे आहेत.

मन्या : डॉक्टरसाहेब, आणखी किती दिवस ट्रीटमेंट चालू राहणार ?

डॉक्टर : कदाचित... कदाचित ही शेवटची ट्रीटमेंट असेल. ह्यानंतर तुम्हाला कधीही स्वप्नं पडणार नाहीत !

मन्या : कधीही नाही ? अहो मग मी जगणार कसा ?

डॉक्टर : स्वप्नांचा आणि जगण्याचा काय संबंध ?

मन्या : खूप आहे, डॉक्टर ! प्रत्येक माणूस स्वप्नांवर जगत असतो. कार-कुनाला आपण ऑफिसर झाल्याची स्वप्नं पडतात म्हणून तो जगतो. लठ्ठ बाईचा नवरा स्वप्नात सडपातळ बाईशी संसार करतो म्हणून जगतो. पडेल नाटकाचा लेखक आपल्या स्वप्नात शेकडो प्रयोग करतो म्हणून जगतो. डॉक्टर, स्वप्नं आहेत म्हणून शास्त्रज्ञ आहेत ! स्वप्न आहेत म्हणून लेखक आहेत. स्वप्न आहेत म्हणून...स्वप्न आहेत ! प्रत्येकजण जगण्यासाठी कसलं तरी स्वप्न बघतो.

डॉक्टर : डॉक्टर कसलं स्वप्न बघतो सांगा पाहू !

मन्या : गावात रोगाची साथ आल्याचं !

डॉक्टर : ( गंभीर होऊन ) अच्छा ! मग आपण करायची सुरुवात ?

मन्या : कशाला रोगाच्या साथीला ?

डॉक्टर : ट्रीटमेंटला !

मन्या : पण डॉक्टर, माझी स्वप्नं थोडी तरी राहू द्या हं शिल्लक !

प्रतिमा : अहो ! आता बोलण्यात वेळ घालवू नका. डॉक्टर, तुम्ही ट्रीटमेंट सुरू करा. मी तुमच्याकरता चहा आणते.

(जाते. जाताना मन्याकडे एक दृष्टिक्षेप )

मन्या : मग डॉक्टरसाहेब, बघू मी तुमच्या डोळयात ?

डॉक्टर : येस् ! नाऊ यू विल गो टू स्लीप. ( मन्या हिप्नॉटाईज होतो. ) मि. लेले, तुम्ही झोपलात ना ? ( हो. )

( खिशातून एक फोटो काढून मन्याच्या डोळयांसमोर धरतो. मिस्टर लेले, आता हा फोटो बघा. हा माझा फोटो आहे. ह्या फोटोचं आता तुम्हाला स्वप्न पडेल आणि ते स्वप्न फक्त पंधरा मिनिटं टिकेल. ( कपाटात लपतो ) ( प्रतिमा किचनमधून बाहेर येते व खिडकीशी जाऊन सतीशला खूण करते व नवऱ्याच्या अंगावर शाल घालते. )

( डॉक्टर प्रकट होतो. )

डॉक्टर : प्रतिमा !

प्रतिमा : अय्या. डॉक्टर तुम्ही अजून इथेच ?

डॉक्टर : इथेच म्हणजे ? एवढ्यातच तर आलो फोटो स्टुडिओतून. अगं मी पासपोर्ट साईझचा फोटो...

प्रतिमा : ते कळलं मला. पण मी तुम्हाला मारवाड्याकडे जायला सांगितलं होतं ना !

डॉक्टर : अगं, उद्या रात्री जाणार आहोत ना आपण !

प्रतिमा : अहो, आता जायला सांगितलं मी तुम्हाला. जा पाहू आधी माझ्या-साठी तेवढा लफ्फा घेऊन या !

डॉक्टर : पण हिऱ्यांचा नेकलेस !

प्रतिमा : तो असू द्या तुमच्याजवळ. जा लवकर. तिकडे मारवाडी वाट बघत असेल. तो लफ्फा घेऊन या. मी तुमची वाट बघते आहे. मग आपण कुठे तरी दूरदूर जाऊ आणि सुखानं राहू.

डॉक्टर : खरंच ! मी...मी...आ...आत्ता आलो लफ्फा घेऊन. (जातो. परत येऊन ) वाट बघते आहेस ना ?

प्रतिमा : हो हो. जा ना लवकर.

( डॉक्टर जातो. प्रतिमा मन्याच्या कॉटजवळ येऊन बसते. एवढ्यात बाहेर ‘ चोर चोर ’, ‘ पकडा पकडा ’ असा गलका आधी अस्पष्ट नंतर स्पष्ट ऐकू येतो. डॉक्टर घाबऱ्याघुबऱ्या प्रवेश करतो. )

**डॉक्टर :** प्रतिमा, प्रतिमा घात झाला. माझ्यामागे पोलीस लागलेयत! मला लपव कुठेतरी! मी कपाटात लपतो (कपाट उघडतो. आतून डॉक्टरने घट्ट धरून ठेवलेलं असल्यामुळे पूर्ण उघडत नाही.) अरे बापरे! कपाटाला कुणी तरी आतून टाळा लावलेला दिसतो आहे! मी बेडरूममध्ये लपतो. (बेडरूममध्ये जातो. इन्स्पेक्टर प्रवेश करतो. मागोमाग हवालदार व मारवाडी)

**इन्स्पेक्टर :** एक्स्यूज मी. तुमच्या खोलीत एक बदमाष घुसला आहे! तुम्ही पाहिलात का?

**प्रतिमा :** नाही, आमच्या खोलीत बदमाष वगैरे कुणी नाही.
(हाताने 'बेडरूममध्ये आहे' अशी खूण करते)

**इन्स्पेक्टर :** हवालदार सोलकर, आत बघ!

**हवालदार :** यस् सर! (धडपडतो) त्यांची विकेट कुठे जात नाय?
(हवालदार आत जाऊन डॉक्टरला घेऊन येतो.)

**डॉक्टर :** अहो, मला सोडा, मला सोडा.

**हवालदार :** चौकीवर चल, मग तुला सोडाच काय पाणीबी पाजतु!
(घेऊन जातो, मारवाडीही जातो.)

**इन्स्पेक्टर :** (सतीशला) थँक्यू जन्टल्मन. (शेकहँड करीत) तुमच्यामुळे आज आम्हाला हा बदमाष गवसला?

**सतीश :** (देशभक्तीचा आव आणून) मी माझं कर्तव्य केलं. (इकडे मन्याची हालचाल सुरू होते. तो उठतो.)

**इन्स्पेक्टर :** वेल डन् वेल डन्! तुमच्यासारखे कर्तव्यदक्ष नागरिक ह्या देशात आहेत म्हणूनच...

**हवालदार :** (बाहेरूनच ओरडत येतो) साहेब, साहेब, तो चोर गायब झाला?

**इन्स्पेक्टर :** थांब रे मध्या... म्हणूनच आज देशाला – आँ? काय म्हणाला? गायब झाला?

**हवालदार :** होय साहेब.

**इन्स्पेक्टर :** यू फूल! तू माझं प्रमोशन घालवलंस! चल शोध परत. फटीफटीतून बघा, कोपरान् कोपरा तपासा! बोटांचे ठसे घ्या, बुटांचे शिक्के घ्या. कुत्री आणा, वास घ्या. काय वाटेल ते करा, पण त्याला

शोधून काढा ! आयुष्यात पहिल्यांदा चोर सापडला तर तो सुद्धा निसटला ( सगळे शोधाशोध करू लागतात. )

**प्रतिमा** : (नवऱ्याला आणि सतीशला) अहो, तो डॉक्टर अदृश्य झाला ! सतीशभाऊजी इकडे या...

**मन्या** : अदृश्य झाला ? म्हणजे ! ! !

**प्रतिमा** : म्हणजे आता आपली धडगत नाही. त्या डॉक्टरनं तुम्हाला बहुतेक स्वतःचा फोटो दाखवला असणार. आता काय करायचं सतीशभाऊजी.

**सतीश** : तुमचं तुम्ही बघा. मी माझं काम केले.

(इतक्यात मारवाडी रडत रडत येतो.)

**मारवाडी** : अरे मी शाला बरबाद झाला. मी मेला रे, साफ मेला.

**सतीश** : अरे तू मघाशी मेला होता ना ? सारखा सारखा काय मरतोस.

**मारवाडी** : आता तो साफ मेला – सत्यानाशी झाला. माझा पचास हजारचा नुकसानी झाला.

**इन्स्पेक्टर** : (आतून येत) अरे चूप. आम्ही शोधतोय ना ? काय झालं सोलकर ? (सोलकर बेडरूममधून येतो.) सापडला का ?

**हवालदार** : नाही साहेब. इथे कुणीबी नाही.

**इन्स्पेक्टर** : शूक ! कपाटातनं आवाज येतो आहे (हळूच जाऊन पटकन् कपाट उघडतो - आतून डॉक्टर बाहेर येतो)

**प्रतिमा** : अय्या डॉक्टर !

**मन्या** : डॉक्टर !

(डॉक्टर कपाटातनं बाहेर येतो– साडीत गुरफटलेल्या स्थितीत.)

**डॉक्टर** : बरं झालं मला लवकर बाहेर काढलंत ! आणखी काही वेळ मी त्या कपाटात राहिलो असतो तर आयुष्यभर मला कमरेत लचकत चालावं लागलं असतं.

**इन्स्पेक्टर** : यू आर अंडर अरेस्ट ! तुम्ही अटकेत आहात.

**डॉक्टर** : अटक नंतर करा. आधी मला ह्या साडीच्या कैदेतनं सोडवा ! माझा जीव गुदमरायला लागलाय. अरे, कुणीतरी माझं वस्त्रहरण करा रे !

**सतीश** : थांबा. त्या कामात मी वस्ताद आहे! ऑफिसच्या नाटकात मी एकदा दुःशासनाचं काम केलेलं आहे. द्रौपदीचं मी स्टेजवर बरेच वेळा वस्त्रहरण केलं आहे. पुढे त्या द्रौपदीशीच माझं लग्न झालं! सध्या ती दुःशासनाची भूमिका करते (डॉक्टरच्या अंगावरची साडी काढतो. मन्या मदत करतो.)

**डॉक्टर** : इन्स्पेक्टर आता बोला. मला का बरं अटक करणार तुम्ही?

**इन्स्पेक्टर** : तुम्ही एका टी. व्ही. कंपनीकडून टी. व्ही. घेतलात. त्याचे पाच हजार रुपये दुसऱ्या दिवशी गायब झाले. एका फ्रीज विक्रेत्याकडून तुम्ही फ्रीज विकत घेतलात त्याच्या किंमतीइतक्या नोटा दुसऱ्या दिवशी गायब झाल्या. अनेक बँकांकडून तुम्ही नोटा बदलून घेतल्यात त्या सगळ्याच्या सगळ्या नोटा गायब झाल्यात. त्यामुळे त्या बँकांमधले कॅशियर सस्पेंड झालेत. त्यात माझा मेव्हणाही अडकला आहे.

**डॉक्टर** : आय् ॲम सॉरी इन्स्पेक्टर! पण ह्यातलं मी काही एक केलेलं नाही. हे बघा माझं कार्ड.

**मारवाडी** : अरे कार्ड गेला भाडमधी. आधी माझा नेकलेस काढ!

**डॉक्टर** : काय म्हणतोय हा?

**इन्स्पेक्टर** : तुम्ही ह्यांच्याकडून एक हिऱ्याचा नेकलेस विकत घेतलात त्याचे पंचवीस हजार रुपये गायब झालेत.

**डॉक्टर** : गायब झाले! अहो गायब कुठले! तो काळा पैसा त्याने लपवला असेल (हसतो).

**मारवाडी** : अरे हसते काय– माझा नेकलेस दे ना!

**डॉक्टर** : अहो, नेकलेस तर तुमच्याकडे आहे.

**मारवाडी** : खोटं बोलते काय. इन्स्पेक्टर बघा माझ्या खिशामदी.

**डॉक्टर** : खिशात नाही– त्याच्या गळयात बघा. तुम्हाला तो हिऱ्याचा नेकलेस दिसेल.

**मारवाडी** : (चाचपून बघतो) अरे, हा माझ्या गळयामंदी कसा आला!

**इन्स्पेक्टर** : (रागावून) ते पोलीस चौकीवर सांगतो. चला! सभ्य माणसावर आरोप करता काय!

**डॉक्टर** : बघितलंत इन्स्पेक्टर— नेकलेस ह्यांच्याकडे आहे आणि चोरीचा आळ माझ्यावर घेतोय! अहो मी तर ह्या कुटुंबाचा फॅमिली डॉक्टर आहे. तुमच्या पोलीस स्टेशनच्या बाजूला माझी कन्सल्टींग रूम आहे. बघा माझं व्हिजिटिंग कार्ड!

**इन्स्पेक्टर** : ओह सॉरी डॉक्टर! हवालदार सोलकर, ह्या मारवाड्याला नेऊन बंद करा!

**हवालदार** : पण साहेब हा दाढीवाला मघाशी माझ्या डोळ्यादेखत गायब झाला.

**इन्स्पेक्टर** : चूप! माणूस कधी गायब होतो काय! कोणत्या गाढवानं तुला पोलिसात भरती केलं?

**हवालदार** : तुमच्याच वशिल्यानं लागलो साहेब!

**इन्स्पेक्टर** : शट् अप्.

**डॉक्टर** : मी सांगतो तुम्हाला काय घडलंय ते! एक जादूगार माझं रूप घेऊन वावरतोय! त्यानंच मला ह्या कपाटात बंद करून ठेवलं होतं! बाहेर येण्याच्या धडपडीत मी ह्या साडीत गुरफटलो! आणि माणूस एकदा साडीत गुरफटला की बाहेर येणं कठीण?

**इन्स्पेक्टर** : ते साडीचं सोडा! त्या जादूगाराचं पुढे काय झालं ते सांगा?

**डॉक्टर** : ते माझ्यापेक्षा तुम्हालाच जास्त माहीत! मी तर कपाटात होतो.

**इन्स्पेक्टर** : म्हणजे पुन्हा तो चोर माझ्या हातावर तुरी देऊन निसटला! माझं प्रमोशन गेलं! यू फूल, यू इडियट (हवालदाराला) तू त्याला घट्ट का नाही धरून ठेवलंस?

**हवालदार** : बरं झालं नाय धरून ठेवलं! नाय तर मी बी गायब झालो असतो!

**इन्स्पेक्टर** : शट् अप्! क्विक मार्च.

**हवालदार** : (मारवाड्याला) शटाप! क्विक मार्च, एप्रिल, मे, जून, जुलै (जातात)

(डॉक्टर एकएक पाऊल टाकत प्रतिमाकडे येतो.)

**डॉक्टर** : निकमहराम, तुझ्यासाठी मी इतके दिवस कुत्र्यासारखा गावभर भटकत होतो आणि तू मला म्युनिसिपालटीच्या ताब्यात द्यायला निघाली होतीस काय! पण तुझ्यासारख्या छप्पन्न पोरी खिशात

टाकण्याची शक्ती आहे माझ्यात ! (खिशातून हिऱ्याचा नेकलेस काढतो) हा बघ हिऱ्याचा नेकलेस. मारवाड्याच्या गळ्यातला नेकलेस खोटा होता. त्याच्या गळ्यात नेकलेस नव्हताच मुळी ! मी सगळ्यांवर मोहिनीविद्येचा प्रयोग केला होता ! मास हिप्नॉटीझम म्हणतात त्याला ! त्यामुळे मारवाड्याच्या गळ्यात नेकलेस आहे असं नुसतं म्हटल्याबरोबर तो सगळ्यांना दिसायला लागला ! खरा नेकलेस तर हा आहे ! आणि हाही आता माझ्या हातानं तुझ्या गळ्यात घालणार आहे !

**प्रतिमा** : आई ग – अहो –

**मन्या** : घाबरू नकोस प्रतिमा ! मी बघतो, तो कसा हात लावतो तुला ! ( पुढे पाऊल टाकतो )

**डॉक्टर** : खबरदार ! एक पाऊल पुढे टाकशील तर कुत्रा बनवून रस्त्यातून फिरायला लावीन. अरे ! गेले पंधरा दिवस ही बाई तुझे डोळे मिटल्यावर माझ्याबरोबर येत होती. आज मी तिला तुझ्या देखत घेऊन जाणार आहे. आता मला अडवायची कोणाची बिशाद आहे.

**सतीश** : तुला अडवायला तुझा बाप इथे उभा आहे.

**डॉक्टर** : ओ ! मिस्टर बोकड ? मला वाटलं तू चरायला गेला असशील. तूच ना रे तो सरकणारा मोढा ? तूच ना मला ज्ञानेश्वर केलं होतंस ?

**सतीश** : होय रे माझ्या म्हशीच्या प्राणनाथा !

**डॉक्टर** : थांब आता तुला रेडाच बनवतो.

**सतीश** : अरे हट् !

( डॉक्टर आणि सतीश एकदम एकमेकांना हिप्नॉटाईज करायला सुरुवात करतात; पण सतीश डॉक्टरला हिप्नॉटाईज करण्यात यशस्वी होतो. )

**सतीश** : मन्या अरे ह्याला काय झालं !

**मन्या** : अरे ! तुला हिप्नॉटाईज करता करता हा स्वतःच हिप्नॉटाईज झाला की काय !

**सतीश** : डॉक्टर तुम्ही खरंच हिप्नॉटाईज्ड झाला काय ? ( डॉक्टर हो

म्हणतो ) डॉक्टर उजवा हात उचला आणि कानफटात मारून घ्या ( डॉक्टर सतीशच्या कानफटीत मारतो ) स्वतःच्या, स्वतःच्या. ( डॉक्टर अगदी हळू स्वतःच्या कानफटीत मारून घेतो. ) डॉक्टर तुम्ही पोपट आहात. ( डॉक्टर पोपटाचा आवाज काढतो ) डॉक्टर तुम्ही किशोरकुमार आहात. ( डॉक्टर गाणे म्हणू लागतो ) डॉक्टर तुम्ही छोटं कुत्रं आहात ( डॉक्टर हळू भुंकतो ) डॉक्टर तुम्ही मोठं कुत्रं आहात ( डॉक्टर जोरजोरात भुंकू लागतो. ) डॉक्टर तुमचा पट्टा कुठाय ? ( डॉक्टर टाय काढून दाखवतो ) चला उठा आता. मन्या, ह्याला मी आता घरी घेऊन जातो.

**मन्या** : कशाला ?

**सतीश** : बायकोला दाखवायला. तिने अद्याप बुलडॉग पाहिलेला नाही. तिला एकदा दाखवतो आणि मग ह्याला परस्पर म्युनिसिपालटीच्या ताब्यात देतो.

( डॉक्टर जोरजोरात भुंकू लागतो. सतीश त्याच्या पाठीत धपाटा मारतो. डॉक्टर कुत्र्यासारखा विव्हळू लागतो.

सतीश त्याच्या टायला धरून बाहेर नेतो. मन्या दरवाजा बंद करून प्रतिमाला मिठीत घेतो )

( पडता पडतो )

म. प्र. स. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. २०७७८ नों. दि ..........
वि. ....नाटक.... क्र. ..१०१।८५...

IRBK-0120716

IRBK-0120716